प्र. राजकीय सिद्धांत म्हणजे काय ? ते सांगून त्याचे स्वरूप व व्याप्ती स्पष्ट करा.

प्रस्तावना :- राजकीय सिद्धांताचा अभ्यास राज्यशास्त्रामध्ये केला जातो. राज्यशास्त्राचा जनक ॲरिस्टॉटल या politics हा ग्रंथ लिहिला त्यात राज्याच्या राज्यघटना व कारभार संबंधीत माहिती दिली आहे. मुळात Theory हा इंग्रजी शब्द Thea या ग्रीक भाषेतील शब्दावरून बनला आहे. Thea म्हणजे दृष्टीकोन होय. थोडक्यात राजकीय वस्तुस्थितीकडे पाहण्याचा दृष्टीकोन म्हणजे राजकीय सिद्धांत होय.

19 व्या शतकाच्या शेवटी राजकीय सिद्धांताची सोय तात्विक व आदर्शवादी होते. त्यात आदर्श परिस्थितीचे विश्लेषण केले जात होते. प्लेटोने रिपब्लीक या ग्रंथामध्ये मांडलेली आदर्श राज्याची कल्पना आधुनिक काळात राजकीय विचारवंतांनी राजकीय सिद्धान्ताला शास्त्रीय दर्जा प्राप्त करून देण्यासाठी वास्तव परिस्थितीची मांडणी केली, तसेच शास्त्रीय पद्धतीचा वापर करून विश्लेषण केले, तसेच राजकीय प्रक्रिया बाबत निष्कर्ष काढले, नियम तयार केले या सर्वांना राजकीय सिद्धांत असे म्हणतले जाते.

* व्याख्या :-

① अब्राईन :-
राजकीय समाजाच्या ज्ञानपूर्वक व शिस्तबद्धक शोध घेणे म्हणजे राजकीय सिद्धांत होय.

② जेरेमी बॅन्टे =
मानवाच्या सामाजिक अस्तित्वासाठी आवश्यक असलेले योग्य व्यवस्थेच्या तत्त्वाचा चिकित्सक अभ्यास म्हणजे राजकीय सिद्धांत होय.

③ डॉन्टे मॅरामॅनो :

मानवाच्या सामाजिक अस्तित्वासाठी आवश्यक व उपयुक्त अशा व्यवस्थेच्या मुल्यांचा अभ्यास म्हणजे राजकीय सिद्धांत होय.

④ राजकीय शब्दकोश :

राजकीय घटनांचे मुल्यमापन स्पष्टीकरण आकृती या संबंधी बोध होणारे विचार म्हणजे राजकीय सिद्धांत होय वरील विविध व्याख्या वरून असे दिसते की राजकीय मुख्यत्वे राजकीय संबंधी तत्वे गोळा करून त्यांचा परस्परांशी असलेली संबंध निश्चित केला जातो त्याद्वारे भाविष्या संबंधी काही अंदाज बांधले जातात. थोडक्यात राज्यव्यवहारातील घड णाऱ्या घटनांचा त्यातील सत्य गोष्टींना ग्राह्य समजून केलेले सैद्धांतिक विवेचन म्हणजे राजकीय सिद्धांत होय.

राजकीय सिद्धांताचे स्वरूप :

सुरुवातीच्या काळात (प्लेटो ॲरिस्टोटल) राजकीय सिद्धांताचे स्वरूप आदर्शवादी होते. आधुनिक काळात ग्राहाम वालास यांनी लिहिलेल्या ह्युमनेचर इन पॉलिटिक आणि बेंटले यांनी लिहिलेल्या द प्रोसेस ऑफ गव्हर्मेन्ट या ग्रंथाच्या प्रकाशना नंतर राजकीय सिद्धांताचे स्वरूप बदलत गेले केडरिक पोलाक डेविड इस्टन यांनी राजकीय सिद्धांताला शास्त्रीय स्वरूप प्राप्त करून दिले. परिणामी राजकीय सिद्धांताचे स्वरूप आदर्शवादीकडून वास्तव वादा कडे आले पुढे मॅकियावेली थॉमस हॉब्स यांनी त्यात भर घातली आधुनिक काळातील राजकीय सिद्धांताचे स्वरूप इत्यादी.

(1) वास्तवाच्या शोध घेण्यावर भर :-

पूर्वीच्या राजकीय सिद्धान्तात मूल्यांवर भर दिला जातो. आधुनिक राजकीय सिद्धान्तात वास्तवाचा शोध घेण्यावर भर दिला जात आहे काय असावे यापेक्षा प्रत्यक्षात काय आहे याचा शोध घेतला जात आहे. डेव्हिड ईस्टन यांच्या मते महत्त्वाचे राजकीय घटक शोधून त्याचा परस्पर संबंध प्रस्थापित करणारी विश्लेषण पद्धती आधुनिक राजकीय सिद्धान्तात स्वीकारली आहे. थोडक्यात समाजात सद्यस्थितीला घडत असणाऱ्या गोष्टींच्या विश्लेषणावर भर दिला जात आहे.

(2) आंतरविद्याशाखीय दृष्टिकोनाचा आधार :-

पूर्वी राजकीय सिद्धान्ताचा अभ्यास करताना इतर सामाजिक शास्त्राचा आधार घेतला जात नव्हता परंतु आधुनिक काळात तो घेतला जातो परिणामी राजकीय सिद्धान्ताला राजकीय समाजशास्त्र व राजकीय मनोविज्ञानाचे स्वरूप प्राप्त झाले.

(3) वर्तनवादावर भर :-

पूर्वी राजकीय सिद्धान्ताच्या अभ्यासात शासनाच्या प्रक्रियेवर भर दिला जात होता. त्याला तात्त्विक विवेचनाचा आधार होता आधुनिक काळात शासनाच्या रचनेचा अभ्यास केला जाऊ लागला, शासन चालवणाऱ्या व्यक्तीचे वर्तन कसे आहे या विषयीचा अभ्यास राजकीय सिद्धान्तात केला जाऊ लागला.

(4) विकसनशील देशाचा अभ्यास :-

आधुनिक काळात विकसनशील देशाच्या राज्यकारभारावर राजकीय सिद्धांन्तांनी भर देऊन तो स्थिर करण्याचा प्रयत्न केला आहे. उदा.. दुसऱ्या महायुद्धानंतर जगातल्या अनेक देशांनी लोकशाही स्वीकारली म्हणजे

विकसनशील देशांसाठी आणि अविकसित देशांसाठी तेथील राजकीय प्रक्रियांचा अभ्यास स्वातंत्र्यपणे सुरू झाला डेव्हिड इस्टन, पॉवेल, ऑमंड, डहाल यांनी राजकीय व्यवस्थेमध्ये नवीन संकल्पना वापरून राजकीय सिद्धान्ताला समृद्ध केला.

⑤ शास्त्रीय संशोधनावर भर :-
पूर्वी राजकीय सिद्धांतात विविध संकल्पना तात्विक विवेचनावर मांडल्याचा आधुनिक काळात त्याऐवजी विविध विचारवंतांनी विश्लेषणवादी भूमिका घेऊन अनुभवजन्य संशोधन व शास्त्रीय संशोधन यावर भर दिला. उदा. आजचे राजकीय सिद्धान्त हुकुमशाहीचे स्वरूप दोष काढण्यापेक्षा हुकुमशाहीचा उदय कसा झाला. तिचे अस्तित्व कसे होते याची माहिती करतात.

⑥ सांख्यिकी विश्लेषणावर आधारित निष्कर्ष :-
पूर्वी राजकीय सिद्धांतात राजकीय माहितीचा समावेश केला जात नसे. परंतु आधुनिक राजकीय सिद्धांतात सांख्यिकी पद्धतीने विश्लेषण करून निष्कर्ष काढले जातात. उदा. निवडणुकांचा अभ्यास करताना आकडेवारीसह निष्कर्षाचे विवेचन केले जाते.

राजकीय सिद्धांताची व्याप्ती :
हेनरी मेयो यांनी राजकीय सिद्धान्ताची व्याप्ती पुढीलप्रमाणे स्पष्ट केली आहे.

① मानवाचा विचार :-
मानव हा राजकीय सिद्धांताचा केंद्रबिंदू आहे राजकीय सिद्धान्त हे मानव व राज्यांभोवती फिरत असतात, ॲरिस्टोटलच्या मते मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे. त्याच्या संघटितपणाच्या भावनेमधून शासन संस्था, नियम व कायद्याची निर्मिती झाली आहे, त्यामुळे

राजकीय सिद्धान्तांच्या अभ्यासात मानव त्याचा कुटुंबातील समाज राज्य व लोकांचे आचरणाविषयी याचा अभ्यास केला जातो.

(२) राज्याचा अभ्यास :

राजकीय सिद्धान्तांच्या व्याप्तीत राज्याच्या उदय राज्याची उद्दिष्टे, वैशिष्ट्ये, राज्याची कार्ये, राज्यांच्या विविध सिद्धान्तांचा अभ्यास केला जातो मार्क्सचा ऐतिहासिक सिद्धान्त, आदर्शवादी सिद्धान्त व शक्तीवर आधारित सुद्धा उभारणी यांचा ही अभ्यास राजकीय सिद्धान्तात केला जातो.

(३) राज्य व शासनाचा अभ्यास :-

समाजाने संघटीत होऊन कायदे व नियमांसाठी शासन संस्था निर्माण केली कायदे करणाऱ्या लोकांना शासक म्हटले जाते पुढे त्यांचे कायद्यांच्या माध्यमातून समाजावर नियंत्रण प्रस्थापित झाले या सर्वांचा अभ्यास राजकीय सिद्धान्तांच्या व्याप्तीत होऊ लागला. तसेच राज्य संस्थेची उद्दिष्टे साकारणारी यंत्रणा म्हणजे शासन संस्था होय. या शासन संस्थेचा उदय, स्वरूप प्रकार अशा अनेक बाबींचा अभ्यास राजकीय सिद्धान्तात केला जातो.

(४) राजकीय संरचना व संस्थांचा अभ्यास :

पारंपारिक राजकारणात राजकीय संस्थांचा अभ्यास होत होता आधुनिक काळात राजकीय संस्था बरोबर राजकीय व्यवस्था, संरचना, अभ्यास होऊ लागला, राजकीय कृती व व्यवहार यावर भर दिला जातो, इस्टन, अल्मंड व कोलमन यांनी रचनात्मक कार्यवादाचा सिद्धान्त मांडला त्यासाठी अभ्यास राजकीय सिद्धान्तात होऊ लागला.

⑤ राजकीय साहित्याचा अभ्यास :-

राजकीय सिद्धांताला वैचारिक बैठक देण्यात राजकीय साहित्यांचा मोठा वाटा आहे. ॲरिस्टॉटलचे पॉलिटिक्स, कार्ल मार्क्सने दास कॅपिटल जे.एस. मिल चे ऑन लिबर्टी, कौटिल्याने अर्थशास्त्र असे महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहिले. या सर्व साहित्यांचा परिणाम राजकीय व्यवस्थेवर झाला. उदा: रूसो ने लिहिलेल्या सामाजिक करार या ग्रंथामुळे फ्रान्स मध्ये क्रांती होऊन तेथील जनतेला स्वातंत्र्य, समता, न्याय व बंधुता ही तत्त्वे मिळाली. परिणामी राजकीय साहित्यांचा अभ्यास राजकीय सिद्धांतात केला जाऊ लागला.

⑥ राजकीय विचारप्रणाली :-

प्रत्येक राजकीय व्यवस्थेला टिकून राहण्यासाठी काही मूल्यांचा नैतिकतेचा विचारांचा आधार घ्यावा लागतो, म्हणजे प्रत्येक राजकीय व्यवस्था विचारांच्या शोधात असते. उदा : समाजवाद, साम्यवाद, गांधीवाद, उदारमतवाद सर्वंकष सत्तावाद असा विविध विचार सरकार राज्यकर्ता स्वीकारल्या जातात या सर्वांचा अभ्यास राजकीय सिद्धांता मध्ये केला जातो.

⑦ मतदारांच्या वर्तनांचा अभ्यास :-

आधुनिक काळात नवीन राजकीय विचार राजकीय व्यवस्थेत आल्यामुळे राजकीय सिद्धांताची व्याप्ती वाढत चालत आहे. उदा:- निवडणूक अभ्यास शास्त्र हा घटक नव्याने उदयास आला आहे; ज्यात मतदारांच्या वर्तनांचा अभ्यास केला जातो राजकीय व्यवस्थेत मतदारांचे वर्तन कसे असते. त्यांच्या वर्तनामुळे राजकीय व्यवस्थेवर काय परिणाम होतो. या सर्वांचा अभ्यास राजकीय सिद्धांतात केला जातो.

सारांश :-

व्यक्तीच्या जीवनातील परिवर्तनामुळे सामाजिक व राजकीय व्यवस्थेत बदल घडले याबद्दलपासून राजकीय सिद्धान्तात प्रचंड वाद होते कोणी पूर्वीची पोलिसची स्टेट संकल्पना जाणून कल्याणकारी राज्याची संकल्पना अस्तित्वात आली. राजकीय तत्त्वज्ञान विचारप्रणाली हा राजकीय सिद्धान्ताचा गाभा विषय मानला आहे थोडक्यात आधुनिक राजकीय बदलांमुळे राजकीय सिद्धान्त समृद्ध झाले.

प्र.② राजकीय सिद्धान्ताच्या अभ्यासाच्या पारंपारिक दृष्टिकोन विशद करा.

① प्रास्ताविक :- पूर्वी राजकीय सिद्धान्ताचा अभ्यास पारंपारिक दृष्टिने केला जात होता. राज्य व शासन संस्थेचा अभ्यास करणे व तत्त्वज्ञानाच्या भूमिकेतून आदर्श राज्याची संकल्पना शोधणे यावर भर दिला होता. प्लेटो पासून ते मार्क्स पर्यंत त्या दृष्टिने आदर्शवादी अभ्यास झाला थोडक्यात 19 व्या शतकाच्या शेवटपर्यंत राजकीय सिद्धान्ताचा अभ्यास करण्याचा दृष्टिकोनास पारंपारिक दृष्टिकोन असे म्हणतात.

② पारंपारिक दृष्टिकोनाचे प्रकार :-
प्रामुख्याने पारंपारिक दृष्टिकोनाचे तीन प्रकार पडतात ते म्हणजे आदर्शवादी दृष्टिकोन ऐतिहासिक दृष्टिकोन व संस्थात्मक दृष्टिकोन हे होय.

③ पारंपारिक दृष्टिकोनाचे विवेचन :-

① आदर्शवादी दृष्टिकोन :-
प्राचीन काळापासून राजकीय सिद्धान्ताच्या अभ्यासाचा आदर्शवादी दृष्टिकोन अस्तित्वात आहे. या दृष्टिकोनात आदर्शवादाचा शोध घेतला जातो तर काय होते काय आहे यापेक्षा काय असावे यांची माहिती केली असा अभ्यास प्लेटोपासून ते महात्मा गांधीपर्यंत अनेक तत्त्वज्ञांनी केला.
आदर्शवादी दृष्टिकोन राजकीय व सामाजिक जीवनातील शाश्वत चिरंतन मुल्यांचा शोध घेते या दृष्टिकोनातून शाश्वत मुल्यांना आदर्श मानून त्या आधारावर राजकीय जीवन व सामाजिक संस्थाचे स्वरुप कसे असावे याचे वर्णन राजकीय सिद्धान्तात केले जात होते. सर्व साधारण तत्त्वांकडून आदर्शाकडे जाण्याचा प्रयत्न आदर्शवादी सिद्धांताने केला. आदर्शवादी विचारवंतांनी

आपल्या बुद्धीच्या जोरावर आदर्शाची उभारणी केली राजसंस्थेचे स्वरूप कसे असावे? राज्य व नागरिकांचे संबंध कसे असावे या प्रश्नांची सोडवणूक नैतिक मूल्यांतून केली. वाल्डो, प्लेटो, रूसो, कार्ल मार्क्स, मिल, लास्की, महात्मा गांधी या विचारवंतांनी आदर्शवादी दृष्टिकोन मांडला. प्लेटोने रिपब्लिक ग्रंथामध्ये आदर्श राज्य व महात्मा गांधीजींनी रामराज्य ही संकल्पना मांडली.

आदर्शवादी दृष्टिकोनाची वैशिष्ट्ये :

(1) विशाल व्याप्ती :-
आदर्शात्मक राजकीय सिद्धान्ताची व्याप्ती सर्व समावेशक आहे. संपूर्ण मानवी जीवन राजकीय सिद्धान्ताच्या कक्षेत येते त्यामुळे त्यांची व्याप्ती विशाल आहे.

(2) नैतिकतेवर भर :-
मूल्य व आदर्शांवर भर देऊन आदर्श चांगल्या जीवनाच्या शोधण्याचा प्रयत्न राजकीय सिद्धान्तातून केला जातो.

(3) निगमनात्मक पद्धत :-
आदर्शवादी राजकीय सिद्धान्तांत तत्त्व ज्ञानाला महत्त्वाचे स्थान आहे. राजकीय तत्त्वांच्या शोध घेण्यासाठी ही पद्धत वापरली जाते. उदा. प्लेटोने तत्त्वज्ञांनी राज्याच्या नावाखाली आदर्श राज्याची कल्पना मांडली.

(4) आदर्श राज्य :-
राजकीय व सामाजिक संस्थांच्या अभ्यासावर भर देऊन आदर्श राज्य कसे असावे यांची मांडणी करून राजकीय सिद्धांतात विवेचन केले जाते.

(७) आदर्शवादाचा आक्रमता :
आदर्शात्मक राजकीय कृतीत व सामाजिक संबंधांशी योजित नैतिकतेवर आधारित असावी असा आग्रह आदर्शवादाचा सिद्धान्त आहे.

(८) आदर्शवादाचे स्वरूप :
आदर्शात्मक राजकीय सिद्धान्ताचे स्वरूप तत्त्वज्ञानात्मक, मूल्याधिष्ठित, नैतिक व कल्पनात्मक होते.

आदर्शवादी सिद्धान्तांचे मूल्यमापन :
आदर्शवादी सिद्धान्ताचे गुणदोष पुढील प्रमाणे आहेत.

* गुण :-

① राजकीय नीतिकला उंचावण्यास मदत :
विविध विचारवंतांनी त्यांच्या ज्ञानाचा व विचारांचा उपयोग राजकारण व राज्यशास्त्र व राज्यकारभाराचा नैतिक स्तर उंचावण्यासाठी केला. उदा. महात्मा गांधीजींनी राजकारणात नैतिक आचरण देण्याचा यशस्वी प्रयत्न केले. नैतिकतेवर आधारित राज्यव्यवहार करावा असा त्यांचा आग्रह होता.

② राजकीय समस्या सोडवण्यासाठी उपयोग :
राजकीय समस्या सोडवण्याचे मार्ग विचारवंतांच्या तत्त्वज्ञानात मिळतात. तत्त्वज्ञानाच्या माध्यमातून राजकीय समस्या सोडवल्या जातात. उदा. कार्ल मार्क्स च्या पूर्वी समानता कशी निर्माण करायची हे एक ही विचारवंताने सांगितले नाही. मार्क्स ने मात्र हे सांगितले.

③ उच्च आदर्श मानवी जीवनासाठी :
मानवी जीवन स्वार्थ संकुचित निवड करणारे व विविध विचारांनी ग्रस्त असणारे असते. अशा वेळी मानवाने जर नैतिक मूल्यांचा स्वीकार केला तर मानवी जीवन आदर्श होते तसेच परिपूर्ण मानवी जीवनामुळे समानही परिपूर्णतेकडे वाटचाल करते.

④ राज्यव्यवहारास मूल्यांचा आधार :
आदर्शवादी दृष्टिकोन राज्यव्यवहाराला मूल्यावर आधारित प्रतिष्ठा मिळवून देतो शासकीय जीवन तत्त्व व आदर्शावर नैतिकतेमुळे निर्माण होतो त्यामुळे समाजावर व राज्यव्यवहारात नैतिक मूल्य रुजली जातात.

* दोष

① वास्तवाकडे दुर्लक्ष :
आदर्शवादी विचारवंतांनी आदर्श वास्तवात येतील का यावर विचार केला नाही म्हणूनच प्लेटोचे आदर्शराज्य किंवा महात्मा गांधीजींचे रामराज्य वास्तवात आले नाही तर आदर्शवाद्यांनी आपल्या विचारांत वास्तवापेक्षा कल्पनेवर जास्त भर दिला.

② स्वप्नवादाची निर्मिती :
तत्त्वज्ञानात्मक पद्धतीला मोठे महत्त्व असले तरी त्याच्यातील सर्वच तत्त्वे प्रत्यक्षात राबविणे कठिण असते. त्यामुळे ते फक्त स्वप्नच राहते शिवाय आदर्शवादी तत्त्वांना व्यवहारात कमी मूल्य असल्याचे दिसते त्यामुळे आदर्श व व्यवहार यांत अंतर पडते.

③ चुकीचे निष्कर्ष :-
या पद्धतीत निरीक्षण, परीक्षण, विश्लेषण प्रयोग, वास्त-विकता यांचा विचार केला जात नाही त्यामुळे काढलेले निष्कर्ष वास्तवावर आधारित असत नाहीत ते चुकीचे दिशा भूलकारक असू शकतात.

④ आनिश्चित पद्धती :-
तत्त्वज्ञानाची सर्वमान्य अशी व्याख्या या पद्धतीतून तत्त्वज्ञाना असून निश्चित करता आली नाही त्यामुळे या पद्धतीत आनिश्चितता दिसून येते.

⑤ एकांगी स्वरूपाचे विचार :
राज्यासंबंधी सिद्धान्त निर्माण करण्याचा अधिकार काही तत्त्वज्ञानाच मिळतो त्याचे विचार परिपूर्ण असतीलच असे नाही त्या व्यक्ती मध्ये स्वार्थ पूर्वग्रह असू शकतो त्यामुळे ते विचार एकांगी स्वरूपाचे असू शकतात.
आदर्शवादी दृष्टी कोनात असे दोष असले तरी राज-कीय सिद्धांताच्या विकासात त्यांनी महत्त्वाची भर टाकली आहे.

दृष्टिकोन संस्थात्मक :-
19 व्या शतकात युरोप खंडात स्वतंत्र लोकशाही देशाची संख्या वाढत जावून
राज्य ही कायदेशीर संस्था आहे आणि संविधानात असलेल्या राज्य व शासन संस्था, राज्य व नागरिक या तत्त्वांना महत्त्व प्राप्त झाले परिणामी राज्य घटनेचा व त्याद्वारे स्थापन झालेल्या संस्थांचा अभ्यास करणे महत्त्वाचे बनते. ऑस्टीन डायसी, लॉर्ड ब्राईस या विचार वंतानी संस्थात्मक दृष्टीकोनाचा विचार केला त्यांनी शासन संस्था व संविधा-नाचा अभ्यास केला.

संस्थात्मक दृष्टिकोनावर एकांगी व औपचारिक दृष्टिकोन म्हणून टिका केली जाते. या दृष्टिकोनामुळे वास्तवाचे आकलन होत नाही. राजकीय पक्ष लोकमत, दबाव गट हे घटक राजकीय प्रक्रिये मध्ये महत्त्वाचे असतात. परंतु संस्थात्मक अभ्यासकांनी त्या कडे दुर्लक्ष केले. मुळात विशिष्ट राजकीय पक्षाचे स्वरुप असते.
लोकमताचा सरकारच्या धोरणावर परिणाम होत असतो. सामाजिक विविध घटकांचा प्रभाव प्रतिनिधीच्या माध्यमातून सरकार वर होत असतो. त्या सर्व गोष्टीकडे संस्थात्मक दृष्टिकोनाच्या अभ्यासकांनी दुर्लक्ष केले त्यामुळे त्याचे विवेचन एकांगी वाटे त्यामुळे राजकीय वास्तवता समजून येत नाही.

③ ऐतिहासिक दृष्टिकोन :-
राज्य व राज्यातील इतर संस्था अस्तित्वात आल्यानंतर त्याचा इतिहास समजून घेणे महत्त्वाचे असते राज्याच्या उदय केव्हा ~~झाली~~ व कसा झाला, राजकीय संस्थांची जडणघडण कशी झाली राज्यसंस्था कशी उत्क्रांत होत गेली या सर्व बाबींचे अध्ययन १८ व्या शतकात सुरु झाले होब्ज, जॉन लॉक, माँटेस्क्यू, हेगेल, हॅरॉल्ड लास्की इत्यादी विचारवंतांनी राजकीय संस्थांची मांडणी ऐतिहासिक पद्धतीने केली या विचारवंताच्या मते राज्यात होऊन गेलेल्या व सध्या अस्तित्वात असलेल्या संस्थांचे आकलन विविध घटनांच्या आधारे करता येते.

③ राजकीय सिद्धान्ताच्या अभ्यासाच्या आधुनिक दृष्टिकोनाचे विवेचन करा.

अ) प्रस्तावीक :
आधुनिक काळामध्ये राजकीय सिद्धान्ताचा अभ्यास नव-नावीन पद्धतीनी होऊ लागला त्या व्यवस्था व सत्ता यांना महत्त्व मिळत होते वैज्ञानिक वाणी शास्त्रीयता यावर आधारित विसाव्या शतकात राजकीय सिद्धान्ताचा अभ्यास होऊ लागला. त्यालाच आधुनिक दृष्टिकोन असे म्हणतात.

ब) आधुनिक दृष्टिकोन :

① सिद्धान्ताची मांडणी :
विसाव्या शतकाच्या सुरवातीस आधुनिक दृष्टिकोन उदयास आला. 1908 मध्ये ग्रॅहम वालास यांनी woman nechur in politics या ग्रंथात अनुभव जन्य दृष्टिकोनाची मांडणी केली ग्रॅहमवॉलास ने मानस शास्त्र दृष्टीने राजकारणाचा अभ्यास केला 1908 मध्ये आर्थर बेंटले यांनी द प्रोसेस ऑफ गव्हर्नमेंट या ग्रंथात समाजशास्त्र दृष्टिकोनातून राजकीय प्रक्रियेचा अभ्यास केला या दोन्ही विचारवंता नंतर 1950 नंतर आधुनिक दृष्टिकोनाच्या अभ्यासाला चालना मिळत होती. डेविड इस्टन यांनी 1953 मध्ये द पॉलिटिकल सिस्टम, ॲन इनटॉईक्वसन इन टादे स्टेट of political sciens. हा ग्रंथ लिहिला इस्टन ने या ग्रंथात समाजशास्त्र दृष्टिकोनातून व संरचना यांचा अभ्यास केला त्यांनी रचनात्मक कार्यवादी सिद्धान्त मांडला यांच काळात आधुनिक सिद्धान्ताला खऱ्या अर्थाने चालना मिळाली.

② आधुनिक दृष्टिकोनाचे प्रकार

आधुनिक दृष्टिकोनाचे पुढील आठ प्रकार दिसतात. व्यवस्था वाद, रचनात्मक कार्य वाद, वर्तनवाद, संघवाद सत्ता वाद, संप्रेषण वाद ही आधुनिक दृष्टिकोनाची रूपे आहेत तर वस्तू स्थितीची यथा तथ्य नोंद करणे, अशी नोंद करताना मूल्यांना अवाजवी महत्त्व देऊ नये आणि व्यक्ती निरपेक्ष पुरावी वस्तुनिष्ठ अभ्यास करावा हि आदर्शवादीची तीन महत्त्वाची सूत्र आहेत. आदर्शवादात जे ज्ञान इंद्रियांनी प्राप्त आहेत तेच ज्ञान आहे हे अनुभव वादाचे सूत्र होते ह्या सूत्राच्या आधारे राज्यशास्त्राचा होऊ लागला.

आधुनिक दृष्टिकोनाचे अभ्यासक वास्तववादी व व्यापक भूमिकेतून राजकीय सिद्धान्ताचा अभ्यास करतात आदर्शात्मक माहिती करण्या पेक्षा वस्तुनिष्ठ विश्लेषणाला व व्यवहाराला महत्त्व देतात शास्त्रीय साधने वापरून मूल्य निरपेक्ष अभ्यास करतात त्या द्वारे अभ्यासाच्या नवीन पद्धती शोधून काढतात.

③ आधुनिक दृष्टिकोनाची वैशिष्ट्ये :

① आंतर शास्त्रीय दृष्टिकोन :

आधुनिक दृष्टिकोनाचे प्रवर्तक सामाजिकशास्त्रातील विविध विषयांतील अभ्यास पद्धती व संकल्पना वापरून अभ्यास करतात. उदा. निवडणुकांचे विश्लेषण करताना संख्या शास्त्राचा व मानवी वर्तनाचा आधार घेतात.

② अनुभवास महत्त्व :

आदर्शवादी दृष्टिकोनापेक्षा पूर्णपणे उलट आधुनिक दृष्टिकोनात प्रत्यक्ष अनुभवलेल्या घटना व घडलेल्या घटनांचे चे प्रत्यक्ष निरीक्षण केले जाते. त्याचे विश्लेषण करून सिद्धांताची मांडणी केली जाते.

③ मूल्य निरपेक्षता :

आधुनिक दृष्टिकोनाचे पुरस्कर्ते संशोधन करताना मूल्य निरपेक्ष राहतात. सत्य घटनांचे व निरपेक्ष काढतात या वेळी आदर्शवादी, मूल्ये, नैतिकता यांना अवाजवी महत्त्व देत नाही.

④ फेर तपासणी :

आधुनिक दृष्टिकोनात मांडलेले निष्कर्ष, मांडलेले सिद्धान्त यांची पुनर तपासणी केली जाते त्यातून सिद्धान्त निश्चित केला जातो.

⑤ क्षेत्रीय संशोधनाला महत्त्व :

आधुनिक दृष्टिकोनात क्षेत्रीय संशोधनाला आधुनिक महत्त्व दिले जाते. माहिती संकलनासाठी अत्याधुनिक साधने व पद्धतींचा वापर केला जातो.

⑥ शास्त्रीय पद्धतीचा वापर :

संशोधनासाठी त्या अचूक परिणामासाठी आधुनिक शास्त्रीय पद्धती वापरल्या जातात. उदा. परिक्षण, सर्वेक्षण, मुलाखती, संख्याशास्त्रीय विश्लेषण आलेख तक्ते.

⑦ तुलनात्मक पद्धतीचा वापर :

तुलनात्मक पद्धती व विकास वादी अभ्यासाच्या मदतीने राजकीय व्यवस्थे मुळे घडणाऱ्या घटनांच्या राजकीय सिद्धान्ताला शास्त्रीय स्वरूप देण्याचा प्रयत्न केला जातो. त्यामुळे अनुभववादी विश्लेषणाच्या मदतीने हा दृष्टिकोन राज्यशास्त्राला भौतिकशास्त्रा प्रमाणे शास्त्रीय दर्जा मिळवून देईल.

मूल्यमापन ३.

२० व्या शतकात आधुनिक मूल्यमापनाचे जे यांचे काही असून आणली त्यात काही त्रुटीचा राहिल्या आहेत. त्याचे विवेचन पुढील प्रमाणे

गुण ३.

(१) वास्तववादी विवेचन

विसाव्या शतकात राज्यशास्त्राच्या अभ्यासकांनी आदर्शवादी अभ्यासाच्या ऐवजी वास्तववादी अभ्यास केला त्यामुळे राजकीय प्रक्रियेचे विश्लेषण वास्तव रुपाने समोर आले.

(२) राज्यशास्त्राला शास्त्रीय दर्जा मिळवून दिला.

विसाव्या शतकातील राजकीय अभ्यासकांनी शास्त्रीय पद्धतीने राजकीय घडामोडींचे विश्लेषण करून निष्कर्ष काढून भौतिक शास्त्राप्रमाणे अचूक सिद्धान्त मांडले त्यामुळे राज्यशास्त्राला "शास्त्र" हा दर्जा मिळाला

(३) व्याप्तीतील व्यापकता

आधुनिक राज्यशास्त्रज्ञांनी राज्यशास्त्राचे अभ्यासक राजकीय वर्तन, मतदाराचे वर्तन, दबाव गटाचे राजकारण राजकीय पक्ष या विषयाचे अध्ययन केले त्यामुळे राजकीय अभ्यासाची व्याप्ती वाढत गेली.

(४) तुलनात्मक अभ्यास

राजकीय सिद्धान्तात आलेले नियम अमेरिकन व्यवस्थेवर आधारलेले होते मात्र निष्कर्षांची शासन पद्धती इंग्लंड मधून आली होती त्यामुळे आधुनिक दृष्टिकोनाच्या अभ्यासकांनी विविध देशांचा तुलनात्मक अभ्यास केला तुलनात्मक पद्धतीने राजकारणाचे स्वरूप मांडले


(iv) नवीन दिशा :
आधुनिक दृष्टिकोनाच्या अवलंबन करतांनी राजकीय संशोधनाला नवीन दिशा दिली. त्यांनी धनात समाजशास्त्र, मानसशास्त्र, संख्याशास्त्र यातील संकल्पना वापरल्या.

दोष :
आधुनिक राज्यशास्त्रज्ञांच्या प्रयत्नामुळे राजकीय सिद्धांत समृद्ध झाले तरी इत्तर दरबांनी त्यात काही दोष दाखवले.

(i) अचूकतेचा अभाव :
इत्तर वर्तनवादाच्या मध्ये व्यक्तीच्या वर्तनाचा अभ्यास करताना एकच नियम वेगवेगळ्या व्यक्तींना लावणे अवघड होते. कारण प्रत्येक व्यक्तीचे वर्तन सारखेच असू शकत नाही त्यामुळे निष्कर्ष अचूक काढता येत नाही

(ii) आदर्शाकडे दुर्लक्ष :
आधुनिक दृष्टिकोनाने अनुभववादी अभ्यासावर भर दिल्याने समाजातील आदर्श मूल्याकडे दुर्लक्ष झाले. आदर्शवादाकडून मानवी जीवनातील आदर्शाकडे दुर्लक्ष केले होते.

(iii) शास्त्रीय पद्धतीचा अतिरेक :
आधुनिक दृष्टिकोनाच्या आधुनिकांनी व त्याच अभ्यासासाठी नवीन पद्धती शोधून काढल्या त्यामुळे माहिती शोधून काढणे व त्यांच्या विवेचनासाठी शास्त्रीय पद्धतीचा वापर शोधून काढणे. यावर लक्ष केंद्रित झाले सिद्धान्तांची निर्मिती झाली.


१०) उपलब्ध माहितीची व्यवहारीकता
आदर्शवाद्यांनी याबाबत राजमोहीचा अभ्यास शास्त्रीय
पद्धतीने केला परंतु त्यांना मिळालेली माहिती बरोबर आहे
असे नाही त्यामुळे त्यांचे निष्कर्ष चुकीचे ठरू लागले.
वरील विविध दोष आधुनिक दृष्टिकोनामध्ये
निर्माण झाले यावर उपाय म्हणून 1940 नंतर मायकेल
ओकशॉट, लिओ स्ट्रॉस यांनी मानवी जोखमा विषयी अभ्यास
सुरू केले. त्यातून राजकीय तत्त्वज्ञानाची चळवळ निर्माण
झाली. डेविड इस्टनने आधुनिक दृष्टिकोन मानताना राजकीय
सिद्धान्ताचा ऱ्हास झाला आहे परंतु त्यांना सुद्धा राजकीय
सिद्धान्ताची उपयोगिता मान्य करावी लागली तर अनुभव
वाद्यांनी राज्यशास्त्राच्या अभ्यासाला वैज्ञानिक स्वरूप
देवून व्यावहारिक स्वरूप दिले. राज्यशास्त्राच्या अभ्यासा-
ला शास्त्रीय दर्जा मिळवून दिला हे विसरून चालणार
नाही.

प्रकरण 2. अ. राज्य, नागरी समुदाय व बाजारपेठ

प्रश्न 1 ला. राज्य ही संकल्पणा स्पष्ट करून राज्याच्या उदयाचे सिध्दांत स्पष्ट करा. किंवा
राज्य ही संकल्पणा स्पष्ट करून राज्याच्या उत्पतीचे सिध्दांत स्पष्ट करा. किंवा
राज्य ही संकल्पणा स्पष्ट करून राज्यविषयक सिध्दांत स्पष्ट करा.

अ. प्रास्ताविक :–

प्राचीन काळात टोळयांनी एकत्र येवून समाज, समाजातून, प्रदेश व प्रदेशातून राज्ये निर्माण झाली. परंतू राज्याच्या उदयाची प्रक्रिया, त्याचा घटनाक्रम यांचा शोध व राज्याच्या उदयामागील कार्यकारणभाव शोधून काढण्याचे प्रयत्न राज्यशास्त्रज्ञानी केले. त्यांच्या तात्विक विवेचनातून राज्याच्या उदयाचे सिध्दांत मांडले गेले.

ब. राज्य म्हणजे :–

मॅकियाव्हैलीने 1523 मध्ये आपल्या ''प्रिन्स'' या पुस्तकांत प्रथम राज्य या संकल्पनेचा उपयोग केला. ग्रीकांनी या शब्दाच्या जवळपास येणारा Polis हा शब्द नगर या अर्थाने वापरला. कारण त्यावेळी 'नगरराज्य' हीच राज्ये होती. त्यानंतर संपूर्ण मध्ययुगीन काळांत आजच्या राज्य या संकल्पनेशी संबंधित शब्द वापरलेला दिसतो. त्याचे कारणही स्वभाविक होते. 16 व्या, 17 व्या शतकात सार्वभौम सत्तेची कल्पना स्पष्ट होवू लागल्यानंतर राज्याची व्याख्या स्पष्ट होवू लागली. मैकियाव्हॅलीनंतर राज्य ही संकल्पना मान्य स्वरूपात थोडयाशा निश्चित अर्थाने वापरली जावू लागली.

मानवाच्या इतिहासात अनेक राज्ये उदयास आली, वाढली व नष्ट झाली. अशा राज्यांपैकी अनेकांचा इतिहास लिहिला आहे. त्यातील प्रत्येक राज्य कसे अस्तित्वात आले हे त्या इतिहासाच्या आधारे ठरविता येते. परंतु मानवी समाज राज्यसंस्थेच्या स्वरुपात केव्हा व कसा व्यक्त झाला हे निश्चित सांगता येत नाही. यातूनच राज्य कोणत्या पध्दतीने अस्तित्वात आले यासंबंधी अनेक सिध्दांत सांगितले आहेत. त्यापैकी काही अनुमाने काढली जातात. तर काही इतिहासाच्या आधारे समजून घेण्याचा प्रयत्न केला जातो. मानवाच्या गरजा मानवी स्वभावाची वैशिष्टये, वृत्तीमुळे निर्माण होणारे संबंध याचाही विचार करावा लागतो. तसेच सभोवतालचे विवेचन करताना राज्याच्या उदयाचे सिध्दांत अभ्यासावे लागतात.

क. राज्याच्या उदयाचे /उत्पत्ती संबंधीचे सिध्दांत :–

राज्याच्या उत्पत्तीसंबंधी राज्यशास्त्रज्ञांमध्ये एकमत नाही. राज्याच्या उत्पत्तीसंबंधी शक्ती सिध्दांत, सामाजिक करार सिध्दांत आणि ऐतिहासिक किंवा उत्क्रांतीचा सिध्दांत असे वर्गीकरण केले जाते.

1. शक्ती सिध्दांत :–

राज्यातील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी राज्याला शक्तीचा वापर करावा लागतो. शक्ती हे राज्याचे महत्वाचे अंग आहे. शक्ती सिध्दांताच्या समर्थकांच्या मते, सबलाने दुर्बलावर विजय मिळवून राज्य निर्माण केले. प्राचीन काळी टोळयाटोळयांत संघर्ष होवून ज्यांचा पराभव होई त्या टोळीला विजयी टोळीत गुलाम म्हणून सामील व्हावे लागे. टोळीचा नायक अशाप्रकारे आपली सत्ता वाढवत. अशा अनेक टोळया एखादया विशिष्ट भुप्रदेशावर मिळून राहात असत. अशाप्रकारे सुरुवातीला गटाचे राज्य, मग राष्ट्रराज्य नंतर विशाल साम्राज्ये निर्माण झाली. राज्याच्या विकासाचे प्रमुख कारण म्हणजे सत्ता संपादनाची मानवी प्रवृत्ती होय. शक्ती सिध्दांताच्या समर्थकांच्या मते, राज्याच्या उत्पत्तीला सामर्थ्यच कारणीभूत होते. राज्य निर्माण झाल्यानंतरसुध्दा राज्य व स्वातंत्र्य 'सार्वभौमत्व' टिकवण्यासाठी शक्तीची गरज असते. म्हणून अंतर्गत व बाह्य बाबतीतसुध्दा सामर्थ्य आवश्यक आहे. अन्यथा राज्याची शक्ती नष्ट होण्याचा धोका निर्माण होतो.

इ. स. 1080 मध्ये पोप ग्रेगरीने शक्ती सिध्दांताचा पुरस्कार केला. बर्नाड यांच्या मते ''मत्स्यन्याय'' हा पूर्वीपासून चालत आलेला न्याय आहे. मोठया मास्याने लहान मास्याला गिळावे. थोडक्यात, सामर्थ्यवान व्यक्तीने दुर्बलावर आपली सत्ता चालवावी यात काही गैर नाही. सर्व शक्तीमान व्यक्तीवादी लेखकांनीही राज्य हे शरीर सामर्थ्यावर आधारीत आहे हे तत्व स्वीकारले. पूर्वी ''बळी तो कान पिळी'' हीच अवस्था होती. ''सामर्थ्यवान व्यक्तीच श्रेष्ठ ठरते.'' अशा प्रकारे पाशवी शक्तीमधून राज्याची निर्मिती झाली.

आधुनिक काळात साम्यवादी विचारवंतांच्या मते, 'श्रीमंतानी (भांडवलदारांनी) गरीबांची (मजूरांची) पिळवणूक करण्यासाठी निर्माण केलेली संस्था म्हणजे राज्य होय.' हिटलर, मुसोलिनी यांनीही शक्ती सिध्दांताचा पुरस्कार केला. हिटलरच्या मते, बंदुकीच्या गोळया लोण्याच्या गोळयापेक्षा श्रेष्ट ठरतात. थोडक्यात, राज्याची निर्मिती शांततेने होत नाही ती शक्तीच्या जोरावर होते.

शक्ती सिध्दांताचे गुण :–

1) सुनियंत्रित समाजव्यवस्थेसाठी समाजाच्या अप्रगत अवस्थेत ज्यावेळी सर्वत्र अराजकता होती. त्यावेळी शक्ती घटकाने समाजाला भिती दाखवून एका सामर्थ्यवान व्यक्तीच्या नियंत्रणाखाली लोक त्याचे आज्ञापालन करु लागले. त्यातून सुनियंत्रित समाज व्यवस्था उदयास आली.

2) साम्राज्याची निर्मिती : मानवी इतिहासाचा अभ्यासावरून असे लक्षात येते की, अलेक्झांडर, नेपोलियन व अलिकडील काळात अमेरिकेचे जागतिक वर्चस्व निर्माण केले आणि त्याचा आधार शक्ती सामर्थ्य हाच होतो.

3) राज्याच्या स्वअस्तित्वासाठी : राज्याच्या संरक्षणासाठी, अंतर्गत ऐक्य व स्थैर्य टिकवण्यासाठी, परकीय आक्रमण नाहिसे करण्यासाठी आजही शक्ती आवश्यक आहे. अलिकडील राजकारण सत्तेसाठीचे बनले आहे.

4) शक्तीहिताचे संरक्षण : दुर्बलांना सामर्थ्याचा आधार घ्यावा लागतो. दुर्बलांनी हुकुमांचे पालन करावयाचे आणि सबलांनी त्यांचे रक्षण करावयाचे अशी स्थिती समाजात दिसून येते. त्यामुळे राजा आणि प्रजा यांचे संबंध याच स्वरुपाचे असतात.

5) अधिकारांची जोपासना :– ग्रीनच्या मते, शक्तीचा उपयोग म्हणजे केवळ शक्तीचा व सामर्थ्याचा उपयोग असे नसून कायदयाने मान्य केलेल्या अधिकारांच्या रक्षणासाठी कायदयाने दिलेल्या शक्तीचा वापर होय.

शक्ती सिध्दांतातील दोष :–

1) लोकशाही विरोधी : लोकशाहीतील व्यक्तीस्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी शक्ती सिध्दांताचा पुरस्कार करता येणार नाही. मानवी परस्पर प्रेम, सहकार्य, सहानुभूती, दयाळूपणा इत्यादी नागरिकाच्या सदगुणाकडे हा सिध्दांत दुर्लक्ष करतो.

2) राज्यनिर्मितीचा शक्ती हा एकमेव आधार नाही : राज्यकारभार चालविण्यासाठी शक्ती व सामर्थ्य आवश्यक आहे परंतू डॉ. लिकॉक यांच्या मते, राज्यनिर्मितीसाठी शक्तीसारखे इतर घटकही कारणीभूत आहेत. गिलख्रिस्तच्या मते, लोकांचा पाठिंबा हेच राज्यनिर्मितीचे शाश्वत कारण आहे.

3) सामर्थ्य हे सर्वस्व नव्हे : गिलख्रिस्तच्या मते, सामर्थ हे राज्याचे सर्वस्व नव्हे सत्तेच्या दुरुपयोगाने राज्याचे अस्तित्व नष्ट होते. सत्तेला अधिकार कर्तव्याची जोड दिली तर राज्याला बळकटी येते.

4) अराजकतेची निर्मिती : सत्तेलाच जर महत्व दिले तर राज्याराज्यात शत्रुत्व निर्माण होईल. सत्तेसाठी संघर्ष सुरु होतील. राज्यात, राज्याबाहेर शांतता व सुरक्षितता राहणार नाही. राज्याची सर्व शक्ती सत्ता मिळविण्यासाठी युध्दात खर्च होईल.

5) सत्तेचे अधिष्ठान : टी. एच्. ग्रीन यांच्या मते, 'जनसंमती हाच राज्याचा आधार आहे. सामर्थ्य हा राज्याचा आधार ठरु शकत नाही.' सत्ता ही राज्यास आवश्यक असली तरी तिचा अतिरेकी वापर योग्य नाही. केवळ सत्तेवर आधारलेले राज्य अल्पजिवी ठरते.

2. सामाजिक करार सिध्दांत –

राज्याची निर्मिती कशी झाली याचे विवेचन करणारा सामाजिक करार हा एक सिध्दांत आहे. सामाजिक कराराच्या सिध्दांताचा मुख्य आशय असा की, समाज जीवनाच्या प्रारंभी राज्य व शासन संस्था नव्हती. पुढे शासन यंत्रणेची गरज भासू लागली. या अनुशंगाने मानवी समाजाच्या इतिहासात दोन टप्पे पडतात. एक राज्याच्या उत्पत्तीपूर्वीचा व दुसरा राज्याच्या उत्पत्तीनंतरचा. पहिल्या टप्यात राज्य व शासन यंत्रणाए कायदयाची अंमलबजावणी करणारी सत्ताही नव्हती. या स्थितीस त्यांनी नैसर्गिक अवस्था असे म्हणत. नैसर्गिक अवस्थेत मानवाला फक्त निसर्गाने दिलेले हक्क उपलब्ध होते. ''बळी तो कान पिळी'' अशी अवस्था होती. त्यामुळे मानवी वर्तणुकीचे नियमन करणाऱ्या व्यवस्थेची गरज निर्माण झाली. अशावेळी नैसर्गिक स्वातंत्र्य काही अंशी कमी करुन शासनयंत्रणा उभारण्यात शासक व जनता यांच्यात करार झाले. त्यांतूनच राज्यसंस्था अस्तित्वात आली. थोडक्यात, 'राज्य हे करारातून निर्माण झाले.' असे या सिध्दांताचे म्हणणे आहे. राज्यसंस्था अस्तित्वात येण्यापूर्वी मानवी जीवन कशा प्रकारचे होते? त्यांनी राजकीय संस्था कशी निर्माण केली? हा करार कोणाकोणात झाला? यांची मांडणी हॉब्ज, लॉक व रुसो यांनी केली.

थॉमस हॉब्जचा सामाजिक करार सिध्दांत :–

थॉमस हॉब्जने 1651 मध्ये 'लेव्हिएथन' हा ग्रंथ लिहिला. इंग्लंडमधील अस्थिर परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी अनियंत्रित राजसत्ता असल्याशिवाय शांतता, सुव्यवस्था निर्माण होणार नाही. हे प्रतिपादन करण्यासाठी हॉब्जने या सिध्दांताचा पुरस्कार केला. निसर्गावस्थेत नैसर्गिक नियम पाळले जात होते. स्वतःचे जीवित सुरक्षित ठेवण्यासाठी प्रत्येक व्यक्ती शक्तीचा उपयोग करीत असे. हेच तिचे नैसर्गिक स्वातंत्र्य होते. अशा अवस्थेत संघर्ष संपवणे मानवास आवश्यक वाटू लागल्याने काही नैसर्गिक हक्क सोडून व्यक्तीव्यक्तीत

सामाजिक करार झाला. ''तू जर आपली शक्ती माझ्याविरुध्द वापरणार नसशील तर मीही माझी शक्ती तुझ्याविरुध्द वापरणार नाही.'' अशा प्रकारचा करार होवून राज्यसंस्था निर्माण झाली.

हॉब्जच्या सामाजिक कराराची वैशिष्टये :–

निसर्ग अवस्थेत प्रत्येक व्यक्तीने स्वइच्छेने करार केला. या करारान्वये राजा व राज्य निर्माण झाले. सर्वानी राजाच्या आज्ञा पाळणे बंधनकारक आहे. राजकर्त्यांना विरोध करण्याचा अधिकार प्रजेला नाही.

जॉन लॉकचा सामाजिक करार :–

लॉकच्या मते, राजाने प्रजेच्या अधिकाराचे संरक्षण केले नाही तर राजाला पदच्यूत करण्याचा अधिकार प्रजेला आहे. हे तत्व प्रतिपादन करण्यासाठी इ. स. 1690 मध्ये लॉकने Two Treatises of Civil Government या ग्रंथात जनतेच्या संमतीवर राज्याची सत्ता अवलंबून असते. अशी विचारप्रणाली मांडून सामाजिक कराराच्या सिध्दांताला वेगळे वलय दिले.

सामाजिक कराराचे स्वरुप :–

लॉकच्या मते, निसर्गावस्थेतील प्रत्येक व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीशी करार केला. आपल्या इच्छेनुसार निसर्गनियमांचा अर्थ लावण्याचा अधिकार करारानुसार स्थापन झालेल्या समाजाकडे दिला. या करारानुसार व्यक्तींनी आपले नैसर्गिक अधिकार राखून ठेवले व काही विशिष्ट अधिकार समाजाला दिले. तर निसर्गनियमांची अंमलबजावणी करण्यासाठी सामाजिक घटक या नात्याने मनुष्याने आणखी एक करार केला. त्याला शासनसंस्थेचा करार म्हणतात. या करारानुसार शासनसंस्था स्थापन होवून कायदे करण्याचा, त्याची अंमलबजावणी करण्याचा अधिकार शासनसंस्थेला मिळाला. मात्र शासन संस्थेने जनमताच्या विरोधी कायदे केले तर ते बदलण्याचा अधिकार जनतेला आहे. असे लॉकने सांगितले.

रुसोचा सामाजिक करार सिध्दांत :–

1762 मध्ये ''द सोशल कॉन्ट्रॅक्ट'' या ग्रंथात रूसोने आपली सामाजिक करारासंबंधी मते मांडली.

सामाजिक कराराचे कारण :–

रुसोच्या मते, निसर्ग अवस्था जास्त काळ टिकली नाही. लोकसंख्येची वाढ, कुटुंबसंस्था व खाजगी मालमत्तेचा उदय यामुळे मानव स्वार्थी बनला. तुझे आणि माझे असा भेदभाव सुरु झाला. स्वार्थामुळे परंपरागत संघर्ष सुरु झाला. या संघर्षामुळे व्यक्तीचे जीवन असह्म झाले. यातून सुटका करण्यासाठी मनुष्यांनी आपआपसात करार केला.

सामाजिक कराराचे स्वरुप :–

रुसोच्या मते, राज्य व समाजासाठी एकच करार झाला. त्यातून राज्य व समाजाची निर्मिती झाली. व्यक्तींनी आपले नैसर्गिक अधिकार संघटीत समाजाला अर्पण केले. त्यामुळे सर्वांना समाजात समान भागिदारी मिळून सार्वभौम सत्तेत समान हिस्सा मिळाला. स्वातंत्र्याचे संरक्षण होवून, स्वातंत्र्य सुरक्षित राहिले. तर शासनसंस्था मर्यादित असून ती करारातून निर्माण झाली आहे.

सामाजिक करार सिध्दांताचे मुल्यमापन :– ;

या सिध्दांतावर अनेक शास्त्रज्ञांनी टीका केली आहे. सर फ्रेंडरिक पोलॉक यांच्या मते, हा सिध्दांत म्हणजे ''राजकीय क्षेत्रातील अनेक फसवणूकीपैकी अत्यंत यशस्वी आणि घातक ठरलेलरी फसवणूक आहे.'' असे मत माडले. जर्मन राज्यशास्त्रज्ञ ब्लंटशी याने, ''राज्य आणि राज्यातील संस्था व्यक्तीच्या लहरीवर आधारीत असतात.'' असे हा सिध्दांत प्रतिपादन करत असल्यामुळे घातक आहे असे मत मांडले. अशी टीका विचारवंतानी केली आहे. त्यातील महत्वाचे काही दोष पुढीलप्रमाणे –

1. अनैतिहासिक :– राज्य करार करुन स्थापन झाल्याचे एकही उदाहरण नाही त्यामुळे हा सिध्दांत अनैतिहासिक वाटतो.

2. कराराची कल्पना अशक्य :– जिवीताच्या व वित्ताच्या संरक्षणासाठी व्यक्तींनी करार केला असे सांगितले जाते. परंतू पूर्वीच्या काळी कुटूंबसंस्थेमुळे व्यक्तींना स्वतंत्र स्थान नव्हते. त्यामूळे व्यक्तीनी करार केला कसा.
3. नैसर्गिक स्वातंत्र्य अशक्य :– निसर्गावस्थेतील व्यक्तींना नैसर्गिक स्वातंत्र्य होते. असे हा सिध्दांत सांगतो. परंतु हक्कासाठी सुसंघटीत समाजाची कायदयाची गरज असते व त्यावेळी या सर्व गोष्टीचा अभाव होता. त्यामुळे त्याकाळी नैसर्गिक स्वातंत्र्य, हक्क याचे विवेचन अयोग्य वाटते.
4. कराराची विसंगती :– करारात दोन पक्ष असावे लागतात. हॉब्जने वर्णन केलेला करार हा एकपक्षीय आहे. तसेच रुसोने हा करार व्यक्तीने दोन निरनिराळया भूमिका स्वीकारुन केला आहे असे सांगितले आहे.
5. राज्यात अराजकता :– ब्लंटशी यांच्या मते, राज्य हे व्यक्तीच्या लहरीवर अवलंबून ठेवणे म्हणजे अराजक व गोंधळाला आमंत्रण देण्यासारखे आहे.

या सिध्दांतात अनेक दोष असले तरी राज्यसंस्थेच्या विश्लेषणात हा सिध्दांत उपयुक्त आहे. राजकीय तत्वज्ञानाचा स्वतंत्रपणे विकास होण्यास या सिध्दांताने मदत केली. अनियंत्रित राजसत्तेवर दैवी सत्तेचे नियंत्रण असते असे हॉब्जने सुचविले. त्यानंतर लॉकने लोकसंमती राज्यसंमतीचा आधार असून जुलमी सत्तेविरुध्द आवाज उठवण्याचा जनतेला हक्क आहे असे सांगितले. रुसोने शासन संस्थेची सत्ता सामुहीक ईहा केव्हाही काढून घेवू शकते. जनतेचे सार्वभौमत्व व लोकशाही तत्वाचा त्याने पुरस्कार केला. लोकशाही विकासाला मदत झाली. सार्वभौमत्वाच्या कल्पनेचा विकास होण्यास हॉब्ज, लॉक, रुसो यांच्या विचारामुळे चालना मिळाली हे राज्यशास्त्रीय योगदान महत्वाचे आहे.

3. ऐतिहासिक किंवा उत्क्रांतीवादी सिध्दांत :–

राज्याच्या उदयासंबंधी जे निरनिराळे सिध्दांत मांडले आहेत ते एकांगी स्वरुपाचे आहेत. राज्याच्या उदयासंबंधी ते योग्य स्पष्टीकरण देवू शकत नाहीत. डॉ. गार्नर यांच्या मतानुसार राज्य देवाने निर्मान केलेले अगर शक्तीच्या जोरावर स्थापन झालेले किंवा करार करून निर्माण झालेले नाही. तर मनुष्यांच्या दैनंदिन गरजातून सामाजिक गरजातून निर्माण झाले असून मुलभूत मानवी प्रवृत्तीच्या मदतीने टिकून आहे. तर प्राथमिक अवस्थेत गरजा कमी होत्या. समाजाच्या राजकीय संघटनेचे कार्यक्षेत्र मर्यादित होते. मानवी गरजा वाढल्यामुळे राज्यसंस्थेचे आणि राजकीय सत्तेचे कार्यक्षेत्र, अधिकार वाढत जावून त्याला आजचे स्वरुप प्राप्त झाले. अशा प्रकारे राज्याचा विकास उत्क्रांतीतून झाला.

प्रो. बर्जेस यांच्या मते, ''राज्य हे इतिहास निर्मित आहे या विधानाचा अर्थ असा की, राज्य हे मानवी समाजाच्या अपूर्ण आणि अप्रगत अशा अवस्थेकडून पूर्ण आणि विश्वव्यापी मानवी संघटनेची स्थापना करण्याच्या दिशेने क्रमाक्रमाणे आणि अखंडपणे होणाऱ्या विकासाचे फळ आहे.'' डॉ. आर्शिवादन यांच्या मते, राज्य हे ऐतिहासिक दृष्टीने मनुष्याच्या विकसनशील शक्तीचा परिणाम आहे. ते कोणत्याही विशिष्ट वेळी निर्माण झाले नाही.

मनुष्याच्या समाजशील प्रवृत्तीमधून समाज व समाजाचा विकास होवून राज्य निर्माण झाले. हेन्री मेन विकासवादी दृष्टीकोण स्पष्ट करताना म्हणतात की, ''कुटूंबाच्या विकासामुळे कुळ, कुळापासून जमाती, टोळी व नंतर राज्य निर्माण झाले. अशारितीने राज्याचा विकास होताना त्याला पुढील घटक कारणीभूत ठरले.
1. मानवी सहज प्रवृत्ती – मनुष्य हा समाजप्रिय प्राणी आहे आणि तो संघ करुन राहतो. समान स्वभाव व समान हेतू यामुळे व्यक्ती एकत्रित येवून गट बनवतात. गटाच्या संघटना होतात, त्यातून राज्यसंस्थेची निर्मिती होते. ॲरिस्टॉटलच्या मते, ''मनुष्य हा राजकीय प्राणी आहे.'' या नैसर्गिक प्रवृत्ती आणि विचार या दोहोंचा परिणाम होवून राज्याची निर्मिती आणि विकास होतो.

2. रक्तसंबंध – प्राचीन काळी एका रक्तापासून निर्माण झालेली माणसे एकत्र येत. रक्तसंबंधातून कुटूंबसंस्था निर्माण झाली व कुटूंब प्रमुखाची सत्ता कुटुबांवर अनिर्बधपणे चालू लागली. कुटूंबाचा विकास होवून कुळ, कुळापासून गण व गणाचे राज्यात रुपांतर झाले. गण प्रमुखाची सत्ता गणातील सर्व लोकांवर चालत. गणाचे कार्यक्षेत्र वाढून राज्य निर्माण झाले. प्रा. मॅकायव्हर यांच्या मते, रक्तसंबंधापासून समाज निर्माण झाला. समाजाकडून राज्य निर्माण झाले. कुटूंबावस्थेत श्रमविभाजन, सहकार्य व संरक्षण या गोष्टी समाजाचे राज्यात रुपांतर करण्यास कारणीभूत ठरल्या.

3. धर्म – प्राचीनकाळी मानवी बुध्दीला नैसर्गिक घटना, चमत्कार याचा अर्थ समजत नसल्यामुळे निसर्गाबद्दल आश्चर्य, भीती वाटत असे. अशा शक्तीचा कोप होवू नये म्हणून पूजा करणे, बळी देणे असे प्रकार करुन देव व निसर्गाला प्रसन्न ठेवण्याचा प्रयत्न मानव करु लागला. त्यातून अनेक रुढी, प्रथा निर्माण झाल्या. लोकांच्या मनात असलेली भीती, अज्ञान याचा फायदा घेवून पुरोहीत, धर्मगुरुंनी आपली सत्ता प्रस्थापित केली. काही ठिकाणी धर्मगुरुंनी राजाची भुमिका स्वीकारली.

4. युध्द किंवा सत्ता – रक्तसंबंध, धर्म यांचे महत्व कमी होवून प्रादेशिक निष्ठा महत्वाची ठरु लागली. एका विशिष्ठ प्रदेशात राहणाऱ्या लोकांचा मोठा गट निर्माण झाला. दुसऱ्या गटावर आक्रमण करणे इतरांचे आक्रमण झाल्यास संरक्षण करणे यासाठी शूर व युध्दनिपूण नेत्याची गरज वाटू लागली. अशा नेत्यांच्या अंगी असणाऱ्या कर्तृत्वामुळे सैन्यावर आणि समाजातील इतर संघटनावर त्याचे वर्चस्व झाले व कालांतराने तो सत्ताधीश बनला त्याने समाजातील सर्व व्यक्ती आणि संघटना यांना आपल्या नियंत्रणाखाली आणले. त्यांने अंतर्गत शांतता आणि परकीय आक्रमणापासून रक्षण करण्याची जबाबदारी स्वीकारली.

5. राजकीय विचार जागृती – राज्यसंस्थेच्या विकासात राजकीय जाणीव, जागरुकतेला फार महत्व आहे. राजकीय संघटनेमार्फत साध्य करायच्या ध्येयाची जाणीव म्हणजे राजकीय जागरुकता होय. समाजाच्या प्राथमिक अवस्थेत राजकीय विचार स्पष्ट नसतील पण समाजाचे जीवन जसे विकसित होत गेले तसतशी त्यांची राजकीय उद्दीष्टे स्पष्ट झाली. अशाप्रकारे राज्यनिर्मितीवर राजकीय विचार जागृतीचा प्रभाव पडला.

ड. सारांश :–

राज्याच्या निर्मितीबाबत ऐतिहासिक सिध्दांताने सर्वांगीण विचार केला आहे. इतर सिध्दांतानी राज्यनिर्मितीला कारणीभूत असणाऱ्या अनेक घटकापैकी एक घटक महत्वाचा ठरला आहे. उदा. शक्ती सिध्दांतात शक्ती किंवा सामर्थ्याला महत्व दिले आहे. सामाजिक करार सिध्दांतात लोकमत आणि जनतेची मान्यता महत्वाची मानली आहे. उलट राजसंस्था अस्त्विात आली ती अनेक प्रवृत्तीच्यामुळे. या प्रक्रियेस किती काळ लागला असेल ते सांगता येत नाही. जगातील वेगवेगळया भागात राज्यसंस्था अस्तित्वात येण्यास कमी अधिक प्रमाणांत वेगवेगळे घटक कारणीभूत झाले असतील. या सर्वाचा सारांश म्हणजे आधुनिक काळात आढळून येणारी राज्यसंस्था ही मानवाने जाणीवपूर्वक केलेल्या विविध प्रयत्नांचे फळ आहे.

प्रश्न 2 रा राज्य ही संकल्पणा स्पष्ट करून राज्याच्या उदयाचा सामाजिक करार सिध्दांत स्पष्ट करा.

अ. प्रास्ताविक :–

प्राचीन काळात टोळयांनी एकत्र येवून समाज, समाजातून, प्रदेश व प्रदेशातून राज्ये निर्माण झाली. असे अनेक अभ्यासावरून लक्षात येते. परंतू राज्याच्या उदयाची प्रक्रिया आणि त्याचा घटनाक्रम यांचा शोध होण्याऐवजी राज्याच्या उदयामागील कार्यकारणभाव शोधून काढण्याचे प्रयत्न काही राज्यशास्त्रज्ञानी केले आहेत. त्यांच्या तात्विक विवेचनातून राज्याच्या उदयाचे सिध्दांत मांडण्यात आले आहेत.

ब. सामाजिक करार सिध्दांत –

राज्याची निर्मिती कशी झाली याचे विवेचन करणारे अनेक सिध्दांत आहेत. त्यापैकी सामाजिक करार हा एक सिध्दांत आहे. राजकीय इतिहासामध्ये सामाजिक करार सिध्दांताला फार महत्व आहे. विशेषतः 18 व्या शतकात या सिध्दांतामुळे अनेक लोक, विचारवंत प्रभावीत झाले आहेत.

सामाजिक कराराच्या सिध्दांताचा मुख्य आशय असा की, समाज जीवनाच्या प्रारंभी राज्य व शासन संस्थाही नव्हती. पुढे शासनयंत्रणेची गरज भासू लागली. या अनुशंगाने मानवी समाजाच्या इतिहासात दोन टप्पे पडतात. एक राज्याच्या उत्पत्तीपूर्वीचा व दुसरा राज्याच्या उत्पत्तीनंतरचा. पहिल्या टप्यात राज्य, शासनयंत्रणा व कायदयाची अंमलबजावणी करणारी सत्ता नव्हती. या स्थितीस त्यांनी नैसर्गिक अवस्था असे नांव दिले. या नैसर्गिक अवस्थेत मानवाला फक्त निसर्गाने दिलेले हक्कच उपलब्ध होते. ''बळी तो कान पिळी'' अशी अवस्था होती. त्यामुळे मानवी वर्तणुकीचे नियमन करणाऱ्या व्यवस्थेची गरज भासू लागली. अशावेळी नैसर्गिक स्वातंत्र्य काही अंशी कमी करुन शासनयंत्रणा उभारण्यात शासक व जनता यांच्यात परस्परात करार झाले. त्यांतूनच राज्यसंस्था अस्तित्वात आली. थोडक्यात, 'राज्य हे करारातून निर्माण झाले.' असे या सिध्दांताचे म्हणणे आहे. राज्यसंस्था अस्तित्वात येण्यापूर्वी मानवी जीवन कसे होते? त्यांनी राजकीय संस्था कशी निर्माण केली? हा करार कोणाकोणामध्ये झाला? इत्यादी बाबीची मांडणी हॉब्ज, लॉक व रुसो यांनी केली. त्यांच्या मते, राज्याचा उदय अशा प्रकारचा सामाजिक करारात झाला त्यापूर्वी राज्य नव्हते. ते नंतर अस्तित्वात आले.

क. सामाजिक करार सिध्दांताचा इतिहास :

राज्याची उत्पत्ती मानवाच्या संमतीनेच झाली. असा विचार प्राचीन भारतीय राज्यशास्त्रीय ग्रंथात आढळतो. शुक्र, मनु, वेदमहर्षी व्यास यांनीही हा सिध्दांत थोडया फार फरकाने सांगितला आहे. महाभारताच्या शांतीपर्वात असे म्हटले आहे की, पृथ्वीवरील अराजकाला कंटाळून लोक ब्रह्मदेवाकडे गेले. ब्रह्मदेवाने 'मनू'ला पृथ्वीवरील अराजता थांबविण्यास पाठविले. लोकांनी मनूशी करार करुन आपल्या उत्पन्नातील काही भाग त्याला देण्याचे मान्य केले. कौटिल्याच्या 'अर्थशास्त्र' ग्रंथातही असा उल्लेख आहे. पुढे रोमन साम्राज्यात राजाला मिळालेले अधिकार प्रजेच्या संमतीतून मिळाले असे सांगितले आहे. मध्ययुगीन काळांतही बायबलच्या जुन्या करारातसुध्दा राजा, प्रजा यांच्यातील कराराचा उल्लेख आढळतो.

1. थॉमस हॉब्जचा सामाजिक करार सिध्दांत :–

थॉमस हॉब्ज या ब्रिटीश विचारवंताने 1651 मध्ये 'लेव्हिएथन' हा ग्रंथ लिहिला. इंग्लंडमधील यादवी, युध्द, पहिल्या चार्लसला दिलेली फाशीची शिक्षा या ऐतिहासिक घटना आणि त्या काळात निर्माण झालेली अस्थिर परिस्थिती व अराजकता यांतुन मार्ग काढण्यासाठी अनियंत्रित राजसत्ता असल्याशिवाय शांतता, सुव्यवस्था निर्माण होणार नाही. हे प्रतिपादन करण्यासाठी हॉब्जने या सिध्दांताचा पुरस्कार केला.

मानवी स्वभाव निसर्गावस्था :–

हॉब्जच्या मते, मानव हा स्वभावाने स्वार्थी असून निसर्गप्रवृत्तीमुळे कार्यशील होतो. प्राचीन काळात मानव जात नैसर्गिक अवस्थेत राहात होती. नैसर्गिक प्रवृत्तीचा जोर व सत्तेची अभिलाषा या दोनच गोष्टी मानवी कृतीस प्रेरणा देतात. प्रत्येक व्यक्ती आपल्या पोषणासाठी प्रयत्न करीत असल्यामुळे व्यक्तीव्यक्तीमध्ये संघर्ष वाढत जातात. या अवस्थेत मानवाचे जीवन 'एकाकी' 'दरिद्री', 'तिरस्कारणीय', 'पाशवी', पशुतत्व स्वरुपाचे होते. ''बळी तो कान पिळी'' हाच त्या काळचा न्याय होता.

सामाजिक करार :–

निसर्गावस्थेत नैसर्गिक नियम पाळले जात होते. स्वतःचे जीवित सुरक्षित ठेवण्यासाठी प्रत्येक व्यक्ती शक्तीचा उपयोग करीत असे. हेच तिचे नैसर्गिक स्वातंत्र्य होते व ते सर्वांना मान्य होते. अशा अवस्थेत संघर्ष

नाहीसा झाला तर अधिक बरे होईल असे मानवास वाटू लागले. यासाठी काही नैसर्गिक हक्क सोडून सुखात रहावे असे सर्वांना वाटू लागले. ही सुप्त मानवी प्रेरणा प्रबळ होवून व्यक्तीव्यक्तीत एक सामाजिक करार झाला. ''तू जर आपली शक्ती माझ्याविरुध्द वापरणार नसशील तर मीही माझी शक्ती तुझ्याविरुध्द वापरणार नाही.'' अशा प्रकारचा करार होवून राज्यसंस्था निर्माण झाली. हॉब्जच्या मतानुसार करार म्हणजे सामुहिक सत्तेला केलेले समर्थन होय.

हॉब्जच्या सामाजिक कराराची वैशिष्टये :–

1) निसर्ग अवस्थेत प्रत्येक व्यक्तीने स्वइच्छेने करार केला.

2) या करारान्वये राजा आणि राज्य निर्माण झाले.

3) या करारानुसार राजाच्या आज्ञा पाळण्याचे सर्वाच्यावर बंधनकारक आहे.

4) सार्वभौम राज्यसंस्था जेवढे अधिकार देईल तेवढेच अधिकार प्रजेला मिळतील.

5) राजकर्त्यांना विरोध करण्याचा अधिकार प्रजेला नाही.

हॉब्जच्या विचारांचे परिक्षण :–

आधुनिक युरोपमध्ये आणि राज्यशास्त्रात हॉब्जच्या विचारांना अत्यंत महत्वपूर्ण स्थान आहे. बुध्दीग्राहय विचारसरणी विशेषतः भूमितीतील सिध्दांताप्रमाणे विचार करण्याची काटेकोर पध्दती, तर्कशुध्द युक्तीवाद यामुळे हॉब्जने घेतलेली गृहितकृत्ये खरी मानली तर त्याने काढलेले निष्कर्ष अटळ वाटतात.

गुण :– 1 सामाजिक करारामूळे शासनसंस्थेला अधिष्ठान मिळते.

2 व्यक्तीचे रक्षण करणे हेच राज्याचे उद्दिष्ट आहे. शासननिर्मिती व्यक्ती संरक्षणासाठीच झाली. व्यक्ती संरक्षणासाठीच कायदा आहे. त्याचे पालन सर्वानी करणे आवश्यक आहे.

3 धर्मसंस्था ही सार्वभौम राज्यसंस्थेच्या नियंत्रणात असावी, धर्माचे राज्यसंस्थेवरील वर्चस्व हॉब्जने नाकारले.

4 व्यक्तीचे संरक्षण जोपर्यंत शासन करते तोपर्यंत शासनाला विरोध अशक्य आहे.

दोष :– मनुष्य हा स्वभावतः स्वार्थी, दुष्ट आणि आक्रमक असतो. असे हॉब्जने गृहित धरले आहे. वस्तुतः मनुष्य हा समाजप्रिय, विचार करणारा, बुध्दीवादी समाजनिष्ठ प्राणी आहे असे ॲरिस्टॉटलचे मत आहे. तसेच हॉब्जने मानवी सहअस्त्वि प्रवृत्तीकडे दुर्लक्ष केले.

थोडक्यात हॉब्जच्या विचारात गुणदोष असले तरी राज्यशास्त्रात व्यक्तीस्वातंत्र्य आणि सार्वभौम सत्ता यांच्यातील संघर्षाची जाणीव त्याने करून दिली. राजसत्तेला जनसंमतीची आवश्यकता असते हे त्याने दाखवून दिले. राज्य करारानुसार निर्माण झाले ही कल्पना पुढे अमान्य झाली तरी समाजाच्या ती संमतीवर आधारीत आहे. हे महत्वाचे तत्व त्यांनी प्रतिपादन केले.

2. जॉन लॉकचा सामाजिक करार :–

जॉन लॉक हा ब्रिटीश विचारवंत आहे. त्याने नियंत्रित राजसत्तेचा पुरस्कार करताना सामाजिक करार सिध्दांताचा आधार घेतला. इ. स. 1688 ब्रिटनमध्ये रक्तहीन राज्यक्रांती होवून लोकांनी विल्यम आणि मेरी यांना गादीवर बसवले. लॉकने या राजयक्रांतीचे समर्थन केले. राजाने प्रजेच्या अधिकाराचे संरक्षण केले नाही तर राजाला पदच्यूत करण्याचा अधिकार प्रजेला आहे. हे तत्व प्रतिपादन करण्यासाठी इ. स. 1690 मध्ये लॉकने Two Treatises of Civil Government या ग्रंथात जनतेच्या संमतीवर राज्याची सत्ता अवलंबून असते. अशी विचारप्रणाली मांडून सामाजिक कराराच्या सिध्दांताला वेगळे वलय दिले.

निसर्गावस्था आणि मनुष्यस्वभाव :–

नैसर्गिक स्थितीत सर्व व्यक्ती समान व स्वतंत्र होत्या. प्रत्येकाला स्वतःच्या आवडीनुसार वागण्याचे स्वातंत्र्य होते. परंतु हे स्वातंत्र्य अमर्याद नव्हते. नैसर्गिक कायदयांचे मानवावर सर्वसामान्यपणे नियंत्रण होते.

कोणीही दुसऱ्या व्यक्तीच्या जीवीतावर अथवा मालमत्तेवर आक्रमण करु शकत नव्हते. परिश्रमपूर्वक न्यायमार्गाने संपत्ती मिळवणे, तिची वाढ करणे व ती सुरक्षित ठेवणे हाच मनुष्यस्वभाव होता.

सामाजिक कराराचे स्वरुप :–

लॉकच्या मते, निसर्गावस्थेतील प्रत्येक व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीशी करार केला. आपल्या इच्छेनुसार निसर्गनियमांचा अर्थ लावण्याचा अधिकार करारानुसार स्थापन झालेल्या समाजाकडे दिला. या करारानुसार राज्याची स्थापना झाल्यामुळे त्यास सामाजिक करार म्हणतात. या करारानुसार व्यक्तीनी आपले नैसर्गिक अधिकार राखून ठेवले व काही विशिष्ट अधिकार समाजाला दिले.

या कराराने समाज निर्माण झाला हे खरे, पण निसर्गनियमांची अंमलबजावणी करण्याची आवश्यकता वाटू लागली. त्यासाठी सामाजिक घटक या नात्याने एका मनुष्याने आणखी एक करार केला. त्याला शासनसंस्थेचा करार म्हणतात. या करारानुसार शासनसंस्था स्थापन होवून कायदे करण्याचा, ते अंमलात आणण्याचा अधिकार शासनसंस्थेला मिळाला. मात्र शासन संस्थेने जनमताच्या विरोधी कायदे केले तर ते सनदशीर किंवा क्रांतीच्या मार्गाने शासनसंस्था बदलण्याचा अधिकार जनतेला आहे. हे त्याने प्रतिपादन केले.

लॉकच्या विचाराचे परिक्षण :–

1) जबाबदार शासनपध्दतीचा पुरस्कार करून अनियंत्रित राजेशाहीला त्याने विरोध केला.

2) सार्वभौम सत्ता जनतेकडे असते, जनता शासनसंस्थेवर नियंत्रण ठेवते असे लॉकने स्पष्ट केले.

3) शासनसंस्थेने जनतेचे विश्वस्त या नात्याने राज्यकारभार करावा. जनमतविरोधी निर्णय शासनसंस्था घेत असेल तर ती शासनसंस्था बदलण्याचा अधिकार जनतेला आहे.

4) सामाजिक हित हेच कायदयाचे उद्दिष्ट असावे.

5) धर्म व राजकारणाची फारकत करावी कारण धर्मनिरपेक्ष राजकारण श्रेष्ठ व महत्वाचे असते.

दोष :– सामाजिक कराराचा अवलंब करून राज्य निर्माण झाल्याचा कोणताही ऐतिहासिक पुरावा नाही. लॉकचे निसर्गावस्थेतील रेखाटलेले मानवी जीवननाचे चित्र काल्पनिक व अवास्तव आहे. अशा प्रकारे दोष आढळून येत असले तरी निसर्गदत्त हक्क, प्रतिनिधीक लोकशाही, कायदेमंडळाचे महत्व इत्यादी कल्पना लोकप्रिय करण्याचे श्रेय लॉकला दयावे लागते.

3. रुसोचा सामाजिक करार सिध्दांत :–

इ.स. 1762 मध्ये ''द सोशल कॉन्ट्रॅक्ट'' या ग्रंथात रूसोने आपली सामाजिक करारासंबंधी मते मांडली. या विचारसरणीला दोन कारणामुळे महत्व प्राप्त झााले. फ्रान्सची जूलमी राजसत्ता नष्ट करण्यांस फ्रेंच राजक्रांतीस वैचारिक खुराक या विचारसरणीने दिले आणि जनतेचे सार्वभौमत्व हे तत्व या विचारसरणीवर आधारीत मान्य केले आहे.

मणुष्य स्वभाव व निसर्गावस्था :–

निसर्गावस्थेतील मानवी जीवन स्वातंत्र्य, समता यांनी भरले होते. मानवात संघर्ष नव्हता. 'शांतता, सुव्यवस्था आणि स्वयंपूर्णता' हेच निसर्गावस्थेतील जीवनाचे वैशिष्टय होते. निसर्गावस्थेत मनुष्य निष्पाप जीवन जगत होता. ही अवस्था आजच्या संस्कृत समाजापेक्षा चांगली होती. या अवस्थेला रुसोने 'स्वर्गतूल्य' अवस्था असे म्हटले आहे. या अवस्थेकडे चला असा सल्ला रुसो देतो.

सामाजिक कराराचे कारण :–

रुसोच्या मते, निसर्ग अवस्था जास्त काळ टिकली नाही. लोकसंख्येची वाढ, बुध्दीची वाढ, कुटुंबसंस्था व खाजगी मालमत्तेचा उदय, यामुळे मानवाची पूर्वीची निरागस वृत्ती जावून तो स्वार्थी बनला. तुझे आणि माझे असा भेदभाव सुरु झाला. समता नष्ट झाली. स्वार्थामुळे परंपरागत संघर्ष सुरु झाला. अशा संघर्षामुळे व्यक्तीचे जीवन असह्म झाले. यातून सुटका करण्यासाठी मनुष्यांनी आपआपसात करार केला.

कराराचे स्वरुप :–

रुसोच्या मते, राज्य व समाजासाठी एकच करार झाला. त्यातून राज्य व समाजाची निर्मिती झाली. व्यक्तीनी आपले नैसर्गिक अधिकार संघटीत समाजाला अर्पण केले. त्यामुळे सर्वांना समाजात समान भागिदारी मिळून सार्वभौम सत्तेत समान हिस्सा मिळाला. स्वातंत्र्याचे संरक्षण होवून, स्वातंत्र्य सुरक्षित राहिले.

शासनसंस्था :–

रुसोने लोकशाहीचा पुरस्कार केला. त्याने राज्य व शासनसंस्था यांत भेद केला. शासनसंस्था मर्यादित असून ती करारातून निर्माण झाली आहे. शासनसंस्था जनतेची प्रतिकृती असुन जनतेची इच्छा असेपर्यंतच ती सत्तेवर राहते.

रुसोच्या विचाराचे मूल्यमापन –

गुण :– रूसोने लोकशाहीचा पाया घातला. त्याला आधूनिक लोकशाहीचा प्रणेता म्हणतात. रूसोने जनतेचे सार्वभौमत्व सांगून अनियंत्रित राजसत्तेला धक्का दिला. लोकशाही विचारांना, फ्रेंच राज्यक्रांतीला चालना दिली. यातूनच समता, स्वातंत्र, बंधुता या तत्वाच्या विचारांना चालना मिळाली.

दोष :– :– रुसोचा सामाजिक करार काल्पनिक आहे. त्याला ऐतिहासिक आधार नाही. करारानंतर समाज व राज्य निर्माण झाले. शासनसंस्था समाजाने निर्माण केली. असे सांगून त्याने शासनास गौण स्थान दिले.

अशा स्वरुपाचे दोष रुसोच्या सामाजिक कराराच्या सिध्दांतात असले तरी त्याची मानवी हिताची कळकळ, प्रामाणिकपणा, त्याची मनोभावना व त्याच्या लिखाणात दिसून येणारे उत्कट प्रयत्न या गोष्टी महत्वाच्या आहेत. परंतु रुसोचे विचार प्रत्यक्षात आनणे कठीण काम आहे.

सामाजिक करार सिध्दांताचे मुल्यमापन :– ;

या सिध्दांतावर अनेक शास्त्रज्ञांनी टीका केली आहे. सर फ्रेंडरिक पोलॉक यांच्या मते, हा सिध्दांत म्हणजे ''राजकीय क्षेत्रातील अनेक फसवणूकीपैकी अत्यंत यशस्वी आणि घातक ठरलेलरी फसवणूक आहे.'' असे मत माडले. जर्मन राज्यशास्त्रज्ञ ब्लंटशी याने, ''राज्य आणि राज्यातील संस्था व्यक्तीच्या लहरीवर आधारीत असतात.'' असे हा सिध्दांत प्रतिपादन करत असल्यामुळे घातक आहे असे मत मांडले. अशी टीका विचारवंतानी केली आहे. त्यातील महत्वाचे काही दोष पुढीलप्रमाणे –

1. अनैतिहासिक :– राज्य करार करुन स्थापन झाल्याचे एकही उदाहरण नाही निसर्गावस्थेतील व्यक्ती अत्यंत साधे जीवन जगत होत्या. राज्य स्थापन करण्याइतकी मानवी बुध्दी प्रगती झाली नव्हती. त्यामुळे हा सिध्दांत अनैतिहासिक वाटतो.

2. कराराची कल्पना अशक्य :– जिवीत व वित्त संरक्षणासाठी व्यक्तींनी असा करार केला असे सांगितले जाते. पूर्वीच्या काळी कुटूंबसंस्थेमुळे व्यक्तींना स्वतंत्र स्थान नव्हते. त्यामूळे व्यक्तीनी असा करार केला हे शक्य वाटत नाही. सर हेन्री मेन यांच्या मते, निसर्गावस्थेतील व्यक्तींनी असा करार केला हे संभवत नाही करार ही संकल्पना अलीकडील काळांत विकसित झाली आहे.

3. सामाजिक भेदभाव :– निसर्गावस्थेतील व्यक्तीचा दर्जा समान होता असे हा सिध्दांत मानतो. परंतु पूर्वीच्या काळी जन्माने दर्जा ठरत असल्यामुळे उच्चनीच भेदभाव केला जात असला पाहिजे.

5. नैसर्गिक स्वातंत्र्य अशक्य :– निसर्गावस्थेतील व्यक्तींना नैसर्गिक स्वातंत्र्य होते. असे हा सिध्दांत सांगतो. परंतु हक्कासाठी सुसंघटीत समाजाची कायदयाची गरज असते व त्यावेळी या सर्व गोष्टीचा अभाव होता. त्यामुळे त्याकाळी नैसर्गिक स्वातंत्र्य, हक्क याचे विवेचन अयोग्य वाटते.

6. कराराची विसंगती :– करारात दोन पक्ष असावे लागतात. त्याची अंमलबजावणी होणारी सत्ता असावी लागते. हॉब्जने वर्णन केलेला करार हा एकपक्षीय आहे असे सांगितले जाते. तसेच रुसोने हा करार व्यक्तीने दोन निरनिराळया भूमिका स्वीकारुन केला आहे असे सांगितले आहे. त्याची अंमलबजावणी करणारी सत्ता सांगितली नाही.

7. राज्यात अराजकता :– जर्मन शास्त्रज्ञ ब्लंटशी यांच्या मते, राज्य हे व्यक्तीच्या लहरीवर अवलंबून ठेवणे म्हणजे अराजक आणि गोंधळ यांना आमंत्रण देण्यासारखेच आहे. राज्य हे कृत्रिम यंत्र आहे असे हा सिध्दांत मानतो परंतु हे सुध्दा नैसर्गिकच असते. कारण मानवाच्या नैसर्गिक प्रवृत्ती आणि गुणधर्म राज्य निर्माण करण्यास कारणीभूत होत असतात. निसर्गावस्था फक्त नैसर्गिक असते आणि राज्य हे अनैसर्गिक आहे असे म्हणणे तर्कदृष्या चूकीचे ठरते.

या सिध्दांतात अनेक दोष असले तरी राज्यसंस्थेच्या विश्लेषणात हा सिध्दांत उपयुक्त आहे. राज्य हे मानवनिर्मित असून ते करारातून निर्माण झाले आहे असे सांगून राज्य हे ईश्वरनिर्मित आहे. असे सांगणाऱ्या सिध्दांताचे महत्व सामाजिक करार सिध्दांताने कमी केले. राजकीय तत्वज्ञानावर धर्मिक कल्पनांचा प्रभाव पडतो तो कमी करुन राजकीय तत्वज्ञानाचा स्वतंत्रपणे विकास होण्यास या सिध्दांताने मदत केली. अनियंत्रित राजसत्तेवर दैवी सत्तेचे नियंत्रण असते असे हॉब्जने सुचविले. त्यानंतर लॉकने लोकसंमती राज्यसंमतीचा आधार असून जुलमी सत्तेविरुध्द आवाज उठवण्याचा जनतेला हक्क आहे असे सांगितले. रुसोने शासन संस्थेची सत्ता सामुहीक ईहा केव्हाही काढून घेवू शकते. जनतेचे सार्वभौमत्व व लोकशाही तत्वाचा त्याने पुरस्कार केला. लोकशाही विकासाला मदत झाली. सार्वभौमत्वाच्या कल्पनेचा विकास होण्यास हॉब्ज, लॉक, रुसो यांच्या विचारामुळे चालना मिळाली हे राज्यशास्त्रीय योगदान महत्वाचे आहे.

प्रश्न 3 रा. राज्य म्हणजे काय ते सांगून राज्याचे घटक स्पष्ट करा. किंवा
राज्य म्हणजे काय ते सांगून राज्याचे मूलभूत घटक विषद करा.

अ. 'राज्या'ची संकल्पना :–

राज्य ही संकल्पना सोळाव्या शतकापर्यंत आजच्या अर्थाने प्रचलित झाली नव्हती. मॅकियाव्हॅलीने आपल्या 'प्रिन्स' या 1523 मध्ये प्रसिध्द झालेल्या पुस्तकात प्रथम या संकल्पनेचा उपयोग केलेला आढळतो. ग्रीकांनी या शब्दाच्या जवळपास येणारा Polis हा शब्द नगर या अर्थाने वापरला. त्यांनी तो शब्द योग्य अर्थाने वापरला. रोमन लोकांनी 'सिव्हिटास' हा शब्द वापरला. त्याचा अर्थही ग्रीकांच्या अर्थाशी जवळचा असा होतो. त्यानंतर जवळजवळ संपूर्ण मध्ययुगीन काळात आजच्या राज्य या संकल्पनेशी संबंधित शब्द वापरलेला दिसतो. कारणही स्वाभाविक होते. आज राज्याचे आवश्यक घटक म्हणून जे मानले गेले आहेत त्या घटकांनी परिपूर्ण अशी राजकीय संघटना अस्तित्वात येत होती. सार्वभौम सत्तेचे स्वरुप स्पष्ट होत होते. अशा काळात त्यानुरुप शब्द वापरणे स्वाभाविक होते. सोळाव्या सतराव्या शतकात सार्वभौम सत्तेची कल्पना स्पष्ट होऊ लागल्यानंतर राज्याची व्याख्या स्पष्ट होऊ लागली. मॅकियाव्हॅलीनंतर राज्य ही संकल्पना मान्य स्वरुपात थोडयाशा निश्चित अर्थाने वापरली जाऊ लागली.

आजही राज्य हा शब्द वापरताना नेहमीच विशेष काळजीपूर्वक वापरला जातो असे नाही. राज्य, राष्ट्र, शासन, सरकार, समाज, देश असे अनेक शब्द आपण समानार्थी म्हणून सहजरित्या वापरत असतो. यातील प्रत्येक शब्द इतरांपासून निराळा आहे. राज्यशास्त्राची अभ्यासू मंडळीसुधा संघराज्याच्या घटकांना उद्देशून राज्य शब्द वापरतात. शासनावरती करावयाची टीका राज्याच्या नावाने करतात. परिणामी, या शब्दाच्या अर्थासंबंधी एक अनिश्चितता निर्माण होते.

ब. राज्याची व्याख्या :–

जर्मन लेखक शुल्झा यांच्या मते, 'राज्याच्या अनेक व्याख्या आहेत. या व्याख्यातील कोणत्याही दोन घेतल्या तरी त्यामध्ये साम्य आढळणार नाही.' साम्यवादी आणि लोकशाहीवादी यांनी दिलेल्या व्याख्या परस्परविरोधी असणे स्वाभाविक आहे.

ॲरिस्टॉटलच्या मते, राज्यसंस्था ही केवळ मानवाचे जीवन सुरक्षित करण्यासाठी अस्तित्वात नसून मानवी जीवन सुखी करण्यासाठी अस्तित्वात आहे.'स्वयंपूर्ण, सुखी, प्रतिष्ठेचे जीवन जगण्यासाठी निर्माण झालेली, कुटूंबसंस्था व खेडी यांची संघटना म्हणजेच राज्य होय'. असे ॲरिस्टॉटलचे मत आहे. त्याच्या मते इतर सर्व संस्था असल्यामुळे तिचे ध्येय, सर्वोत्कृष्ट जीवन निर्माण करण्याचे असणे आवश्यक आहे.

आधुनिक काळातील अनेक विचारवंतानी राज्याच्या व्याख्या केलेल्या आहेत. या व्याख्यांपैकी बर्जेस यांनी केलेली व्याख्या पुढीलप्रमाणे आहे. ''मानवी समाजाचा एक संघटित म्हणून मानला गेलेला भाग म्हणजे राज्य होय.'' ब्लॅटशी म्हणतात, ''एका विशिष्ट भूभागावर राजकीयदृष्टया संघटीत झालेले लोक म्हणजे राज्य होय.'' बर्जेस व ब्लॅटशी यांच्या व्याख्या फार जवळच्या अर्थाच्या वाटतात.

अध्यक्ष विल्सन यांच्या मते, ''एका विशिष्ट भूभागावर विधिनियमांच्या आधारित राज्यकारभारासाठी संघटित झालेले लोक म्हणजे राज्य होय.'' गार्नर यांनी केलेली व्याख्या आज सर्वांना मान्य अशी वाटते. त्यांच्या मते, ''निश्चित भूभागावर कमी अधिक संख्येत कायम राहणारा, बाह्य नियंत्रणापासून स्वतंत्र किंवा बहुतांशी स्वतंत्र असणारा समाज म्हणजे राज्य होय. या समाजातील लोकांची एक सुसंघटित शासनसंस्था असून त्याची आज्ञा बहुसंख्य लोक स्वभावतःच पाळतात.''

मॅकायव्हरने ''राज्य ही विधिनियमानुसार कार्य करणारी संघटना आहे. यासाठी शासनाला दंडशक्ती देण्यात आली आहे. या दंडशक्तीच्या मदतीने शासन एका विशिष्ट प्रदेशात राहणाऱ्या लोकसमूहाची परिस्थिती सुव्यवस्थित राखते,'' असे मानले आहे.

क. राज्याचे आवश्यक घटक :—

वरील व्याख्यांच्या आधारे राज्याचे चार आवश्यक घटक आहेत, असे म्हणता येते.

1. समान हेतूसाठी एकत्र येवून संघटनात्मक स्वरुप प्राप्त केलेला लोकसमुदाय.
2. या लोकसमुदायाला स्वतःचे घर वाटणारा निश्चित असा भूभाग. लोक या भूभागावर कायम स्वरुपात वास्तव्य करून राहतात.
3. बाह्यनियंत्रणापासून स्वतंत्र व अंतर्गत सार्वभौमत्व
4. राजकीय संघटना किंवा संस्था की ज्याद्वारे लोकांची ईहा संघटित करून तिची कार्यवाही होते.

ही चारही वैशिष्टये राज्याला आवश्यक आहेत. या चारही घटकांचे लोकसमुदाय, भूभाग, सार्वभौमत्व आणि शासनसंस्था खास महत्व आहे. कोणताही एक घटक नसेल तर राज्य अस्तित्वात येवू शकत नाही.

1) लोकसमुदाय :— लोकसमुदाय नसेल तर राज्य अस्तित्वात येणार नाही. अस्तित्वात येण्याची जरुरी भासणार नाही. असा लोकसमुदाय यामध्ये भेद स्पष्ट होतो. लोकांचा 'संघटित समाज'च एकत्रित राहून विचार करू शकतो. या संघटित समाजाचे राज्य निर्माण हाऊ शकते. या घटकाला राज्याच्या इतर घटकांपेक्षा विशेष स्थान आहे.

लोकसंखेचा आकार :—

लोकसंख्येच्या आकारासंबंधी पूर्वी काही विचारवंतानी साधारण तत्वे घालण्याचा प्रयत्न केला. प्लेटोने 5040 नागरिक असलेले राज्य चांगले मानले. अर्थात नागरिक म्हणजे सर्व लोकसंख्या नव्हे. स्त्रिया, गुलाम यांना नागरिकत्व नव्हते. म्हणजे त्याच्या आदर्श नगरराज्याची लोकसंख्या एक ते दीड लाख असू शकेल. लोकसंख्येच्या मर्यादेचा प्रश्न ॲरिस्टॉटलनेही हाताळला. लोकसंख्या ही मोठी आणि शासकीयदृष्टया सुयोग्य इतकी लहान असावी असे त्याने मानले. सुयोग्य शासनासाठी लोकसंख्या असणे आवश्यक आहे असे काही जुन्या राज्यशास्त्रज्ञांचे मत होते. आज दळणवळणाच्या सोयीमुळे मोठया लोकसंख्येवरदेखील चांगल्या प्रकारे

राज्यकारभार करता येतो. एवढेच नव्हे तर मोठया लोकसंख्येचा योग्य वापरही करणे शक्य झाले आहे. रुसोनेसुध्दा लोकसमुदायातील संख्येचा प्रश्न महत्वाचा मानला. त्याच्या मते, ही संख्या राज्याच्या भूभागावर आकारावर अवलंबून राहील. दोन घटकांमध्ये योग्य प्रमाण असणे आवश्यक आहे. हे प्रमाण निश्चित सांगणे कठीण आहे. कारण केवळ भूभागाचा आकार हा महत्वाचा भाग नसून त्याची उत्पादकता आणि उपलब्ध असलेली नैसर्गिक साधनसंपत्ती यांचाही विचार करावा लागेल. या सर्वांमुळे त्या भूभागावर मिळणाऱ्या उत्पादनावर सुयोग्यरित्या जीवन जगू शकेल एवढी लोकसंख्या ही योग्य लोकसंख्या असे म्हणता येईल.

आकाराशी संबंधित इतर उपघटक :–

केवळ लोकसंख्या भरपूर असली म्हणून ती आवश्यक आहे असे नाही. या लोकांच्या बुध्दीचा दर्जा, प्रयत्नवादीता त्यांचा इतिहास, अन्य लोकांशी येणारा संबंध इत्यादी घटकही महत्वाचे आहेत. शारिरीक सुदृढता, समाजातील स्त्री–पुरुष, तरुण–वृध्द यांचे प्रमाण यांचाही विचार करावा लागेल. ज्या समाजात वृध्द व बालके यांपेक्षा तरुणांचे प्रमाण जास्त आहे तो समाज निश्चित प्रगतीच्या दृष्टीने चांगला असतो. औद्योगिक क्रांतीनंतर या घटकाकडे पाहण्याची दृष्टीच बदलली आहे.उत्पादनासाठी आवश्यक असलेल्या मनुष्यबळाचे महत्व पटल्यानंतर जास्त लोकसंख्या राज्यात असणे हे चांगले समजले जावू लागले. त्यातूनच भूभाच्या वाढीचीही ओढ लागते व शेजारच्या राज्यावर आक्रमण करून तो भाग आपल्या राज्याला जोडण्याची इच्छा अनेक राज्यकर्त्यांना होते.

2) भूभाग :– लोकसमुदाय ज्या भूभागात कायम स्वरूपाचे वास्तव्य करून राहतो, तो भूभाग हा राज्याचा दुसरा महत्वाचा घटक होय. राज्याचया सर्वोच्य सत्तेला, सार्वभौमत्व या भूभागाच्या मर्यादितच अर्थ प्राप्त होतो. कायम स्वरुपाच्या वास्तव्यासाठी निश्चित भूभाग मिळाल्याशिवाय केवळ लोकसमुदाय राज्य निर्माण करु शकत नाहीत. भटक्या जमाती व जमातीचे संघ भूभागाशी मानसिकदृष्टया एकरुप झाल्याशिवाय, त्याबद्दल त्यांना आपुलकी निर्माण झाल्याशिवाय ते राज्य निर्माण करू शकत नाहीत. एकत्वाच्या भावनेला प्रादेशिकतेचा पाया कायम भूभागातून मिळत असतो. येथे भटके राज्य ही विसंगती आहे.

राज्याचा आकार व शासनसंस्थेचा प्रकार :–

राज्याच्या योग्य आकारासंबंधी निश्चित असे नियम देता येणार नाहीत. पूर्वीच्या अनेक विचारवंतांना राज्याच्या आकार लहान असणे योग्य वाटत असे. रुसोच्या मते, राज्याचा आकार योग्य, सुलभ, शासन शक्य होण्याइतका, राज्याला स्वयंपूर्णता देण्याइतका मोठा किंवा लहान असावा. मोठया अकाराच्या राज्यामध्ये शासनयंत्रणा योग्यरित्या काम करू शकत नाही. शासनकेंद्रापासून दूर असलेल्या भागावर नियमांची अंमलबजावणी परिणामकाररित्या होवू शकत नाही. त्यामुळे लहान राज्य चांगली वाटतात.

मोठया आकाराची राज्ये :–

आधुनिक काळात हा विचार बदललेला दिसतो. तो विचार मांडला गेला तेव्हा व त्यापूर्वी वाहतूक व दहणवळणाची साधने प्रगत नसल्यामुळे केवळ एकजिनसी लोकांनी छोटेसे राज्य करून राहण्याची कल्पना मान्य होणे स्वाभाविक होते. आधुनिक काळात स्थानिक स्वराज्यसंस्था, विकेंद्रीकरण, संघराज्य पध्दती यांमुळे मोठया भूभागावर सुलभरित्या राज्यकारभार करणे शक्य आहे. दळणवळणाच्या प्रगत साधनांमुळे प्रादेशिक अंतराचा प्रश्न गौण झाला आहे. आर्थिक व राजकीयदृष्टया मोठया राज्यांना जास्त महत्व प्राप्त होते. मोठया भूभागामध्ये नैसर्गिक साधनसंपत्तीची उपलब्धता जास्त असते. राजकीय स्वातंत्र्य टिकविण्यासाठी मोठया भूभागाचे महत्व आता वाढत आहे.

भूभागाचा आकार व भौगोलिक परिस्थिती :–

भूभागाचा विचार करताना केवळ आकाराचा विचार करून चालत नाही. तर भौगोलिक परिस्थितीचा विचार करावा लागतो. भौगोलिक परिस्थितीमध्ये नैसर्गिक साधने, जमिनीची सुपीकता, दळणवळणाच्या साधनांची उपलब्धता इत्यादी गोष्टींचा विचार करावा लागतो. सर्वात महत्वाचा मुद्दा म्हणजे या भूभागावर राहणाऱ्या लोकांची बुध्दिमत्ता, कार्यशीलता शारीरिक घडण, त्याच्यावर असणारा परंपराचा प्रभाव याचा अभ्यास भूभागाच्या संदर्भात करणे आवश्यक ठरते. भूभागाचा आकार, घडण, भूभागावरील हवामान, भौगोलिक स्थान यांचाही परिणाम होत असतो. भूभागाचा विचार करताना तेथे राहणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाणही महत्वाचे ठरते. राज्याची प्रगती चौरस मैलाशी असलेल्या लोकसंख्येच्या प्रमाणावरही अवलंबून असते. त्याचबरोबर भौगोलिक सलगता, नैसर्गिक सरहद्दी एकजिनसी स्वरुपाचा भूभाग निश्चितपणे चांगला असतो.

3) शासनसंस्था :– शासनसंस्था हा राज्याचा तिसरा महत्वाचा घटक होय. निश्चित भूभागातील लोकसमुदाय राजकीयदृष्टया संघटित झाल्याशिवाय राज्य होवू शकत नाही व राजकीयदृष्टया संघटित समाजाला सुव्यवस्थित कारभारासाठी शासनसंस्था आवश्यक आहे. समाजाला भूभागावरील लोकसमुदायाला शांतता, सुव्यवस्था, स्थैर्य प्राप्त करून देण्यासाठी शासनसंस्था आवश्यक आहे. या शासनसंस्थेच्या पाठीमागे सार्वभौम सत्तेच्या आधारे दंडशक्तीचा वापर करून शासनसंस्था शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करत असते.

शासनसंस्थेची घडण :–

राज्याची उद्दिष्टे स्पष्टपणे व्यक्त करण्यासाठी, त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी खास यंत्रणेची जरुरी असते. ही गरज शासनसंस्थेमार्फत भागवली जाते. या दृष्टीने विचार करताना अमूर्त अशा राज्याचे शासनसंस्था हे मूर्त असे स्वरुप आहे. सर्वसाधारण व्यक्तीच्या दृष्टीने शासनसंस्था म्हणजेच राज्य असते. कारण राज्यातर्फे शासनसंस्था सर्व गोष्टी करत असते. या शासनसंस्थेचे तीन घटक भाग आहेत. विधिमंडळ, कार्यकारीमंडळ व न्यायमंडळ. लोकांची इच्छा विधिमंडळातर्फे व्यक्त केली जाते. त्याचा योग्य अर्थ न्यायमंडळातर्फे लावला जातो. कार्यकारीमंडळ त्याची अंमलबजावणी करत असते. या घटक विभागांना एकत्रितरित्या शासनसंस्था असे म्हणतात.

राज्याचे कार्यकारी यंत्रणा :–

राज्याशिवाय शासनसंस्था असल्याची उदाहरणे आहेत. परंतु राज्य शासन संस्थेशिवाय अस्तित्वात राहू शकत नाही. राज्याची सार्वभौम सत्ता एकत्रितरित्या कार्यान्वित करण्याचे काम शासनसंस्था करत असते. या अर्थाने शासनसंस्था ही राज्याची कार्यकारी यंत्रणा आहे. या संस्थेचे स्वरुप वा प्रकार काय असावा? हा प्रश्न संपूर्णपणे निराळा आहे. शासनपध्दती प्रत्येक राज्यात भिन्नभिन्न असू शकेल. राज्य अस्तित्वात येताना असलेली राजकीय परिस्थिती, इतिहासातील घटना, लोकांच्या अपेक्षा, राज्याच्या आकार या घटकांवर शासनसंस्थेचे स्वरुप वा प्रकार अवलंबून राहत.

4) सार्वभौम सत्ता :– सार्वभौम सत्ता हा राज्याचा सर्वात महत्वाचा घटक मानला जातो. सार्वभौमत्वाच्या कल्पनेत बाह्य नियंत्रणापासून स्वातंत्र्य आणि प्रभुत्व या दोन गोष्टी प्रामुख्याने अंतर्भुत आहेत. राज्यांतर्गत इतर संस्थावरती व सर्व व्यक्तींवरती राज्याची सर्वोच्च सत्ता असणे म्हणजे राज्य अंतर्गतरित्या सार्वभौम असणे होय. याचा अर्थ राज्याने इतर संस्थाच्या कार्यामध्ये सातत्याने हस्तक्षेप करावा असा नसून त्यांच्या कारभारामुळे राज्याच्या अस्तित्वाला धोका निर्माण होणार नाही. राज्याची प्रगती खुंटणार नाही. तसेच इतर संस्थाच्या स्वतंत्र कारभारामुळे राज्यामध्ये अशांतता निर्माण होणार नाही हे पाहण्याचा अधिकार होय. हा अधिकार स्वभाविकपणे सर्वोच्च असतो. राज्यांतर्गत दुसरी प्रतिस्पर्धा असू शकत नाही.

**प्रश्न - राज्याच्या स्वरुपासंबंधीचे प्रमुख सिद्धांत किंवा**

**राज्याच्या स्वरुपासंबंधीचे आदर्शवादी व साम्यवादी सिद्धांत विषद करा.**

**अ. प्रास्ताविक –**

राज्याचे स्वरूप कशा पद्धतीचे आहे हे जाणून घेण्यासाठी प्रामुख्याने आदर्शवादी सिद्धांत व साम्यवादी सिद्धांत हे दोन प्रकार दिसून येतात या दोन्ही सिद्धांताच्या माध्यमातून राज्याचे स्वरूप समजून येते.

**ब. राज्याच्या स्वरुपासंबंधीचे प्रमुख सिद्धांत -**

**१. आदर्शवादी सिद्धांत :**

आदर्शवादी सिद्धांतानुसार नैतिक जवीन जगून सुखी होण्याचे राज्य हे एक प्रमुख साधन आहे. राज्य असे आदर्श जीवन निर्माण करते म्हणून राज्याचे कायदे आज्ञाधारकपणे पाळणे हे व्यक्तीच्या सुखी जीवनाचे रहस्य आहे. प्लेटीने व्यक्ती व राज्य यातील भेदावर भर दिला व व्यक्तीचे विस्तृत स्वरुप म्हणजेच राज्य असे सांगितले. रिस्टॉलने राज्यसंस्था निसर्गसिद्ध आहे व व्यक्तीच्या पूर्णत्वासाठी ती आवश्यक आहे असे प्रतिपादन केले.

राज्याचा घटक या दृष्टीनेच नागरिकांचा विचार करावा लागलतो. नागरिकांची सर्वांगीण वाढ राज्यातच होऊ शकते. व्यक्तीविकास व सामाजिक प्रगती फक्त राज्यामध्येच होत असल्यामुळे राज्याला श्रेष्ठ स्थान दिले पाहिजे. या कल्पनेवर विचारवंतांनी आदर्शवादाची उभारणी केली आहे. राज्याची सत्ता सर्वश्रेष्ठ असते. राज्य सर्वव्यापी असते. राज्याच्या आज्ञा नागरिकांनी अंमलात आणल्या पाहिजेत. राज्याशिवाय व्यक्तीला स्वतंत्र स्थान आणि व्यक्तीमत्व असत नाही अशी नवी विचारसरणी मांडणी.

**जर्मन आदर्शवादी विचार प्रवाह :**

जर्मन तत्वज्ञ इमॅन्युअल काँट यांनी १७९६ मध्ये प्रसिद्ध केलेल्या ग्रंथात या सिद्धांताचा पुरस्कार केला. त्याच्या मते राज्य हे सर्वशक्तीमान आहे. ते देवाने निर्माण केले असल्यामुळे कधीही चूक करत नाही. त्याच्या आज्ञा पाळणे सर्वांचे कर्तव्य आहे.

जर्मन शास्त्रज्ञ हेगेल यांनी आदर्शवादी सिद्धांताला वेगळे वळण दिले. व्यक्तीचे स्वातंत्र्य राज्यामुळे टिकू शकते. नैतिकता प्राप्त होणे म्हणजेच स्वातंत्र्याची प्राप्ती होणे होय. व्यक्ती राज्याशी एकरुप झाल्याशिवाय ते प्राप्त होत नाही. राज्य महत्वाची संघटना असून राज्यसंस्थेला राज्यातील व्यक्तीच्या जीवनावर संपूर्ण सत्ता गाजवता आली पाहिजे. नागरिकापेक्षा राज्याला उच्च स्वतंत्र स्थान आहे. राज्याला स्वतंत्र अशी इच्छा असते. राज्यातील सर्व व्यक्तींच्या मताचा आविष्कार राज्यात झाल्यामुळे राज्याला विरोध करणे अयोग्य आहे. नैतिक तत्वाचे दृश्य स्वरूप म्हणजेच राज्य होय. राज्य म्हणजे पृथ्वीवरील परमेश्वराचा प्रत्यक्ष अवतार होय. या तत्वज्ञानामुळे राज्याची अनियंत्रित सत्ता मान्य करावी लागते. यांच्याही पुढे जाऊन हेगेल म्हणतोए राज्याचे निर्णय हे अंतिम आहेत. राज्याला विरोध करण्याचा कोणत्याही व्यक्तीला अधिकार नाही. राज्याला हितातच व्यक्तीहित समावले आहे.

अशा प्रकारे लोकशाही व व्यक्तीस्वातंत्र्य यांना मारक असे अनियंत्रित सत्तावादाचे तत्वज्ञान हेगेल यांनी मांडले. शांतता व युद्धाच्यावेळी व्यक्तींनी राज्याला सर्वस्व अर्पण केले पाहिजे. कारण लोकांची नैतिकशक्ती कायम टिकवण्यास युद्धाची आवश्यकता आहे. जर्मनीतील

हुकूमशहांनी हेगेल यांनी मांडलेल्या सिद्धांताला अनिष्ट विकृत स्वरुप देवून आक्रमक राष्ट्रवाद साम्राज्यवाद आणि हुकूमशाही इत्यादी प्रवृत्ती निर्माण केल्या.

**२ साम्यवादी सिद्धांत :**

फ्रेंडरिक एंजल या कार्ल मार्क्सच्या सहकाऱ्याने लिहिलेल्या 'The origin of the family, private property and the state' या ग्रंथात राज्याच्या स्वरुपासंबंधी साम्यवादी सिद्धांताची मांडणी करण्यात आले आहे. या सिद्धांतानुसार समाजातील एका वर्गाकडून दुसऱ्या वर्गाची पिळवणूक करण्याचे साधन-माध्यम म्हणजे राज्यसंस्था होय. प्रत्येक समाजातील नाहीरे वर्गाची पिळवणूक आहिरे वर्ग करतो. श्रीमंत वर्गाचे हितसंबंध जपण्यासाठी श्रीमंत वर्गाची मान्यता असणारी आणि श्रीमंत वर्गाने स्वीकारलेली संस्था म्हणे राज्य होय. नाहीरे वर्गाची पिळवणूक करण्याचे साधन म्हणून श्रीमंत वर्ग राज्यसंस्थेचा वापर करतात. या अर्थाने राज्य ही शोषण करणारी संस्था आहे. कार्ल मार्क्स यांच्या Communist Manifesto या ग्रंथात तो राज्याला भांडवलदार वर्गासाठी कार्य करणारी कार्यकारी संस्था असे म्हणतो. अतंर्गत असंतोष व परकीय आक्रमणापासून भांडवलदार वर्गाच्या हितसंबंधांचे रक्षण करणारी यंत्रणा म्हणजे राज्य होय. राज्यातील शासनसंस्था, सैन्यदले, पोलिसदले, न्यायालये व वर्गसंस्था या भांडवलदारांच्या नियंत्रणाखाली असतात. मार्क्सच्या मते लोकशाही राज्याची कल्पना दिशाभूल करणारी आहे. ज्या समाजात वर्ग असतात त्या समाजात विषमता असते. ज्या समाजात विषमता असते तिचे लोकशाही अशक्य आहे. लोकशाही आणि वर्गावर आधारित समाज या कल्पना परस्परविरोधी आहेत. श्रीमंतांच्या हितसंबंधाची जपणूक होईल असे कायदे केले जाते. भांडवलदारांचे कायदेमंडळावर नियंत्रण असल्यामुळे त्याचे मंत्रीमंडळावरही नियंत्रण असते. न्यायव्यवस्था भांडवलदारांना अनुकूल असते.

कार्ल मार्क्सने "Communist Manifesto” या आपल्या जाहीरनाम्यात जगातील कामगारांना एकत्र येऊन क्रांती करून राज्यसंस्था ताब्यात घ्याए असे आवाहन केले. त्यांनी राज्य या साधनाचा उपयोग काही काळ करून क्रांतीलाए विरोध करणाऱ्यांना नष्ट केले पाहिजे. त्या राज्यात श्रमिकांची हुकूमशाही असेल. अशा राज्यात वर्ग असतीलए परंतु सत्ता श्रमिकांच्या हातात असेल. मार्क्सने श्रमिक हुकूमशाहीची कल्पना स्पष्ट करताना असे प्रतिपादन केले आहे की श्रमिकांच्या या संक्रमण काळातील हुकूमशाहीत नैसर्गिक साधन संपत्तीचे समाजीकरण करतील. भांडवलशाहीचे अवशेष नष्ट केले जातील. कामगारांनी या सत्तेचा उपयोग वर्गहीन समाज निर्माण करण्यासाठी केला पाहिजे. सत्तेचा वापर निती अनितीचा विचार न करता केला पाहिजे. आर्थिक समतेवर सर्व समाजव्यवस्था निर्माण केली पाहिजे. कोणीही कोणाची पिळवणूक करणार नाही.

भांडवलशाही राज्य नष्ट झाल्यानंतर राज्यसंस्था शिल्लक राहील. संक्रमण कालीन कामगारांची हुकुमशाही संपताच वर्गहीन समाजात शोषण नसल्यामुळे राज्याची गरज उरणार नाही. राज्य हे हळूहळू नष्ट होईल. अशा समाजात राज्यहीनए वर्गहीनए शोषणरहित समाजनिर्मिती असेल. कोणी कोणाचे शोषण करत नसल्यामुळे राज्य दंडशक्तीला स्थान नाही. उत्पादन क्षेत्रावर व वस्तूंच्या वितरणावर समाजाचे नियंत्रण असेल. प्रत्येक व्यक्ती आपल्या कुवतीनुसार काम करेल. प्रत्येक व्यक्तीला आपल्या गरजेनुसार वस्तू मिळतील.

**प्रश्न - सत्ता म्हणजे काय ते सांगून सत्तेचे स्वरूप व वैशिष्ट्ये स्पष्ट करा.**

**प्रास्ताविक :**

पारंपारिक अर्थाने ज्या संकल्पनेस आपण सार्वभौमत्व म्हणतो, त्या संकल्पनेचे अधिक सखोल आणि वास्तविक स्पष्टीकरण आधुनिक राजकीय विचारवंत सत्ता, प्रभाव, अधिसत्ता आणि अधिमान्यता या संकल्पनांद्वारे देतात. उदाहरणार्थ व्यापारी-उद्योजक वर्गाकडे औपचारिक अर्थाने राजकीय सत्ता नसते किंवा पारंपारिक अर्थाने व सार्वभौम नसतात; परंतु राज्यकर्त्यांवर या वर्गाचा अत्यंत व्यापक प्रभाव असल्याने, त्यांचे धुरीणत्व प्रस्थापित झाले आहे. किंवा औपचारिक अर्थाने राज्यकर्ते राज्यकारभारविषयक सर्व निर्णय घेत असले तरी सर्व निर्णय ज्येष्ठ सनदी नोकरांच्या सल्ल्यानेच घेतले जात असल्याने, नोकरशाहीची हुकूमशाही ही आधुनिक राज्याची वास्तविकता आहे. म्हणूनच 'सार्वभौमत्वाचा' केवळ वैधानिक किंवा औपचारिक अभ्यास परिपूर्ण नाही. सार्वभौमत्वाचे वास्तविक स्वरुप समजण्याकरिता आपण सत्ता, अधिकार आणि अधिमान्यता या संकल्पनांचा थोडक्यात आढावा घेऊ या.

**सत्ता (Power) म्हणजे काय ? :**

बट्रॉन्ड रसेल योन सत्तेची व्याख्या करताना “अपेक्षित परिणाम घडवून आणण्याची क्षमता" असे तिचे वर्णन केले होते. पण ही व्याख्या सर्वसाधारण स्वरुपाची आहे. राज्यशासस्त्रासाठी अधिक विशिष्ट आशयाची व्याख्या करावी लागेल असे वर्तनलक्षी अभ्यासकांचे मत होते. आर.एच्.तॉनीने सत्तेची व्याख्या अशी केली आहे : सत्ता म्हणजे “व्यक्ती किंवा गट जिच्या बळावर अन्य व्यक्तींचे या गटांचे वर्तन आपल्या इच्छेप्रमाणे बदलून घेऊ शकतात अशी क्षमता होय. डेव्हिड ईस्टनही असाच आशय पुढील शब्दांतून व्यक्त करतो. तो म्हणतो : “काही व्यक्ती या गट जेव्हा स्वतःच्या इच्छेनुरुप इतरांच्या कृती निर्धारीत करतो तेव्हा त्यांच्यातील संबंध म्हणजे सत्ता होय.” लॉस्वेलच्या मते सत्ता म्हणे निर्णय निर्मितीतील सहभाग होय. तो म्हणतो. "निर्णय निर्मिती ही दोन वा अधिक व्यकतींमधील आंतरक्रिया असते. इतर व्यक्तींनी कोणत्या धोरणांचा पाठपुरावा करायचा हे त्यातून ठरते. त्यामुळे निर्णयनिर्मिती प्रक्रियेतील सहभाग या अर्थाने सत्ता हीसुद्धा आंतरव्यक्ती - संबंधच ठरते.” या व्याख्यांमध्ये सत्तेचा परिणाम किंवा स्वरुप यांचा निर्देश केला, असला तरी सत्तेच्या अधिबलनांसंबंधी त्यात काहीही उल्लेख आढळत नाही.

**सत्तेचे स्वरुप :**

पारंपारिक राज्यशास्त्रात संकुचित अर्थाने विचार केला जातो. आधुनिक काळात मात्र सत्तेचा विचार व्यापक अर्थाने केला जातो. सत्तेचा अभ्यास कोणाच्यातरी अनुषंगाने केला जातो. त्यामुळे सत्तेचे स्वरुप सापेक्ष बनले आहे. ज्याप्रमाणे एक राज्य दुसऱ्यापेक्षा किंवा एक व्यक्ती दुसऱ्यापेक्षा शक्तीशाली आहे, असे आपण जेव्हा म्हणतो तेव्हा आपण सत्तेची तुलना करून सत्तेचे मोजमाप करतो. स्वरुप लक्षात घेण्यासाठी त्या व्याख्यांचा अभ्यास केला पाहिजे.

बट्रॉन्ड रुसोलच्या मते, "बलप्रयोगाची क्षमता असणे म्हणजे सत्ता होय." राजकीय सत्तेचे स्वरुप निसर्गावरील सत्तेपेक्षा किंवा व्यक्तीच्या वर्चस्वापेक्षा वेगळे असते. कारण राजकीय सत्तेत सत्ताधारका एवढाच सत्ताग्राहकाचा सहभाग देखील तेवढाच असतो. मानवाचा विकास जर करावयाचा असेल तर जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रात आर्थिक, धार्मिक, राजकीय स्वरुपाचे कोणतेही बंधने नकोत. आज राज्याच्या सत्तेत अमर्याद वाढ झाली आहे. अशी सत्ता राज्याच्या अंतर्गत व बाह्य क्षेत्रात धोकादायक आहे. म्हणून सत्तेच्या विकेंद्रीकरणावर रसेलने भर दिला. रॉबर्ट डहालच्या मते सत्ता आणि राजकारण समान आहे. त्याचप्रमाणे राजकारण ही एका विशिष्ट लोकांची मक्तेदारी नसून त्याचा सर्वांशी संबंध असतो. राजकारण करणाऱ्या सर्वांनाच सत्ता प्राप्त होते असे नाही. राजकारणाशी संबंध येणाऱ्या लोकांचे डहालने पुढील प्रकार सांगितले आहेत.

१) सत्ताशोधक : काही लोक सत्ता प्राप्त करण्याचा प्रयत्न करतात त्यांना सत्ताशोधक असे म्हणतात. सत्ता संपादन करण्याच्यामागे अनेक कारणे असतात. उदा. वैयक्तिक महत्त्वकांक्षा, पदप्राप्ती, सार्वत्रिक कामाची तळमळ.

२) राजकीय क्रियाशील : राजकारणाचे आकर्षण असल्यामुळे राजकारणात सक्रीय भाग घेणारा एक वर्ग असतो. त्याची अनेक कारणे असतात. उदा. राजकर्त्यांशी प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित करणे, हितसंबंधाचे रक्षण, राजकारणाची माहिती मिळवणे इत्यादी.

३) उदासीन : काही लोक राजकारणापासून उदासीन असतात त्याची कारणे अनेक असतात. उदा. वैयक्तिक असमर्थता, निर्णय प्रक्रियेत सहभागाबद्दल उदासीनता, इतर लाभाचे आकर्षण यामुळे राजकारणात या व्यक्ती उदासीन असतात.

४) सत्ताधीश : सत्ताधीशापैकी ज्यांना सत्ता प्राप्त होते त्यांना सत्ताधीश म्हणतात. सर्वच लोकांच्याजवळ कौशल्य, साधन, संधी, प्रयत्न, प्रभाव, प्रतिवादाची क्षमता नसते. त्यामुळे ते सत्ताधीश होत नाहीत. ज्यांच्याकडे क्षमता असते ते सत्ताधीश होतात.

**• सत्तेची वैशिष्ट्ये :**

वरील व्याख्यांच्या आधारे सत्तेची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे विशद करता येतील :

**१) संबंधात्मक स्वरुप** : अनेकदा व्यक्तीच्या “मालकी" च्या असलेल्या गोष्टी - साधने, पैसा, सामर्थ्य, गुण इत्यादी म्हणजे तिची रस्ता असे आपल्याला वाटते. पण सत्ता एकट्या माणसापाशी कधीच नसते, कारण ती कोणावर तरी असावी लागते. म्हणजे ती संबंधात्मकच असते. माणसाच्या मालकीच्या काही वस्तूंमध्ये वा त्याच्या गुणांत आपण ती बघतो कारण त्यातून तिच्या अंगी सत्ता वापरण्याची क्षमता आलेली असते. ते तिच्या सत्तेचे मूलस्रोत आणि अधिबलने असतात. ती जेव्हा इतर व्यक्तींवर सत्ता वापरते तेव्हा या मूलस्रोतांचा दरवेळी वापर करावाच लागतो असे मात्र नाही.

**२) वर्तनात्मक स्वरुप** : सत्ता संबंधात्मक असते तशीच ती वर्तनात्मक असते. सत्ताधारकाच्या (Power- wielder) वर्तनामधून ती व्यक्त होत असते. एखाद्यापाशी प्रचंड मोठे पाशवी सामर्थ्य असेल आणि दुसऱ्यापाशी गडगंज धनसंपत्ती असेल तर या दोहोंपैकी कोणाची सत्ता मोठी हे आपण

कसे सांगणार? त्या मूलस्तोतांची तुलना अशक्य आहे. पण दोघांपैकी कोणाच्या इच्छेवरून किती लोक आपले वर्तन बदलतात या माहितीच्या आधारे त्यांच्यापैकी अधिक सत्ताशाली कोण हे सांगितले जाऊ शकेल.

**३) प्रसंगविशिष्ट** : सत्ता प्रसंगविशिष्ट असते. एखाद्या व्यक्तीची सत्ता आपल्या विशिष्ट प्रसंगाच्या या भूमिकेच्या संदर्भात तपासावी लागते. कारण एकाच व्यक्तीची सत्ता भिन्न प्रसंगात कमी वा अधिक असते. पदामुळे जी सत्ता व्यक्तीला लाभते, ती सत्ता पदावर नसताना व्यक्ती वापरु शकत नाही.

**४) सत्तेच्या मर्यादा** : सत्ताधारक सत्ताग्राहकावर जी सत्ता गाजवतो ती नेहमीच मर्यादित असते. एका मर्यादेपलीकडे लष्करप्रमुख सैनिकांना आज्ञापालन करायला भाग पाडू शकत नाही. त्याने तसे केल्यास सैनिक उठाव करण्याची शक्यता असते. तद्वतच शासनही एका मर्यादेहून अधिक निर्बंध किंवा करांचे ओझे नागरिकांवर लादू शकत नाहीत. तसे केल्यास लोक प्रतिकार करता हा हा जगातिक अनुभव आहे.

**५) तौलनिक स्वरुप** : समाजातील एका व्यक्तीची सत्ता वाढते तेव्हा दुसऱ्या व्यक्तहींची त्या प्रमाणात कमी झालेली असेलच असे नाही. नागरिक शासनाकडे विशेषाधिकार सोपवतात तेव्हाही त्यांची सत्ता कमी झालेली नसते. मात्र राजकीय व्यवहारात एका राजकीय पक्षाचे सामर्थ्य वाढणे म्हणजे दुसऱ्या राजकीय पक्षाचे सामर्थ्य कमी होणे.

**६) राज्याच्या सार्वभौम अधिकाराशी निगडित** : राजकीय व्यवस्थेत जी व्यक्ती किंवा व्यक्तिसमुदाय किंवा राजकीय पक्ष सत्ताधीश असतो, तो सत्तेवर असे तोपर्यंत राज्याच्या सार्वभौम अधिकाराचा वापर करत असतो. विधिमंडळात ज्या राजकीय पक्षाचे बहुमत असेल. त्याच्या इच्छेनुसार कायद्यांची निर्मिती होत असते आणि ते कायदे सर्व नागरिकांवर बंधनकारक असतात.

**प्रश्न - सत्ता म्हणजे काय ते सांगून सत्तेचे स्वरूप व आधार स्पष्ट करा.**

**प्रास्ताविक :**

पारंपारिक अर्थाने ज्या संकल्पनेस आपण सार्वभौमत्व म्हणतो, त्या संकल्पनेचे अधिक सखोल आणि वास्तविक स्पष्टीकरण आधुनिक राजकीय विचारवंत सत्ता, प्रभाव, अधिसत्ता आणि अधिमान्यता या संकल्पनांद्वारे देतात. उदाहरणार्थ व्यापारी-उद्योजक वर्गाकडे औपचारिक अर्थाने राजकीय सत्ता नसते किंवा पारंपारिक अर्थाने व सार्वभौम नसतात; परंतु राज्यकर्त्यांवर या वर्गाचा अत्यंत व्यापक प्रभाव असल्याने, त्यांचे धुरीणत्व प्रस्थापित झाले आहे. किंवा औपचारिक अर्थाने राज्यकर्ते राज्यकारभारविषयक सर्व निर्णय घेत असले तरी सर्व निर्णय ज्येष्ठ सनदी नोकरांच्या सल्ल्यानेच घेतले जात असल्याने, नोकरशाहीची हुकूमशाही ही आधुनिक राज्याची वास्तविकता आहे. म्हणूनच 'सार्वभौमत्वाचा' केवळ वैधानिक किंवा औपचारिक अभ्यास परिपूर्ण नाही. सार्वभौमत्वाचे वास्तविक स्वरुप समजण्याकरिता आपण सत्ता, अधिकार आणि अधिमान्यता या संकल्पनांचा थोडक्यात आढावा घेऊ या.

**सत्ता (Power) म्हणजे काय ? :**

बर्ट्रॉन्ड रसेल योन सत्तेची व्याख्या करताना “अपेक्षित परिणाम घडवून आणण्याची क्षमता" असे तिचे वर्णन केले होते. पण ही व्याख्या सर्वसाधारण स्वरुपाची आहे. राज्यशासस्त्रासाठी अधिक विशिष्ट आशयाची व्याख्या करावी लागेल असे वर्तनलक्षी अभ्यासकांचे मत होते. आर.एच्.तॉनीने सत्तेची व्याख्या अशी केली आहे : सत्ता म्हणजे “व्यक्ती किंवा गट जिच्या बळावर अन्य व्यक्तींचे या गटांचे वर्तन आपल्या इच्छेप्रमाणे बदलून घेऊ शकतात अशी क्षमता होय. डेव्हिड ईस्टनही असाच आशय पुढील शब्दांतून व्यक्त करतो. तो म्हणतो : “काही व्यक्ती या गट जेव्हा स्वतःच्या इच्छेनुरुप इतरांच्या कृती निर्धारीत करतो तेव्हा त्यांच्यातील संबंध म्हणजे सत्ता होय.” लॉस्वेलच्या मते सत्ता म्हणे निर्णय निर्मितीतील सहभाग होय. तो म्हणतो. "निर्णय निर्मिती ही दोन वा अधिक व्यकतींमधील आंतरक्रिया असते. इतर व्यक्तींनी कोणत्या धोरणांचा पाठपुरावा करायचा हे त्यातून ठरते. त्यामुळे निर्णयनिर्मिती प्रक्रियेतील सहभाग या अर्थाने सत्ता हीसुद्धा आंतरव्यक्ती - संबंधच ठरते.” या व्याख्यांमध्ये सत्तेचा परिणाम किंवा स्वरुप यांचा निर्देश केला, असला तरी सत्तेच्या अधिबलनांसंबंधी त्यात काहीही उल्लेख आढळत नाही.

**सत्तेचे स्वरुप :**

पारंपारिक राज्यशास्त्रात संकुचित अर्थाने विचार केला जातो. आधुनिक काळात मात्र सत्तेचा विचार व्यापक अर्थाने केला जातो. सत्तेचा अभ्यास कोणाच्यातरी अनुषंगाने केला जातो. त्यामुळे सत्तेचे स्वरुप सापेक्ष बनले आहे. ज्याप्रमाणे एक राज्य दुसऱ्यापेक्षा किंवा एक व्यक्ती दुसऱ्यापेक्षा शक्तीशाली आहे, असे आपण जेव्हा म्हणतो तेव्हा आपण सत्तेची तुलना करून सत्तेचे मोजमाप करतो. स्वरुप लक्षात घेण्यासाठी त्या व्याख्यांचा अभ्यास केला पाहिजे.

बर्ट्रॉन्ड रुसोलच्या मते, "बलप्रयोगाची क्षमता असणे म्हणजे सत्ता होय." राजकीय सत्तेचे स्वरुप निसर्गावरील सत्तेपेक्षा किंवा व्यक्तीच्या वर्चस्वापेक्षा वेगळे असते. कारण राजकीय सत्तेत सत्ताधारका एवढाच सत्ताग्राहकाचा सहभाग देखील तेवढाच असतो. मानवाचा विकास जर करावयाचा असेल तर जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रात आर्थिक, धार्मिक, राजकीय स्वरुपाचे कोणतेही बंधने नकोत. आज राज्याच्या सत्तेत अमर्याद वाढ झाली आहे. अशी सत्ता राज्याच्या अंतर्गत व बाह्य क्षेत्रात धोकादायक आहे. म्हणून सत्तेच्या विकेंद्रीकरणावर रसेलने भर दिला. रॉबर्ट डहालच्या मते सत्ता आणि राजकारण समान आहे. त्याचप्रमाणे राजकारण ही एका विशिष्ट लोकांची मक्तेदारी नसून त्याचा सर्वांशी संबंध असतो. राजकारण करणाऱ्या सर्वांनाच सत्ता प्राप्त होते असे नाही. राजकारणाशी संबंध येणाऱ्या लोकांचे डहालने पुढील प्रकार सांगितले आहेत.

१) सत्ताशोधक : काही लोक सत्ता प्राप्त करण्याचा प्रयत्न करतात त्यांना सत्ताशोधक असे म्हणतात. सत्ता संपादन करण्याच्यामागे अनेक कारणे असतात. उदा. वैयक्तिक महत्त्वकांक्षा, पदप्राप्ती, सार्वत्रिक कामाची तळमळ.

२) राजकीय क्रियाशील : राजकारणाचे आकर्षण असल्यामुळे राजकारणात सक्रीय भाग घेणारा एक वर्ग असतो. त्याची अनेक कारणे असतात. उदा. राजकर्त्यांशी प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित करणे, हितसंबंधाचे रक्षण, राजकारणाची माहिती मिळवणे इत्यादी.

३) उदासीन : काही लोक राजकारणापासून उदासीन असतात त्याची कारणे अनेक असतात. उदा. वैयक्तिक असमर्थता, निर्णय प्रक्रियेत सहभागाबद्दल उदासीनता, इतर लाभाचे आकर्षण यामुळे राजकारणात या व्यक्ती उदासीन असतात.

४) सत्ताधीश : सत्ताधीशापैकी ज्यांना सत्ता प्राप्त होते त्यांना सत्ताधीश म्हणतात. सर्वच लोकांच्याजवळ कौशल्य, साधन, संधी, प्रयत्न, प्रभाव, प्रतिवादाची क्षमता नसते. त्यामुळे ते सत्ताधीश होत नाहीत. ज्यांच्याकडे क्षमता असते ते सत्ताधीश होतात.

**सत्तेचा आधार :**

सत्ता कोणत्या आधारावर स्थापन होते हा सत्तेच्या संदर्भात मोठा प्रश्न आहे. व्यक्तीमधील संबंध सत्तेच्या आधारावर निश्चित होतात. ज्या लोकांच्याकडे पात्रता, कुवत असेल ते लोक सत्ता प्राप्त करतात. काहींना ती प्राप्त होत नाही. त्याचा मूळ आधार पुढीलप्रमाणे आहेत.

**१) बळाचे सामर्थ्य** : बळाचे सामर्थ्य ही नैसर्गिक देणगी आहे. बळांमुळे दुसऱ्यांना एखाद्या गोष्टीसाठी शक्ती करण्याचे सामर्थ्य निर्माण होते. ज्यांत सक्तीचा भाग अंतर्भूत होतो. बळाचा उपयोग तीन प्रकारे होतो.

अ) शारीरिक सक्ती : यांत बळाचा अतिरेक वापर करण्यात येतो. यांत सैन्याच्या किंवा पोलिसांच्या मार्फत त्रास देणे, तुरुंगात टाकणे, शारीरिक त्रास देणे, ठार मारणे इत्यादी दहशत निर्माण करून सत्तेची निर्मिती होते. प्राप्त झालेल्या सत्तेला टिकवण्यासाठी बळाचा वापर केला जातो. उदा. हिटलर, मुसोलिनी, स्टॅलिन.

ब) मानसिक दडपण: सत्ता वाढविण्यास, टिकवण्यास, मानसिक दडपणाची आवश्यकता असते. व्यक्तीवर मानसिक दडपण आणून सत्ता वाढविण्यासाठी तिचा उपयोग केला जातो. संमोहक नेतृत्व, मानसिक दडपणाच्या आधारे निर्माण होते. आधुनिक राजकीय व्यवस्थेत तर प्रचार माध्यमाचा मोठ्या प्रमाणात उपयोग करून एखादा विचार लोकांच्या मनावर सतत लादला जातो. खोटी माहिती जनतेवर लादण्याचा प्रयत्न करण्यात येतो. ती कालांतराने जनतेला खरी वाटायला लागते. यात यश मिळाल्यास सत्तेला आपोआप लोकांची मान्यता मिळते.

क) आर्थिक शक्ती : ज्याच्याकडे आर्थिक शक्ती आहे. ते आपली सत्ता मजबूत करण्याचा प्रयत्न करतात. भांडवलशाही व्यवस्थेत भांडवलदार वर्ग उत्पादनाची साधने आपल्या हातात ठेवून राजसत्तेवर नियंत्रण प्रस्थापित करतो. राजसत्तेला आपल्या मनाप्रमाणे भाग पाडतात.

**२) राजकीय साधन सामुग्रीची विपुलता** : राजकीय साधन सामुग्रीची विपुलता असते, त्यांना सत्ता प्राप्तीसाठी ज्याच्याजवळ त्याची मदत होते. राजकीय साधन सामुग्रीमध्ये आर्थिक सामाजिक दर्जा, राजकीय अनुभव, घडामोडीचे ज्ञान यांचा विचार करावा लागतो. अशी संपन्नता ज्याच्याकडे आहे

तो सत्ता प्राप्तीचा प्रयत्न सुरु करतो. राजकीय साधन सामुग्रीची विपुलता असून सत्ता प्राप्तीची आशा नसेल तर सत्ता प्राप्तीचा प्रयत्न होणार नाही.

**३) लोकांची अधिमान्यता** : टी.एच्. ग्रीनच्या मते, सत्तेचा आधार शक्ती नसून जनईच्छा आहे. जनईच्छेच्या विरुद्ध शक्तीचा उपयोग करता येत नाही. म्हणून लोकमान्यता मिळविण्यास प्रयत्न केला जातो. यासाठी प्रचार, वाटाघाटी, चर्चा याद्वारे प्रयत्न केला जातो. साम्यवादी देशात सुद्धा जनतेच्या इच्छेचा विचार केला जातो.

सत्तेचे स्वरुप अधिक स्पष्ट होण्यासाठी सत्तेचे प्रकार पाहणे संयुक्त ठरते. रसेलने सत्तेचे तीन प्रकार सांगितले आहेत.

**अ) पारंपारिक सत्ता** : काही व्यक्तींना परंपरेने सत्ता प्राप्त होते. धार्मिक श्रद्धेमुळे अशा सत्तेला जनमताची मान्यता मिळते. धर्माधिष्ठीत राज्यात सत्ताधीशांना प्राप्त झालेली सत्ता परंपरेच्या आधारावर टिकून राहिली होती. सत्ता प्राप्तीनंतर तिला रुढीचे स्वरुप प्राप्त होते.

**ब) अनिर्बंध सत्ता** : लोकांची इच्छा नसताना लोकांवर सक्ती करून अशी सत्ता टिकवली जाते. लष्करी राजवट हे तिचे उत्तम उदाहरण होय. प्रस्थापित सत्तेचा विरोध झाल्यास किंवा पराभूत राष्ट्रावर सक्ती करण्यासाठी तिचा उपयोग केला जातो. अधिक धनसंचय, अत्याधुनिक तांत्रिक ज्ञान, धार्मिकदृष्ट्या प्रचंड पाठिंबा प्राप्त होणारी सत्ता अनिर्बंध सत्तेच्या स्वरुपात पुढे येत.

**क) क्रांतिकारक सत्ता** : प्रस्थापित सत्तेला आव्हान देऊन ती सत्ता बदलण्याची शक्ती क्रांतिकारक सत्तेजवळ असते. क्रांतिकारी गट नवीन तत्त्वप्रणाली अनुसरुन नवीन कार्य त्याच्या आधारावर संघटीत होऊन आपला प्रभाव वाढवितो. उदा. भारतीय स्वातंत्र्य संग्राम, रशियाची क्रांती, अमेरिकेचे स्वातंत्र्ययुद्ध, फ्रान्सची क्रांती इत्यादी.

**प्रश्न – अधिसत्ता म्हणजे काय ते सांगून अधिसत्तेचे प्रकार स्पष्ट करा.**

**अधिसत्ता (Authority) :**

जेव्हा सत्ताधारकांच्या आज्ञांचे पालन त्या आज्ञांच्या पाठीशी असलेल्या अधिबलांमुळे नाही तर त्या आज्ञा योग्य आहेत अशा खात्रीतून बहुसंख्य लोक करतात तेव्हा त्या सत्तेचे रुपांतर अधिसत्तेत झालेले असते. अधिसत्ता ही संज्ञा आपण 'ऑथॉरिटी' या इंग्रजी संज्ञेचा मराठी पर्याय म्हणून वापरतो. 'ऑथॉरिटी' या शब्दाची व्युत्पत्ती 'ऑक्टर' (auctor) किंवा 'ऑक्टोरिटस' (auctoritos) या रोमन शब्दापासून झालेली असून, त्या मूळ शब्दाचा अर्थ सल्ला किंवा मसलत असा होतो. जनसभेच्या निर्णयांना स्वीकृत वा अस्वीकृत करणारी बुद्धिमंत ज्येष्ठ व अनुभवी अशा व्यक्तींची वरिष्ठ सभा रोमन राज्यव्यवस्थेत परंपरेने असायची. धर्म, परंपरा व नीती या निकषांवर ती प्रत्येक निर्णयाचे परीक्षण करायची. तिने मान्यता दिली म्हणजे मगच त्या निर्णयाला 'ऑक्टोरिटस' म्हणजे अधिकृत निर्णयाचा दर्जा मिळत असे. त्या दृष्टीने 'अधिसत्ता ही विवेकाचे संनिवेशन' असून तिच्या अंगी 'बुद्धिसंगत सांगोपांग मांडणी' करण्याची क्षमता असणे अभिप्रेत

असते. सत्ताधारकापाशी ही क्षमता असली म्हणजे मग त्याच्या आज्ञांचे आपोआप पालन होते. पण ती जर नसेल किंवा जिथे ती निष्प्रभ ठरत असेल, तर तिथे बळाचा वापर करूनच आज्ञापालन मिळवणे भाग पडते. तेव्हा अधिसत्तेची मुख्य खूण 'आपोआप आज्ञापालन मिळवणे' ही असते. ते जेव्हा मिळत नाही तेव्हाच प्रभावाची किंवा सत्तेची साधने तिला वापरावी लागतात. बहुसंख्य लोकांकडून आपोआप आज्ञापालन मिळत असेल तरच आज्ञाभंग करणाऱ्या थोड्या लोकांकडून, बलप्रयोगातून आज्ञापालन अधिसत्तेला मिळवता येते. 'तिला आज्ञा करण्याचा अधिकार आहे आणि त्या आज्ञांचे पालन करणे माझे कर्तव्य आहे.' अशी भावना बहुसंख्य लोकांच्या ठिकाणी असणे अधिसत्तेच्या अस्तित्वासाठी आवश्यक असते. अधिसत्तेची, 'बुद्धिसंगत सांगोपांग मांडणी' करण्याची क्षमता, आणि आज्ञा करण्याचा तिला अधिकार आहे ही लोकांची भावना - या दोन आधारांवर अधिसत्ता उभी असते.

**अधिसत्तेचे प्रकार :**

सत्तेला अधिमान्यता मिळून तिचे रुपांतर अधिसत्तेत होते असे गृहीत धरुन मॅक्स वेबरने ही अधिमान्यता मिळण्याचे तीन प्रकार पुढीलप्रमाणे सांगितले आहेत :

**१) दिव्यवलयी अधिसत्ता**: जेव्हा सत्ताधारकापाशी काही दिव्य शक्ती व अलौकिक गुण आहेत अशी लोकांची खात्री असते आणि त्यामुळे ते त्याच्यावर, त्याच्या अलौकिकत्वावर संपूर्ण विश्वास ठेवून त्याच्या आज्ञांचे निमूटपणे पालन करतात तेव्हा दिव्यवलयी (कॅरिस्मॅटिक) अधिसत्ता अस्तित्वात आलेली असते. ही अधिसत्ता अलौकिक मानल्या गेलेल्या सत्ताधारकाची व्यक्तिगत सत्ता असते. त्यामुळे स्वतःच्या मर्जीनुसार निर्णय घेण्याचे अमर्याद स्वातंत्र्य या सत्ताधारकास असते. त्याच्या अधिसत्तेचे मूळ त्याच्या व्यक्तीच्या आकर्षकतेत किंवा त्याच्या व्यक्तिगत गुणवैशिष्ट्यांत असल्यामुळे तो स्वतः ठरवील तेवढ्याच मर्यादा त्याच्या अधिसत्तेवर पडतात. पण त्याचबोबर हेही तितकेच खरे आहे की अधिसत्तेचा मूलस्रोत आणि तिचा अभिकर्ताही (एजन्ट) तो स्वतःच असल्यामुळे तो जोपर्यंत यशस्वी होत राहतो तोपर्यंतच त्याच्या अलौकिक शक्तींवरचा लोकांचा विश्वास टिकून राहू शकतो. पण जर तो अपयशी झाला तर त्याच्या अधिसत्तेचा डोलारा कोसळून पडतो, कारण त्याची अधिमान्यता फक्त त्याच्या व्यक्तिगत यशावरच आधारित असते. त्यामुळे मॅक्स वेबरचे असे मत आहे की 'अधिसत्तेच्या इतर दोन्ही प्रकारांपेक्षा दिव्यवलयी अधिसत्ता ही अधिक अस्थिर असते, आणि या अस्थैर्यावर मात करण्यासाठी प्रत्येक दिव्यवलयी सत्ताधारक आपल्या "दिव्यवलयाला संस्थात्मक अधिष्ठान मिळवून देण्याची धडपड करीत असतो. दिव्यलयाला संस्थात्मक अधिष्ठान मिळवून प्रक्रियेला मॅक्स वेबर 'दिव्यवलयाचे परिपाठीकरण' (रुटीनायझेशन ऑफ कॅरिश्मा) असे नाव देतो. असे परिपाठीकरण झाल्यानंतर दिव्यवलय नाहीसे होत नाही. ते फक्त सत्ताधारकाच्या व्यक्तिमत्वापासून वेगळे करून संस्था संरचनेशी जोडले जाते.

**२) पारंपारिक अधिसत्ता**: राज्यकर्त्यांच्या सत्तेला लोकांकडून मिळणारी मान्यता जेव्हा पिढ्यान्पिढ्यांच्या वहिवाटीवर आधारलेली असेल तेव्हा त्यातून निर्माण होणाऱ्या अधिसत्तेला वेबरच्या वर्गीकरणात पारंपरिक अधिसत्ता असे म्हटले जाते. आदिम जनजातींच्या टोळीप्रमुखाची

अधिसत्ता ही अशा प्रकारची असते. दीर्घकालीन रुढी परंपरांवरच्या विश्वासावर ही अधिमान्यता आधारित असते. दिव्यवलयी अधिसत्तेप्रमाणेच इथेही निष्ठांचे स्वरुप व्यक्तिगत असले तरी त्यांचा मूलस्रोत मात्र प्रमुखाच्या व्यक्तिमत्वाबाहेर - परंपरेत असते.

त्याचप्रमाणे पारंपारिक अधिसत्ता धारण करणाऱ्या प्रमुखांचे मनःपूतपणे वागण्याचे व निर्णय घेण्याचे स्वातंत्र्यही दिव्यवलयी नेत्याइतके अमर्याद नसते. त्यावर परंपरेने चालत आलेल्या रुढीनियमांच्या मर्यादा असतात. पण रुढी नियम संहिताबद्ध नसलमुळे विवेकी विधिजन्य अधिसत्तेच्या तुलनेत पारंपरिक अधिसत्तेचे हे स्वातंत्र्य निश्चितच जास्त असते. जे परंपरेने स्पष्टपणे निषिद्ध ठरवलेले नाही ते करवून घेण्याचे आणि कर्तव्य ठरवलेले नाही हे थांबविण्याचे समावेशक स्वातंत्र्य सत्ताधारकांना त्यात उपलब्ध असते. दिव्यवलयी अधिसत्तेपेक्षा पारंपरिक अधिसत्ता अधिक स्थिर स्वरुपाची असते. कारण त्यात अधिसत्ता मूलस्रोत व अभिकर्ता हे एकमेकांपासून स्वतंत्र असतात. लोकांनी टोळीप्रमुखांचा जरी काही कारणाने निषेध केला तरी तो निषेध त्या पदावरच्या त्या विशिष्ट व्यक्तीचा असतो, त्या पदाच्या पारंपरिक प्रतिष्ठेला व त्याविषयी जनमानसात असलेल्या अधिमान्यतेला या निषेधाचा उपसर्ग होत नाही. प्रमुख बदलू शकतो, पदाची अधिसत्ता मात्र कायमच राहते.

**३) विवेकी विधिजन्य अधिसत्ता**: राज्यकर्ते जेव्हा बुद्धीला पटणाऱ्या म्हणजे शौर्य, कार्यक्षमता, लोकप्रियता, प्रभाव या निकषांवर नियमानुसार निवडलेले असतात, आणि त्यांच्या सत्तेला संविधानिक वा वैधानिक अधिष्ठान असते, तेव्हा त्यातून विवेकी विधिजन्य अधिसत्ता निर्माण होत असते. यात अधिमान्यता मिळते ती फक्त पदाला मिळते. पदावरील व्यक्तींच्या व्यक्तिमत्वाशी तिचा संबंध नसतो. प्रत्येक पदाचे अधिकार व कर्तव्ये बुद्धिपुरस्सर तयार केलेल्या नियमांच्या आधारे निर्धारित केलेली असतात. आज्ञापालन होते ते व्यक्तीच्या मतःपूत आज्ञांचे नसून ठरारविक कार्यपद्धतीद्वारे मंजूर केलेल्या कायद्यांचे वा घेण्यात आलेल्या निर्णयांचे. अधिसत्ताधारकाच्या आज्ञा कायदेशीर असतील आणि त्याच्या अधिकारकक्षेबाहेरच्या नसतील तरच त्याचे पालन होते. राष्ट्रपतीपासून एखाद्या सनदी अधिकाऱ्यापर्यंत कोणत्याही पदाधिकाऱ्याचे उदाहरण या संदर्भात देता येईल. यापैकी कोणालाही अमर्याद निर्णय स्वातंत्र्य उपभोगता येत नाही.

अन्य कोणत्याही अधिसत्ता प्रकारापेक्षा विवेकी विधिजन्य अधिसत्ता अधिक सुस्थिर असते. कारण पदाधिकाऱ्यावरील टीका अधिसत्तेच्या चौकटीला मुळीच धक्का लावीत नसते. एखाद्या प्रधानमंत्र्याला लोकविरोधामुळे पदत्याग करावा लागला तरी संसदीय लोकशाही व्यवस्था धोक्यात येत नाही. अधिमान्यतेचा मूलस्रोत व अभिकर्ता स्पष्टपणे परस्परांपासून निराळे असतात.

मॅक्स वेबरने वर्णन केलेले अधिसत्तेचे हे तीन प्रकार म्हणजे अधिसत्ता संबंधीची तीन आदर्श प्रारुपे आहेत. प्रत्यक्षातल्या कोणत्याही अधिसत्तेशी त्यापैकी कोणताही प्रकार तंतोतंत जुळणार नाही याची जाणीव मॅक्स वेबरला होती. कोणत्याही प्रत्यक्ष अधिसत्तेमध्ये या तिन्ही आदर्श प्रारुपांची लक्षणे मिश्र स्वरुपातच आढळतील हे त्याने मान्य केले आहे. पण प्रत्यक्षातील अधिसत्तांच्या अध्ययन विश्लेषणासाठी या आदर्शस्वरुपांचा साधन म्हणून मात्र उपयोग केला जाऊ शकतो. आदर्श - प्रारुपांच्या या मांडणीतून अधिसत्तेची 'दैवी पारंपरिक विधिजन्य' ही उत्क्रांती

वेबरला अभिप्रेत होती असे काही अभ्यासक मानतात. आधुनिक राज्यव्यवस्थेची उभारणी विवेकी विधिजन्य अधिसत्तेच्या संकल्पनेवर झालेली असली तरी अविकसित समाजांमध्ये दिव्यवलयी व पारंपरिक या दोन्ही प्रकारच्या अधिसत्ता पहायला सापडतात. श्रीमती गांधीची सत्ता प्रधानमंत्र्यांच्या पदाने त्यांना दिलेल्या अधिसत्तेपेक्षा कितीतरी मोठी होती आणि ही भर त्यांच्या दिव्यवलयी अधिसत्तेने घातली होती. प्रगत उद्योगप्रधान समाजात मात्र दिव्यवलयी व पारंपरिक अधिसत्तांना तितकासा वाव उरलेला नाही.

**प्रश्न – अधिसत्ता म्हणजे काय ते सांगून अधिसत्तेची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.**

**अधिसत्ता (Authority) :**

जेव्हा सत्ताधारकांच्या आज्ञांचे पालन त्या आज्ञांच्या पाठीशी असलेल्या अधिबलांमुळे नाही तर त्या आज्ञा योग्य आहेत अशा खात्रीतून बहुसंख्य लोक करतात तेव्हा त्या सत्तेचे रुपांतर अधिसत्तेत झालेले असते. अधिसत्ता ही संज्ञा आपण 'ऑथॉरिटी' या इंग्रजी संज्ञेचा मराठी पर्याय म्हणून वापरतो. 'ऑथॉरिटी' या शब्दाची व्युत्पत्ती 'ऑक्टर' (auctor) किंवा 'ऑक्टोरिटस' (auctoritos) या रोमन शब्दापासून झालेली असून, त्या मूळ शब्दाचा अर्थ सल्ला किंवा मसलत असा होतो. जनसभेच्या निर्णयांना स्वीकृत वा अस्वीकृत करणारी बुद्धिमंत ज्येष्ठ व अनुभवी अशा व्यक्तींची वरिष्ठ सभा रोमन राज्यव्यवस्थेत परंपरेने असायची. धर्म, परंपरा व नीती या निकषांवर ती प्रत्येक निर्णयाचे परीक्षण करायची. तिने मान्यता दिली म्हणजे मगच त्या निर्णयाला 'ऑक्टोरिटस' म्हणजे अधिकृत निर्णयाचा दर्जा मिळत असे. त्या दृष्टीने 'अधिसत्ता ही विवेकाचे संनिवेशन' असून तिच्या अंगी 'बुद्धिसंगत सांगोपांग मांडणी' करण्याची क्षमता असणे अभिप्रेत असते. सत्ताधारकापाशी ही क्षमता असली म्हणजे मग त्याच्या आज्ञांचे आपोआप पालन होते. पण ती जर नसेल किंवा ती निष्प्रभ ठरत असेल, तर तिथे बळाचा वापर करूनच आज्ञापालन मिळवणे भाग पडते. तेव्हा अधिसत्तेची मुख्य खूण 'आपोआप आज्ञापालन मिळवणे' ही असते. ते जेव्हा मिळत नाही तेव्हाच सत्तेची साधने तिला वापरावी लागतात. बहुसंख्य लोकांकडून आपोआप आज्ञापालन मिळत असेल तरच आज्ञाभंग करणाऱ्या थोड्या लोकांकडून, बलप्रयोगातून आज्ञापालन अधिसत्तेला मिळवता येते. 'तिला आज्ञा करण्याचा अधिकार आहे आणि त्या आज्ञांचे पालन करणे माझे कर्तव्य आहे.' अशी भावना बहुसंख्य लोकांच्या ठिकाणी असणे अधिसत्तेच्या अस्तित्वासाठी आवश्यक असते. अधिसत्तेची, 'बुद्धिसंगत सांगोपांग मांडणी' करण्याची क्षमता, आणि आज्ञा करण्याचा तिला अधिकार आहे ही लोकांची भावना - या दोन आधारांवर अधिसत्ता उभी असते.

**अधिसत्तेची वैशिष्ट्ये :**

सत्तेच्या तुलनेत अधिसत्तेची काही खास वैशिष्ट्ये आपल्याला पुढीलप्रमाणे सांगता येतील

**१) अधिसत्ता कमखर्चिक व सोयिस्कर असते** : अधिसत्तेद्वारे जेव्हा सामाजिक नियंत्रण केले जाते ते कमीत कमी साधनसामग्रीचा वापर करूनच शक्य होते. सत्तेसाठी जी नकारात्मक व सकारात्मक

अधिबलने लागतात ती खर्चाची असतात. विशेषतः सकारात्मक अधिबलनांसाठी तर अधिकच खर्च येतो. अधिसत्तेत बहुधा अधिबलने वापरावीच लागत नसल्यामुळे साधनसामग्रीचा बराच अपव्यय टळतो आणि नियंत्रणाचे काम कमी खर्चिक होते.

**२) अधिसत्तेची काही प्रतीके असतात** : अधिसत्ता ही व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वापेक्षा तिने धारण केलेल्या पदाशी किंवा प्रतीकांशी निगडित असते. 'राजा मरण पावला आहे, राजा चिरायू होवो' - या विधानातील राजाचा पहिला उल्लेख हा विशिष्ट व्यक्तीचा आहे. व्यती मर्त्य असते त्यामुळे अमूक एक राजा मरण पावतो. पण दुसरा उल्लेख राजपदांचा आहे. हे चिरंतन आहे. ते चिरंतन राहणे राष्ट्राच्या चिरंतनात्वाचे प्रतीक आहे. रारजाची अधिसत्ता त्याच्या मर्त्य व्यक्तिमत्वात नसून त्याच्या चिरंतन राजपदात आहे. जो कोणी त्या पदावर येईल. त्याला ती अधिसत्ता लाभते. राजपदाप्रमाणेच सिंहासन, राजवस्त्रे, मुकूट, ध्वज, बोधचिन्ह, राजदंड वगैरेंसाठी असंख्य राजचिन्हे ही अधिसत्तेची प्रतीके असताता त्या सर्वांसाठी चार्ल्स मेरियमने 'मिरांडा' असा शब्दप्रयोग केला आहे. ज्यांचा सन्मान करावा अशा वस्तू' असा त्या शब्दाचा अर्थ होतो. या वस्तूंभोवती आदरयुक्त दराऱ्याचे जणू एक अदृश्य वलय असते. बघणाऱ्याच्या दृष्टीला ते सतत जाणवत असते. समाजात या प्रतीकांविषयीचा आदरभाव जाणीवपूर्वक जोपासला जातो. राजेशाहीतच नव्हे तर लोकशाही व्यवस्थेतसुद्धा अधिसत्तेची अशी अनेक प्रतीके असतात. विधिमंडळाच्या सभापतीच्या मेजावर अधिवेशन सुरू असताना ठेवली जाणारी चांदीची गदा उदाहरणार्थ सांगता येईल.

**३) अधिसत्ता नेहमी आज्ञार्थीच बोलते** : प्रभाव आणि सत्ता ज्यांच्यावर नियंत्रण करायचे त्यांना उद्देशून जी भाषा वापरते ती बहुधा सापेक्ष स्वरुपाची किंवा अनिश्चित अशी असते. कधी ती आर्जव अनुनयाचीही असू शकते. पण अधिसत्तेची भाषा मात्र नेहमी ठाम आणि आज्ञार्थीच असते. राजा प्रजेशी युक्तिवाद करीत नसतो किंवा वाटाघाटी करीत नसतो, तो आज्ञा करतो. लोकशाहीतील कायद्यांची भाषाही आज्ञार्थीच असते. अधिसत्ता करवून घेण्याचाही अधिकार आपल्याला असल्याचे वारंवार जाणवून देत असते. प्रभावामुळे जेव्हा एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीचे वर्तन नियंत्रित करते तेव्हा त्यात दडपणाचा भाग नसतो. 'प्रभावित' व्यक्ती आपला निर्णय घेण्यास स्वतंत्र असते. जेव्हा सत्तेतून वर्चस्वसंबंध प्रस्थापित होता तेव्हासुद्धा व्यक्तीचे निर्णयस्वातंत्र्य तत्त्वतः अबाधितच असते. अधिबलने झुगारण्याचा निधडेपणा असलेली व्यक्ती सत्तेचे वर्चस्व टाळू शकते. अधिसत्ता मात्र तत्त्वतः आणि व्यवहारातः दोन्ही दृष्टींनी व्यक्तीला अधिसत्तेच्या आज्ञेपेक्षा निराळे वागण्याचे स्वातंत्र्य ठेवीत नाही.

**४) अधिसत्तेसाठी संघटना लागते** : प्रभाव आणि सत्ता यांना संघटनेची जोड नसली तरी चालते. पण अधिसत्तेला • विशेषतः आधुनिक राज्यव्यवस्थेतील अधिसत्तेला - संघटनेवाचून अस्तित्वात राहणे किंवा आपले कार्य करणे शक्यच होणार नाही. विश्वास-साधने व अधिसत्ता प्रतीके तिला आधारभूत ठरतात. कार्ये पार पाडण्याच्या दृष्टीने त्यांच्यापेक्षा संघटनेचाच उपयोग अधिसत्तेला होतो. अधिसत्ता ही व्यक्ती-व्यक्तींमधील सुसंवाद कायम व कार्यक्षम राखणारी यंत्रणा असते. संघटनात्मक संरचनेशिवाय हा सुसंवाद तिला राखताच येणार नाही.

श्रेष्ठ-कनिष्ठतेच्या तत्त्वावर आधारलेली संरचना, व्यक्तींवर वा समूहांवर सोपवलेली विशिष्ट कामे, नियम वा रुढींच्या स्वरुपात औपचारिक झालेली श्रमविभागणी, विभिन्न पातळयांमध्ये संपर्काची नियमित माध्यमे, संस्था व नियम कार्यपद्धती यातून अधिसत्तेचे कामकाज चालते. राज्याचा आकार, लोकवस्ती, सामाजिक परंपरा, गरजा आणि अपेक्षा यांच्या अनुसार अधिसत्तेवरची संरचना वेगवेगळया स्वरुपाची असून शकते. किंवा बदलत्या परिस्थितीनुसारही तिच्यात बदल घडू शकतात. पण दोन वैशिष्ट्ये या संरचनेत कायम असावीच लागतात. तळापासून वरपर्यंत दुमार्गी संपर्काची कार्यक्षम व्यवस्था असणे, आणि संरचनेचे स्वरुप समाजातील बहुलतेचे प्रातिनिधिक असणे ही दोन वैशिष्ट्ये असली तरच अधिसत्ता प्रभावीपणे काम करु शकते.

**प्रश्न – अधिमान्यता म्हणजे काय ते सांगून अधिमान्यतेची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.**

**अधिमान्यता :**

सत्तासंबंध हे जर केवळ अधिबलनांच्या प्रत्यक्ष या संभाव्य वापरावरच अवलंबून असतील तर ते तात्कालिकच राहतील. त्या संबंधांमध्ये स्थैर्य व सातत्य असल्याखेरीज ते सामाजिक नियंत्रणाचे प्रभावी साधन ठरू शकणार नाही. सत्ताधारकांच्या सत्तेच्या पाठीशी अधिबलने असणे जेवढे आवश्यक असते त्यापेक्षाही सत्तग्राहकांच्या ठिकाणी सत्तेविषयी रास्तपणाची व औचित्याची भावना असणे सत्तासंबंधांच्या टिकाऊपणासाठी आवश्यक असते. राजकीय सत्तेविषयी अशी भावना असल्यामुळे समाजातील इतर संस्थांपेक्षा राजसत्ता अधिक स्थिर, स्थायी व प्रभावी ठरते. राज्यसत्तेपाशी अधिक प्रखर अधिबलने असतात, बळाचावापर करण्याचा कायदेशीर अधिकार फक्त तिलाच असतो ते खरे आहे. पण त्या अधिबलानांचा उपयोग संख्येने थोड्या असलेल्या गुन्हेगारांविरुद्ध ती करते. बहुसंख्य लोकांच्या बाबतीत मात्र अधिबलने वापरण्याचा प्रयत्न उपस्थित होत नाही. ते राजाज्ञांचे पालन स्वेच्छेने करतात. कारण त्यांना त्या आज्ञा योग्य वाटतात व त्यांचे पालन करणे हे आपले कर्तव्य वाटते. याचा अर्थ असा की राज्यसत्तेच्या दृष्टीने अधिबलनांपेक्षा जनमानसातील औचित्यभावना अधिक महत्त्वाची असते. या भावनेतून सत्ताधारकाच्या सत्तेला जे भक्कम मिळते त्यालाच अधिमान्यता असे म्हणतात.

अधिमान्यतेचा संबंध सत्ता वापरण्याच्या क्षमतेपेक्षा सत्ता वापरण्याच्या अधिकाराशी असतो. त्यात सत्ताधारकाच्या आज्ञा करण्याच्या अधिकाराइतकेच सत्ताग्राहकाच्या आज्ञापालनाच्या अधिकारालाही महत्त्व असते. आपली भूमिका सत्ताधारकाच्या इच्छेनुरुप बदलण्याला सत्ताग्राहकाची संमती असणे असा आज्ञापालनाच्या अधिकाराचा अर्थ होतो. सत्ताधारकाच्या आज्ञेला सत्ताग्राहकाच्या अधिमान्यतेची जोड जेव्हा मिळते तेव्हा त्यातून अधिसत्तेच उदय होतो. अधिसत्तेच्या आज्ञांना या अधिमान्यतेमुळे अधिकृतता येते व त्या न्याय्य आहेत असे गृहीत धरुन लोक त्यांचे आपोआपच पालन करतात.

**२. अधिमान्यतेची वैशिष्ट्ये :**

**१) सारलक्षी अधिमान्यता आणि कार्यपद्धतीलक्षी अधिमान्यता** : राज्यकर्त्यांची निवड कशी झाली आहे, किंवा तो आपले निर्णय कशा प्रकारे घेतो व राबवतो यापेक्षा त्याच्या कृतींच्या व निर्णयांच्या गुणवत्तेच्या आधारे जेव्हा त्याच्या सत्तेची अधिमान्यता निर्धारित झालेली असते तेव्हा त्या अधिमान्यतेला सारलक्षी अधिमान्यता असे म्हटले जाते. उदाहरणार्थ, कोणताही राज्यकर्ता जेव्हा स्वार्थासाठी सार्वजनिक हिताचा बळी देऊन आपली सत्ता वापरतो तेव्हा त्याची सत्ता अनधिमान्य ठरते व तो “जुलमी” ठरतो. सत्य, न्याय, सौदर्य इत्यादींप्रमाणेच सार्वजनिक हित हे सुद्धा स्वयंसिद्ध मूल्य असते आणि ते स्पष्टपणे संवेद्य असते हे या संकल्पनेमागील गृहीतकृत्य आहे. प्लॅटोचा आदर्श राज्यकर्ता हा तत्वज्ञ होता. म्हणजे तो ज्ञानी होता, त्याला आदिम संकल्पनांचे ज्ञान विवेकाच्या बळावर झालेले असल्यामुळे त्याचे स्खलन होण्याची किंवा तो स्वार्थी होण्याची शक्यता नव्हती. त्यामुळे त्याच्या निर्णयातून न्यायच होने क्रमप्राप्त होते. लोकांच्या मनात हा पक्का विश्वास असल्यामुळे त्यांनी त्याच्या आज्ञांचे पालन करणे स्वाभाविकच होते. प्लॅटोच्या या विवेचनात सारलक्षी अधिमान्यतेची संकल्पना व्यक्त झाली आहे, किंवा राजाच्या आज्ञा नैसर्गिक कायद्यानुसारच असाव्यात असा आग्रह धरणारा क्विनास किंवा राजाने प्रसंगी दुष्ट ! मार्गांचा अवलंब केला तरी सत्कृत्यांमधून तो त्या दुष्ट कृत्यांनाही अधिमान्यता मिळवू शकतो असे सांगणारा मॅकेव्हली हे सारलक्षी अधिमान्यतेचाच पुरस्कार करतात. राज्यकर्ते अधिसत्तेचा वारंवार व योजनापूर्वक गैरवापर करीत नाहीत आणि लोकांना गुलाम बनवीत नाहीत तोपर्यंत त्यांच्या आज्ञांचे लोक पालन करणारच असे मांडणारा लॉक, किंवा कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवण्यावर राजाच्या सत्तेची अधिमान्यता अवलंबून असते असे मांडणारा हॉब्जसुद्धा याच संकल्पनेच्या आधारे अधिमान्यतेचा विचार करतो.

**कार्यपद्धतीलक्षी (प्रोसिजरल) अधिमान्यता** : राज्यकर्त्यांची निवडणूक पद्धती व त्यांची निर्णय पद्धती संविधानात व वैधानिक नियमांना धरुन असण्यावर आधारित असते. रुसोच्या सर्वसाधारण ईहे' च्या कल्पनेतून या अधिमान्यतेचा पुरस्कार झाला आहे. त्याच्या मते, राज्यकर्त्यांच्या विशिष्ट कृतीचा निर्णय कोणत्या पद्धतीने घेण्यात आला होता यावर त्याची अधिमान्यता अवलंबून असते. लोक आपल्या प्रतिनिधींच्या हाती सत्ता सोपवीत असले तरी तेवढ्यामुळे ते प्रतिनिधी मूळ सार्वभौमशक्तीचे धारक होत नाहीत. सार्वभौमत्व सर्वसाधारण ईहेच्याच ठिकाणी अबाधित राहते. सर्वसाधारण ईहेने प्रमाणित केलेल्या पद्धतीनुसार ज्या कृती घडतील तेवढ्याच अधिमान्य करण्यास लोकांनी संमती दिलेली असते.

इंग्लंडमध्ये सत्ता जसजशी राजाकडून संसदेकडे आणि त्यातही लॉर्डस सभागृहाकडून कॉमन्स सभागृहाकडे संक्रमित झाली, आणि संसदेचे जसजसे लोकशाहीकरण होत गेले तसतशी सारलक्षी अधिमान्यतेची जागा कार्यपद्धतीद्वारे केलेला कोणताही कायदा 'सांविधानिक" व "अधिकृत" ठरु लागला.

अमेरिकन क्रांतीत मात्र सारलक्षी वा कार्यपद्धतीलक्षी अशा दोन्ही अधिमान्यतांचा समन्वय होता. ब्रिटिश संसदेने केलेले कायदे गुलामगिरीचे आहेत, म्हणून अमेरिकन वसाहती त्यांची सारलक्षी अधिमान्यता आव्हानित करीत होत्या. पण त्यांची 'ना प्रतिनिधित्व ना कर' ही घोषणा मात्र कार्यपद्धतीलक्षी अधिमान्यतेवर आधारित होती. अमेरिकन स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्यातून अधिमान्यतेची एक नवीनच संकल्पना प्रचलित झाली. रुसो आणि लॉक यांच्या विचारांचा त्यात समन्वय आढळतो. राज्यकर्त्यांच्या सत्तेवर केवळ कार्यपद्धतीच्यात नव्हेत तर साररूपीही मर्यादा असायलाच पाहिजेत. या दृष्टीने अमेरिकन संविधानकारांनी न्यायिक पुनरावलोकनाच्या (ज्युडिशियल रिव्हयू) स्वरुपात सारलक्षी अधिमान्यतेचे तत्त्व संविधनात प्रतिष्ठित केले. विधिमंडळाने जरी योग्य ती कार्यपद्धती सांभाळून काही कायदे मंजूर केले असले तरीपण जर त्या कायद्यांचा आशय संविधानाच्या आशयाशी विसंगत असेल तर सर्वोच्च न्यायालय त्या कायद्यांना अवैध घोषित करु शकते.

**२) अधिमान्यता परंपराजन्य असते, स्वाभाविक नव्हे** : अधिसत्तेला प्रमाण मानून तिच्या इच्छेनुसार वागणे हे मानवी स्वभावाशी सुसंगत आहे किंवा समाजरचनेतील उतरंड नैसर्गिक किंवा सहजप्रेरणेवर आधारित आहे. त्यामुळे कनिष्ठांनी वरिष्ठांची सत्ता मान्य केलीच पाहिजे असे प्रतिपादन राज्यशास्त्रीय विचारात दीर्घकाळ केले जात असे. पण वर अधिमान्यतेसंबंधी जो विचार आपण केला त्यावरुन हे स्पष्ट होते की अधिमान्यतेची सर्व विचारसाधने परंपराजन्य आहेत. परंपरेत विशिष्ट परिस्थितीतून ती निर्माण होता आणि समाजीकरणाच्या प्रक्रियेतून माणसे ती शिकतात. जन्माला येतानाच ती त्या धारणा घेऊन आलेली नसतात. व्यक्तीचे स्थान जन्मावरून नव्हे तर तिच्या गुणांवर व कर्तबगारीनुसार ठरते.

**३) अधिमान्यता वरुन खाली आणि खालून वर** : अनेक शतकांपूर्वी अधिसत्तेला ईश्वरी मानून तिची अवज्ञा करणे, तिला प्रतिकार करणे अवैध समजले जाई. या अर्थाने अधिसत्तेची अधिमान्यता वरुन खाली उतरलेली आहे असा समज होता. पण आता शासितांकडून शासकांकडे म्हणजे 'खालून वर' अधिमान्यता जाते हे सर्वमान्य झाले आहे. खालून वर जाणाऱ्या अधिमान्यतेच्या संकल्पनेनुसार काही - कार्यपद्धतीत्मक सारलक्षी - शर्ती पूर्ण करण्याच्या अटींवर राज्यकर्त्यांकडे अधिसत्ता दिलेली असते. त्यांनी जे करायचे ते ठरवून दिलेल्या पद्धतीनेच केले पाहिजे, आणि जे करण्याची त्यांना अधिसत्ता दिली आहे फक्त तेवढेच करायचे असे त्यांनी केले तरच त्यांच्या सत्तेची अधिमान्यता टिकून राहील. वरून खाली आलेल्या अधिमान्यतेनुसार राज्यकर्त्यांची अधिसत्ता सर्वसाधारण होती म्हणजे सर्वच क्षेत्रे तिच्या अधिकार कक्षेखाली होती. 'खालून वर' जाणारी अधिसत्ता त्यांचे अधिकारक्षेत्र विशिष्ट क्षेत्रापुरतेच सीमित करते. त्या क्षेत्राबाहेर जाऊन त्यांनी काही केल्यास त्या कृतींना अधिमान्यता मिळू शकत नाही.

**४) अधिमान्यता आणि सामाजीकरण** : अधिसत्तेला मान्यता देण्याची प्रवृत्ती जन्मसिद्ध नसते, तर ती सामाजीकरणाच्या प्रक्रियेतून व्यक्ती शिकतात. पण प्रत्येक प्रकारच्या अधिसत्तेबद्दल ही शिकण्याची प्रक्रिया निरनिराळ्या प्रकारे घडून येते. दिव्यवलयी अधिसत्तेला दिली जाणारी अधिमान्यता व्यक्तिगणित वेगळ्या कारणांतून असल्यामुळे त्याबद्दल सर्वसाधारण विधाने करणे

अशक्य आहे. पारंपारिक अधिसत्तेविषयीची अधिमान्यता एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित होते. दीर्घकालीन परंपरेतून अधिसत्तेचे संस्थीकरण घडते. वर्षानुवर्षे व पिढ्यान्पिढ्या चालत आलेली अधिसत्ता लोक सवयीने प्रमाण मानून तिचे निर्णय मान्य करतात. विवेकी-विधिजन्य, अधिसत्तेविषयीची अधिमान्यता बव्हंशी राजकीय सामाजीकरणातून शिकली जाते. कुंटुंब, मित्रमंडळी, शालेय व्यवस्था, राजकीय पक्षांसारखे राजकीय समूह यांच्याद्वारे सामाजीकरण घडते. व्यक्ती अधिसत्तेला शरण जातात, जबाबदार राहतात की तिच्यात स्वतः सहभागी होतात, हे सामाजीकरणावर अवलंबून असते. अधिसत्तेविषयीच्या त्यांच्या श्रद्धा व भावना यांना ते आकार देते.

**प्रश्न – अधिमान्यता म्हणजे काय ते सांगून तिला अधिमान्यता कशी मिळते ते स्पष्ट करा.**

**अधिमान्यता :**

सत्तासंबंध हे जर केवळ अधिबलनांच्या प्रत्यक्ष या संभाव्य वापरावरच अवलंबून असतील तर ते तात्कालिकच राहतील. त्या संबंधांमध्ये स्थैर्य व सातत्य असल्याखेरीज ते सामाजिक नियंत्रणाचे प्रभावी साधन ठरू शकणार नाही. सत्ताधारकांच्या सत्तेच्या पाठीशी अधिबलने असणे जेवढे आवश्यक असते त्यापेक्षाही सत्तग्राहकांच्या ठिकाणी सत्तेविषयी रास्तपणाची व औचित्याची भावना असणे सत्तासंबंधांच्या टिकाऊपणासाठी आवश्यक असते. राजकीय सत्तेविषयी अशी भावना असल्यामुळे समाजातील इतर संस्थांपेक्षा राजसत्ता अधिक स्थिर, स्थायी व प्रभावी ठरते. राज्यसत्तेपाशी अधिक प्रखर अधिबलने असतात, बळाचावापर करण्याचा कायदेशीर अधिकार फक्त तिलाच असतो ते खरे आहे. पण त्या अधिबलानांचा उपयोग संख्येने थोड्या असलेल्या गुन्हेगारांविरुद्ध ती करते. बहुसंख्य लोकांच्या बाबतीत मात्र अधिबलने वापरण्याचा प्रयत्न उपस्थित होत नाही. ते राजाज्ञांचे पालन स्वेच्छेने करतात. कारण त्यांना त्या आज्ञा योग्य वाटतात व त्यांचे पालन करणे हे आपले कर्तव्य वाटते. याचा अर्थ असा की राज्यसत्तेच्या दृष्टीने अधिबलनांपेक्षा जनमानसातील औचित्यभावना अधिक महत्त्वाची असते. या भावनेतून सत्ताधारकाच्या सत्तेला जे भक्कम मिळते त्यालाच अधिमान्यता असे म्हणतात.

अधिमान्यतेचा संबंध सत्ता वापरण्याच्या क्षमतेपेक्षा सत्ता वापरण्याच्या अधिकाराशी असतो. त्यात सत्ताधारकाच्या आज्ञा करण्याच्या अधिकाराइतकेच सत्ताग्राहकाच्या आज्ञापालनाच्या अधिकारालाही महत्त्व असते. आपली भूमिका सत्ताधारकाच्या इच्छेनुरुप बदलण्याला सत्ताग्राहकाची संमती असणे असा आज्ञापालनाच्या अधिकाराचा अर्थ होतो. सत्ताधारकाच्या आज्ञेला सत्ताग्राहकाच्या अधिमान्यतेची जोड जेव्हा मिळते तेव्हा त्यातून अधिसत्तेच उदय होतो. अधिसत्तेच्या आज्ञांना या अधिमान्यतेमुळे अधिकृतता येते व त्या न्याय्य आहेत असे गृहीत धरुन लोक त्यांचे आपोआपच पालन करतात.

**अधिमान्यता कशी मिळते :**

अधिबलने वापरण्यापेक्षा अधिमान्यतेच्या आधारावर सत्ता चालवणे केव्हाही कमी खर्चाचे, कमी कष्टाचे आणि जास्त प्रभावी ठरु शकत असले तरी ही अधिमान्यता मिळवणे तसे सोपे नसते. सत्ताधारकांना ती मिळवण्यासाठी बरेच प्रयत्न करावे लागतात. त्यासाठी अनेक मार्ग सत्ताधारक अवलंबीत असतात.

**१) विचारप्रणालीतून अधिमान्यता** : सत्ताधारक काही विचारांच्या आधारे मूल्यांची एक आदर्शलक्षी संदर्भचौकट लोकांसमोर उभी करतात. जेव्हा या विचारांना स्पष्ट, सुसंगत व अभिव्यक्त असे स्वरुप प्राप्त होते तेव्हा त्यालाच आपण विचारप्रणाली म्हणून ओळखतो. विचारप्रणालीच्या ठिकाणी विलक्षण भावनिक क्षमता असते. तिचे आवाहन एवढे जबरदस्त असते की, माणसे आपली स्वतंत्र विचारक्षमता व तत्कालिक स्वार्थ बाजूला ठेवून पुढारी सांगतील त्या कार्यात स्वत:ला झोकून देतात. विचारप्रणालीच्या या भावनिक सामर्थ्याचा उपयोग सत्ताधारक आपल्या सत्तेला, अधिमान्यता मिळवण्याच्या कामी करवून घेतात. विशेषतः अस्थिर शासकीय परिस्थितीत विचारप्रणाली या कामी अधिकच वापरली जाते, कारण ही स्थिती भावनिक आवाहनासाठी खास पोषक असते.

विचारप्रणालीचे शस्त्र तसे दुधारी असते. सत्ताग्राहक तिच्या प्रभावाखाली येऊन आज्ञापालन करण्याची जशी शक्यता असते, तद्वतच तिची मूल्यात्मक चौकट सत्ताधारकांचे स्वातंत्र्यही मर्यादित करीत असते. सत्ताधारक जर ती मूल्ये व आदर्श आपल्या कारभाराद्वारे सतत पायदळी तुडवू लागले तर त्यांची अधिमान्यता धोक्यात येऊ शकते. दुसरे असे की सत्ताधारकाच्या विचारप्रणालीला शह देऊ शकणारी नवी विचारप्रणाली समाजात उदयास येण्याचीही नेहमीच शक्यता असते. विचारप्रणालीच्या संघर्षामुळे अस्थैर्य माजून अधिसत्ता कोसळण्याचा धोका असतो. त्यामुळे विचारप्रणालीपेक्षा अधिक भरभक्कम पाया आपल्या सत्तेच्या अधिमान्यतेसाठी मिळवण्याच्या प्रयत्नात सत्ताधारक असतात.

**२) विश्वास साधनांच्या आधारे अधिमान्यता** : अधिसत्तेवर लोकांचा विश्वास आणि श्रद्धा असते आणि तीच अधिसत्तेच्या कृतींना व निर्णयांना अधिमान्यता मिळवून देत असते असे आपण वर पाहिले. या विश्वासाच्या व श्रद्धेच्या मुळाशी जी कारणे असतात त्या सर्वांना मिळून क्रेडेन्डा किंवा विश्वासघाताचे असे नाव मेरियमने दिले आहे. शब्दश: क्रेडेडाचा अर्थ 'केवळ विश्वासातून स्वीकारलेल्या गोष्टी' असा होतो. मॅक्स वेबरने अधिसत्तांचे जे वर्गीकरण विश्वाससाधने असतात आणि त्यांचे मूलस्रोतही वगळले असतात दिव्यवलयी अधिसत्ता, पारंपारिक अधिसत्ता आणि विवेकी-विधिजन्य अधिसत्ता असे तीन प्रकार मॅक्स वेबरने अधिसत्तांचे केले आहेत. यापैकी प्रत्येक प्रकारच्या अधिसत्तेला अधिमान्यता मिळवून देणारी विश्वाससाधने पुढीलप्रमाणे आहेत.

**अ) नेत्याच्या दिव्यलयावरील श्रद्धा** : काही वेळा अधिसत्तेची अधिमान्यता ही केवळ नेत्याच्या व गटाच्या अंगी नावलौकिक शक्ती आहे या विश्वासावर आधारलेली असते. समुदायासाठी हा नेता गट योग्यच निर्णय घेईल असे गृहीत धरुनच लोक चालतात. त्यांच्या या विश्वासाचा मूलस्रोत धर्मग्रंथांतील वचनांत किंवा त्या वचनांत वर्णिलेल्या गोष्टींशी जुळणान त्या धुरिणांच्या वैशिष्ट्यांत

असतो, कधीकधी आपल्या या नेत्यांना ईश्वराने चमत्कार करण्याची दैवीशक्ती दिलेली आहे या अंधश्रद्धेतही तो असतो. वेगळ्याच क्षेत्रांतील (उदा. क्रीडा, संशोधन वैगरे) असामान्य कतृत्व वा क्षमताही अशा विश्वासांच्या पाठीशी कधीकधी असतात. प्रसंगी व्यक्तिमत्त्वातील देखणेपणा, रुबाब व लैंगिक आकर्षकताही दिव्यलय उभे करण्यास पुरेशी ठरते. दिव्यवलयी नेत्यांच्या शब्दांना जनमानसात आपोआपच अधिमान्यता लाभते.

**ब) परंपरेतून विश्वास** : 'हे असेच नेहमी चालत आले आहे', किंवा बापजाद्यांची ही रीत आहे तेव्हा आपण ती मोडणारे कोण? अशा भावनेतून लोक अधिसत्तेच्या आज्ञा बिनतक्रार स्वीकारतात. पण त्याचबरोबर रुढी व परंपरा यातून अधिसत्तेवर काही मर्यादाही पडतात. तेवढ्या मर्यादा सांभाळल्या की त्यांच्या अधिमान्यतेला कसलेच भय नसते. रुढी, सवयी, अंधश्रद्धा, धारणा इत्यादींमध्ये या विश्वासांचा उगम होत असतो.

**क) विवेक - विधिव्यवस्था यातून विश्वास** : या विश्वासाचे स्वरुप दोहोंपेक्षा मूलतः निराळे असते. त्यात सत्ताधारकांच्या अधिमान्यतेचे स्वरुप डोळस असते. विवेकाच्या निकषावर होणारी सत्ताधारकांची कार्यक्षमता व प्रभावीपणा यांचा भाग जसा त्यात असतो, त्याचप्रमाणे ही सत्ता काही संविधानिक व अन्य वैधानिक निर्बंधांनी सीमित आहे. तद्वतच अधिसत्तेची पदे धारण करणाऱ्यांची निवड, त्यांनी घेतलेल्या निर्णयांचा आशय आणि ते निर्णय घेताना अवलंबात आणलेली कार्यपद्धती, या निर्बंधाचा भंग करणारी नाही अशी खात्री या विश्वासाच्या मुळाशी असते. व्यापक प्रमाणावरची साक्षरता, नोकरशाहीची कार्यक्षम बांधणी, सिद्धान्तारोपण हे या विश्वासाने मूलस्रोत असतात.

**प्रश्न - विधी नियम म्हणजे काय ते सांगून विधी नियमाची उगमस्थाने व वैशिष्ट्ये स्पष्ट करा.**

**१ प्रास्ताविक :**

जेलिंक या ब्रिटिश विचारवंताने असे प्रतिपादन केले आहे की “विधिनियम / कायदे नसलेले राज्य म्हणजे अराजकाची राजवट.” (**A state without law is a regime of amareny)** थॉमस हॉब्ज याने राज्याच्या व्युत्पत्तीसंबंधीच्या सामाजिक करार सिद्धांतात असे प्रतिपादन केले आहे की निसर्गावस्थेतील अराजक संपुष्टात आणण्यासाठी राज्याची स्थापना करण्यात आली. शांतता व सुव्यवस्था निर्माण करण्यासाठी आवश्यक असणारे कायदे करण्याचा अधिकार राजाला बहाल करण्यात आला. या अधिसत्तेच्या आधारे राजा सार्वभौम बनला. सार्वभौमााची सत्ता निरंकुश स्वरुपाची असते. सार्वभौमाचे आदेश / कृती कायदे असतात आणि त्याच्या आज्ञेचे पालन करणे हे नागरिकांचे कर्तव्य असते. निरंकुश राजसत्तेचा पुरस्कार करणाऱ्या या विचाररणीने राजाची आज्ञा म्हणजे कायदा असे प्रतिपादन केले. फ्रान्सचा राजा चौदावा लुई याने ‘मी म्हणजे राज्य’ (**I am the State)** अशी दर्पोक्ती केली. या विवेकशून्य राजसत्तेवर नियंत्रण प्रस्थापित

करणारा सत्ताविभाजनाचा सिद्धांत माँटेस्क्यू याने त्याच्या **Spirit of the Laws** या ग्रंथात मांडला. त्यात असे प्रतिपादन केले की विवेकनिष्ठ कायदेमंडळ व त्याद्वारा निर्मित कायदेच नागरिकांच्या जीवित, वित्त व स्वातंत्र्याचे संरक्षण करू शकतील. म्हणजेच कायद्याचा उद्देश शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करण्यापुरता सीमित नाही, तर नागरिकांचा जीवित, स्वातंत्र्य व संपत्तीचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने कायद्यांची निर्मिती केली जाते.

**२ विधिनियम या संकल्पनेचे स्पष्टीकरण :**

विधिनियम या संकल्पनेची अन्योन्य संबंध राज्याच्या सार्वभौमत्वाची आहे. विधिनियमांची निर्मिती, अस्तित्व आणि त्यांची कार्यवाही या सर्वांचा मूलाधार राज्याची सार्वभौम सत्ता आहे. ॲरिस्टॉटल यांने त्याच्या **Politics** या ग्रंथात सार्वभौमत्यास 'राज्याची सर्वोच्च सत्ता' असे म्हटले होते. मध्ययुगाच्या अखेरच्या टप्प्यात राष्ट्र-राज्यांचा उदय झाला. सरंजामी व्यवस्थेच्या अराजकातून बाहेर पडल्यानंतर प्रादेशिक राज्यांना आणि नंतरच्या काळात राष्ट्र-राज्यांनी सुव्यवस्था व शांतता प्रस्थापित करण्याच्या गरजेतून निरंकूश आणि अमर्याद सत्ता असलेली राजेशाही उदयास आली. राजाची सत्ता सर्वश्रेष्ठ असल्याने प्रतिपादन जो बोदॅं, थॉमस हॉब्ज आणि ग्रॅशियस या विचारवंतांनी केले. त्यांच्या मते राज्याच्या भूप्रदेशामधील सर्व व्यक्ती व संस्थांवर अधिकार गाजवण्याची सत्ता म्हणजे सार्वभौमत्व **Lectures on Juris prudence** या १८३२ साली प्रसिद्ध झालेल्या ग्रंथात जॉन ऑस्टिन या विचारवंताने विधिविषयावर आधारित सार्वभौमत्वाची व्याख्या केली. त्याच्या मते वरिष्ठाने कनिष्ठाला दिलेली आज्ञा म्हणजे विधिनियम. या अर्थ सार्वभौम सत्तेची आज्ञा हा विधिनियम असतो. अन्य कोणत्याही प्रकारच्या आदेश-आज्ञेला विधिनियम म्हणता येणार नाही. प्रजाजनांनी सार्वभौम सत्तेच्या आज्ञेचे- विधिनियमांचे पालन करणे अपेक्षित असते. आज्ञापालन न करणे हा सार्वभौम सत्तेचा अपमान असतो आणि कायदेभंगाच्या या कृतीसाठी त्या व्यक्तीला शासन फर्मावण्याचा अधिकार राजा-राज्याला असतो. अशा प्रकारे राज्याच्या नियमांना कायदे-विधिनियम असे म्हणतात.

**३. विधिनियमाची व्याख्या :**

इंग्रजी भाषेत कायद्याला विधिनियमास **Law** असे म्हणतात. हा शब्द लॅटिन भाषेतील **Law** या शब्दापासून बनला आहे. **Law** म्हणजे सर्वांना लागू होणारे नियम. म्हणजेच सर्व व्यक्तींना लागू होणारे मानवी वर्तनाचे नियम म्हणजे विधिनियम.

ऑक्सफर्ड या इंग्रजी भाषेतील शब्दकोषानुसार "कायदा म्हणजे सत्तेने लादलेले मानवी विषयक नियम. जॉन ऑस्टिनच्या मते," सार्वभौम सत्तेची आज्ञा म्हणजे कायदा." राजेशाहीत राजाची आज्ञा कायदा असते, तर संसदेने केलेल्या नियमांना कायदा – विधिनियम म्हणतात.

हॉलंड या विविज्ञाच्या मते, "कायदा म्हणजे मानवाचे बाह्य वर्तन निर्धारीत करणारे नियम." असे नियम अंमलात आणण्याचा अधिकार राज्यातील सार्वभौम सत्तेस असतो.

जॉन सालमंड या विचारवंताने असे प्रतिपादन केले आहे की, "कायदा म्हणजे न्यायाच्या स्थापनेसाठी राज्य निर्माण केलेल्या आणि कार्यवाहीत आणलेल्या नियमांचा संच.'

### ४. विधिनियमाची उगमस्थाने :

विधिनियमाची उत्पत्ती ही राज्याच्या सार्वभौम सत्तेद्वारा होते. परंतु अशा प्रकारे उत्पत्ती होत असताना अनेक साधने जबाबदार असतात. नवीन विधिनियमांतील तथ्य तसेच तपशील हा या साधनांद्वारा ठरत असतो. अशा साधनांचे विवरण पुढीलप्रमाणे आहे :

**1.रुढी (Customs) :** राज्यसंस्था निर्माण किंवा स्थिर होण्यापूर्वी व्यक्तिसंबंध हे समाजमान्य रुढीच्या कसोटीने ठरविले जात असत. बहुतेक वेळा या रुढी सर्वांच्या फायद्याच्या असल्याने त्या मानल्या जात असत किंवा त्याद्वारा समाजात स्थैर्य प्राप्त होईल या आशेने त्या पाळल्या जात असत. थोडक्यात, सामाजिक गरजांवर आधारित अशा त्या रुढी होत्या. कळत नकळत या रुढी निर्माण झाल्या. त्या केव्हा निर्माण झाल्या हे जरी सांगता आले नाही तरी त्या कोणा एका राज्याच्या आज्ञेने वा विधिमंडळाच्या ठरावाने निर्माण झाल्या नाहीत हे आपण सांगू शकतो. समाजजीवन एकजिनसी, साधे सरळ असेपर्यंत, या रुढींचा समाजीवन बंधानात्मक करण्यासाठी चांगलाच उपयोग झाला. आज आपण केवळ रुढींना जरी विधिनियम म्हणून मानत नसलो तरी त्यांचे महत्त्व संपले आहे असे नव्हे. रुढी, परंपरा यांकडे दुर्लक्ष करून वा त्यांच्या संपूर्णपणे विरुद्ध जाऊन नवीन विधिनियम करणे आज कोणत्याही राज्यसंस्थेला जड जाते. इंग्लंडमधील अनेक विधिनियम 'कॉमन लॉ' म्हणून अस्तित्वात असलेल्या रुढीस्वरुपी नियमांवर आधारित आहेत. भारतामध्ये जातिसंस्थेतील अनेक रुढी विधिनियमांसारख्याच पाळल्या जात असत.

**2.धर्म (Religion) :** प्राचीन काळात किंवा त्यानंतर मध्ययुगीन काळापर्यंषत सामाजिक रुढी हा धर्माचा भागच समजला जाई. किंबहुना या दोहोंमध्ये फरकही जाणवत नसे. परिणामी त्या न पाळल्यामागे पापाची भीतीही होती. या काळामध्ये योग्य-अयोग्यसंबंधी किंवा न्याय-अन्याय वागणुकीसंबंधीची धर्मगुरुची मते अखेरची सजून त्यांची अंमलबजावणी या धर्मगुरुंकडूनच होत असण्याची शक्यता आहे. त्यांच्या सूचना वा आज्ञा या तत्कालीन दंडशक्तीच्या आधारे अंमलबजावणी केल्या जात. अशा वेळी धर्मगुरुच न्यायदाता व त्याने सांगितलेला नियम म्हणजे विधिनियम होत असे आपण म्हणू शकू. रोममधील सुरुवातीचे विधिनियम हे बहुतांशी धार्मिक नियमत होते. भारतामध्ये हिंदू विधिनियम व मुस्लिम विधिनियम यांचे उत्पत्तिस्थान त्यांच्या धार्मिक आचार-विचारांमध्ये आहे.

**3.न्यायपंडितांची मते (Commentaries):** अनुभवी, विद्वान न्यायपंडितांच्या मतांचाही विधिनिर्मितीमध्ये मोठा वाटा असतो. अशी मते मांडतांना न्यायपंडितांना एखाद्या मुद्दा शासनाला या लोकांना पटवून देण्याची इच्छा असते. या त्यांच्या मतांचा परिणाम निरनिराळ्या थरांवर होत असतो. न्यायाधीश त्या मतांचा एखादा निर्णय देताना विचार करण्याची शक्यता असते. तसेच विधिमंडळाचे सभासद ह्या मताचा उपयोग नवीन विधेयकाला विधिनियमांचे स्वरुप देताना करण्याची शक्यता असते. त्या मतांचा परिणाम समाजातील बुद्धिजीवी लोकांवर होऊन ते आपल्या विधिमंडळातील प्रतिनिधींवर दबावही आणतात. अर्थात या सर्व मतांना विधिनियमांचे स्वरुप येतेच असे नाही. मात्र विधिमंडळापेक्षा न्यायाधीश या मतांचा जास्त उपयोग करीत असतात. न्यायपंडित अस्तित्वातील विधिनियम, सामाजिक रुढी, पूर्वीचे न्यायमूर्तीचे निर्णय यांचे तर्कशुद्ध संकलन करून, त्यांची तुलना करूशनकाही सर्वसाधारण तत्त्वांचा उपयोग करतात. त्याद्वारे विधिनियमांतील दोष विशद होतात.

**4.न्यायधीशांचे निर्णय (Judicial Decisions) :** प्रमुख न्यायालयांच्या न्यायाधीशांनी दिलेले निर्णय इतर न्यायाधीश नेहमीच मार्गदर्शक विधिनियम म्हणून पाळत असतात. अशा प्रकारे न्यायाधीशाने केलेले विधिनियम हे नेहमीच्या विधिनियमांसारखेच मानले जातात. विधिमंडळाने केलेल्या विधिनियमांचा न्यायाधीशांनी सांगितलेला अर्थ हाच खऱ्या दृष्टीने विधिनियम म्हणून मानला जातो. भारतामध्ये सर्वोच्च न्यायालयाने दिलेले निर्णय इतर उच्च न्यायालयांनी मार्गदर्शक मानावयाचे आहेत.

अनेक वेळा न्यायाधीशांपुढे प्रश्नांसंबंधी विधिनियम वा सामाजिक रुढी यांचे मार्गदर्शन न मिळाल्यामुळे समस्या उभी राहते. बदलत्या परिस्थितीनुसार काही नवेच प्रश्न उभे राहिलेले असतात. अशा वेळी व्यवहारबुद्धी, अनुभव यांच्या आधारे न्यायाधीश निर्णय देतात. अशा प्रकारचे निर्णय भावी न्यायदानाच्या वेळी विधिनियमाप्रमाणेच उपयोगी पडतात.

**5.समन्याय बुद्धी (Equity) :** योग्य, न्याय्य, चांगले समजण्याची क्षमता म्हणजे समन्याय बुद्धी होय. न्यायधीशांनी न्याय देताना विधिनियमांचा अर्थ लावून तो न्याय द्यावयाचा असतो. परंतु अनेक वेळा काही प्रश्नासंबंधी विधिनियम अस्तित्वात नसतात, तर काही वेळा ते विविधार्थी असतात किंवा अस्तित्वातील विधिनियम योग्य न्याय देण्यास अपुरे किंवा असमर्थ ठरतात. अशा वेळी न्यायाधीश समन्याय बुद्धीच्या आधारे न्याय देतात. त्यांना विधिनियमांचे स्वरुप येते.

**६) विधिमंडळ (Legislations) :** विधिमंडळाने केलेले विधिनियम हे महत्त्वाचे विधिनियम होत. आधुनिक काळात राज्यसंस्थेचा व्याप वाढत असताना दरवर्षी अधिक विधिनियमांची गरज भासावी हे स्वाभाविक आहे. हे सर्व विधिनियम विधिमंडळातर्फे तयार केले जातात. वरील इतर उत्पत्ति साधनांमध्ये विधिमंडळ विधिमंडळाने केलेले विधिनियमच निश्चित स्वरुपाचे, लोकमताच्या पाठिंब्यावर आधारित असतात. विधिनियमांच्या उत्पत्तिसाधनांविषयी ओपेनहेम म्हणतात, "वरील सर्व साधने ही निरनिराळी नसून विधिनियमांच्या उत्क्रांतीतील त्या पायऱ्या आहेत. प्रत्येक विधिनियम हा समाजमान्यतेवर, लोकमतावर आधारित असतो. सामाजिक रुढी, धर्म, समन्याय बुद्धी इत्यादी साधनेही त्या त्या वेळीचे समाजमान्यता प्रगट करण्याचे मार्ग होते. प्रगत देशात विधिमंडळाला जास्त प्राधान्य हे स्वाभाविकपणे आलेच."

**५. कायद्याची वैशिष्ट्ये :**

कायद्याची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत:

१) कायदा म्हणजे राज्याच्या सार्वभौम सत्तेच्या इच्छेची अभिव्यक्ती होय. ब्रिटिश संसद सार्वभौम आणि तिच्याद्वारा पारीत करण्यात आलेल्या नियमांना कायदा-विधिनियमाचा दर्जा प्राप्त होतो. निरंकुश राजसत्तेत राजाची इच्छा कायदे समजली जात असे.

२) आधुनिक राज्यात विधिनियमांची निर्मिती करण्याची जबाबदारी शासनसंस्थेच्या विधिमंडळ या घटकसंस्थेकडे सोपविण्यात आली आहे. विधिमंडळाद्वारा पारीत विधेयकांना राज्यप्रमुखाची संमती मिळाल्यानंतर त्यांना विधिनियमाचा दर्जा प्राप्त होत असतो.

३) राज्यातील सर्व व्यक्ती, संस्था व वस्तूसंबंधी कायदे करण्याचा अधिकार विधिमंडळास असतो. कौटुबिक संबंध, सामाजिक संस्था, उद्योगधंदे, कारखानदारी, कामगार कल्याण इत्यादी बाबींसंबंधीचे कायदे विधिमंडळ करू शकते. संघराज्य शासनपद्धती कायदे करण्याचे अधिकार केंद्रीय विधिमंडळ आणि राज्य विधिमंडळींना असतात.

४) राजाची आज्ञा किंवा विधिमंडळाने केलेले कायदा राज्यातील सर्व व्यक्तींवर बंधनकारक असतात. कायद्यांचे पालन करणे सक्तीचे आहे. कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींना न्यायसंस्था शिक्षा फर्मावते. प्राचीन काळात कायदे व नीतिनियम यात भेद केला जात नसे. मात्र आधुनिक काळात नीतिनियम आणि कायदे यांची फारकत करण्यात आली आहे. राज्यनिर्मित कायदे व्यक्तीच्या बहीर्गत आचरणासंबंधीचे नियम आहेत, तर नीतिनियम सदवर्तनाची निगडित आहेत.

५) इंग्लंडमध्ये प्रचलीत असलेल्या कायद्याचे अधिराज्य (**Rule of Law)** या प्रणालीच्या अंतर्गत सर्व व्यक्ती कायद्यासमोर समान असतात. सर्व व्यक्तींना कायद्याचे संरक्षण उपलब्ध असते. नागरिकांच्या वैद्यकिय अधिकारांचे संरक्षण करण्याची जबाबदारी राज्याची, म्हणजे न्यायमंडळ या राज्याच्या घटकसंस्थेची आहे. ब्रिटिश राजवटीत भारत व अन्य ब्रिटिश वसाहतीत कायद्याचे अधिराज्य ही प्रणाली प्रस्थापित करण्यात आली.

**प्रश्न - विधी नियम म्हणजे काय ते सांगून विधी नियमाचे वर्गीकरण स्पष्ट करा.**

**१ प्रास्ताविक :**

जेलिंक या ब्रिटिश विचारवंताने असे प्रतिपादन केले आहे की "विधिनियम / कायदे नसलेले राज्य म्हणजे अराजकाची राजवट." (**A state without law is a regime of amareny)** थॉमस हॉब्ज याने राज्याच्या व्युत्पत्तीसंबंधीच्या सामाजिक करार सिद्धांतात असे प्रतिपादन केले आहे की निसर्गावस्थेतील अराजक संपुष्टात आणण्यासाठी राज्याची स्थापना करण्यात आली. शांतता व सुव्यवस्था निर्माण करण्यासाठी आवश्यक असणारे कायदे करण्याचा अधिकार राजाला बहाल करण्यात आला. या अधिसत्तेच्या आधारे राजा सार्वभौम बनला. सार्वभौमााची सत्ता निरंकुश स्वरुपाची असते. सार्वभौमाचे आदेश / कृती कायदे असतात आणि त्याच्या आज्ञेचे पालन करणे हे नागरिकांचे कर्तव्य असते. निरंकुश राजसत्तेचा पुरस्कार करणाऱ्या या विचाररणीने राजाची आज्ञा म्हणजे कायदा असे प्रतिपादन केले. फ्रान्सचा राजा चौदावा लुई याने 'मी म्हणजे राज्य' (**I am the State)** अशी दर्पोक्ती केली. या विवेकशून्य राजसत्तेवर नियंत्रण प्रस्थापित करणारा सत्ताविभाजनाचा सिद्धांत मॉंटेस्क्यू याने त्याच्या **Spirit of the Laws** या ग्रंथात मांडला. त्यात असे प्रतिपादन केले की विवेकनिष्ठ कायदेमंडळ व त्याद्वारा निर्मित कायदेच नागरिकांच्या जीवित, वित्त व स्वातंत्र्याचे संरक्षण करू शकतील. म्हणजेच कायद्याचा उद्देश शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करण्यापुरता सीमित नाही, तर नागरिकांचा जीवित, स्वातंत्र्य व संपत्तीचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने कायद्यांची निर्मिती केली जाते.

**२ विधिनियम या संकल्पनेचे स्पष्टीकरण :**

विधिनियम या संकल्पनेची अन्योन्य संबंध राज्याच्या सार्वभौमत्वाची आहे. विधिनियमांची निर्मिती, अस्तित्व आणि त्यांची कार्यवाही या सर्वांचा मूलाधार राज्याची सार्वभौम सत्ता आहे. ॲरिस्टॉटल यांने त्याच्या **Politics** या ग्रंथात सार्वभौमत्यास 'राज्याची सर्वोच्च सत्ता' असे म्हटले होते. मध्ययुगाच्या अखेरच्या टप्प्यात राष्ट्र-राज्यांचा उदय झाला. सरंजामी व्यवस्थेच्या अराजकातून बाहेर पडल्यानंतर प्रादेशिक राज्यांना आणि नंतरच्या काळात राष्ट्र-राज्यांनी

सुव्यवस्था व शांतता प्रस्थापित करण्याच्या गरजेतून निरंकूश आणि अमर्याद सत्ता असलेली राजेशाही उदयास आली. राजाची सत्ता सर्वश्रेष्ठ असल्याने प्रतिपादन जो बोदँ, थॉमस हॉब्ज आणि ग्रॅशियस या विचारवंतांनी केले. त्यांच्या मते राज्याच्या भूप्रदेशामधील सर्व व्यक्ती व संस्थांवर अधिकार गाजवण्याची सत्ता म्हणजे सार्वभौमत्व **Lectures on Juris prudence** या १८३२ साली प्रसिद्ध झालेल्या ग्रंथात जॉन ऑस्टिन या विचारवंताने विधिविषयावर आधारित सार्वभौमत्वाची व्याख्या केली. त्याच्या मते वरिष्ठाने कनिष्ठाला दिलेली आज्ञा म्हणजे विधिनियम. या अर्थ सार्वभौम सत्तेची आज्ञा हा विधिनियम असतो. अन्य कोणत्याही प्रकारच्या आदेश-आज्ञेला विधिनियम म्हणता येणार नाही. प्रजाजनांनी सार्वभौम सत्तेच्या आज्ञेचे- विधिनियमांचे पालन करणे अपेक्षित असते. आज्ञापालन न करणे हा सार्वभौम सत्तेचा अपमान असतो आणि कायदेभंगाच्या या कृतीसाठी त्या व्यक्तीला शासन फर्मावण्याचा अधिकार राजा-राज्याला असतो. अशा प्रकारे राज्याच्या नियमांना कायदे-विधिनियम असे म्हणतात.

**३. विधिनियमाची व्याख्या :**


इंग्रजी भाषेत कायद्याला विधिनियमास **Law** असे म्हणतात. हा शब्द लॅटिन भाषेतील **Law** या शब्दापासून बनला आहे. **Law** म्हणजे सर्वांना लागू होणारे नियम. म्हणजेच सर्व व्यक्तींना लागू होणारे मानवी वर्तनाचे नियम म्हणजे विधिनियम.

ऑक्सफर्ड या इंग्रजी भाषेतील शब्दकोषानुसार “कायदा म्हणजे सत्तेने लादलेले मानवी विषयक नियम. जॉन ऑस्टिनच्या मते,” सार्वभौम सत्तेची आज्ञा म्हणजे कायदा.” राजेशाहीत राजाची आज्ञा कायदा असते, तर संसदेने केलेल्या नियमांना कायदा – विधिनियम म्हणतात.

हॉलंड या विविज्ञाच्या मते, “कायदा म्हणजे मानवाचे बाह्य वर्तन निर्धारीत करणारे नियम.” असे नियम अंमलात आणण्याचा अधिकार राज्यातील सार्वभौम सत्तेस असतो.

जॉन सालमंड या विचारवंताने असे प्रतिपादन केले आहे की, “कायदा म्हणजे न्यायाच्या स्थापनेसाठी राज्य निर्माण केलेल्या आणि कार्यवाहीत आणलेल्या नियमांचा संच.’

**४ विधिनियमांचे वर्गीकरण :**




**1.राष्ट्रीय कायदे आणि आंतरराष्ट्रीय कायदे** : राज्याच्या संपूर्ण भूप्रदेश आणि लोकांसंबंधीच्या कायद्यांना राष्ट्रीय कायदे असे म्हणतात. या कायद्यांची व्याप्ती त्या-त्या राज्याच्या भौगोलिक क्षेत्रापुरती सीमीत असते. म्हणजेच भारतातील कायदे पाकिस्तानात गैरलागू असतात. या उलट राष्ट्रा-राष्ट्रातील संबंध आणि वादांचे निराकरण करण्यासाठी आंतरराष्ट्रीय कायदद्यांची निर्मिती करण्यात आली आहे. संयुक्त राष्ट्र व अन्य आंतरराष्ट्रीय संघटनांद्वारा त्यांची कार्यवाही करण्यात येते. आंतरराष्ट्रीय वादांची सुनावणी आंतरराष्ट्रीय न्यायालयासमोर केली जाते.

**2.संविधान / राज्यघटना आणि सामान्य कायदे** : संविधान किंवा राज्यघटना हा राज्यातील सर्वोच्च कायदा असतो. देशाच्या राज्यकारभाराची पायाभूत तत्त्वे आणि त्यावर आधारित तरतुदींचा संविधानात समावेश होत असतो. भारतीय संविधानाची निर्मिती संविधान परिषदेने केली होती. संविधान हा देशाचा सर्वोच्च कायदा असून, त्यात राज्याचे स्वरुप, शासनसंस्थेची रचना, अधिकार आणि त्यावरील मर्यादा आणि नागरिकांच्या मूलभूत अधिकारविषयक तरतुदींचा समावेश असतो. राज्यघटनेद्वारा बहाल करण्यात आलेल्या अधिकारांच्या आधारे विधिमंडळाद्वारा केल्या जाणाऱ्या कायद्यांना सामान्य कायदे असे म्हणतात. विधिमंडळाद्वारे पारीत करण्यात आलेले कायदे संविधानात तरतुदींची सुसंगत असावे लागतात. संविधानाच्या तरतुदींची विसंगत असणाऱ्या कायद्यास बेकायदेशीर घोषित करण्याचा व देशाच्या राज्यकारभाराशी निगडित असलेल्या सर्व बाबींसंबंधी कायदे करण्याचा अधिकार विधिमंडळास असतो.

**3.प्रशासकीय कायदे** : राज्याचे कार्यक्षेत्र विस्तृत झाल्याने विधिमंडळाला असंख्य कायद्यांची निर्मिती करावी लागते. मात्र प्रत्येक कायदा तपशीलवार करणे शक्य नसल्याने, विधिमंडळ तपशीलवार नियम तयार करण्याचे अधिकार प्रशासनास प्रयत्न करणे, प्रशासनाद्वारा तयार करण्यात आलेल्या या नियमांना प्रशासकीय कायदे असे म्हणतात.

4.सार्वजनिक कायदे व खाजगी कायदे : सर्व नागरिक व संस्थांना लागू होणारे आणि सर्वसामान्य स्वरुपाच्या बाबींसंबंधीच्या कायद्यांना सार्वजनिक कायदे असे म्हणतात. उदा. अस्पृश्यता पालनास प्रतिबंध करणारा कायदा किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांसबंधाचे कायदे, व्यक्तिगत कौटुंबिक बाबींसंबंधीच्या कायद्यांना खाजगी कायदे असे म्हणतात. हिंदू विवाह कायदा किंवा हिंदू वारसाहक्क कायदा या कायद्यांची व्याप्ती संबंधित व्यक्तींपुरतीच सीमित असते.

**प्रश्न - राजकीय बंधन म्हणजे काय ते सांगून बंधनाचे आधार व मर्यादा स्पष्ट करा.**

**१ प्रास्ताविक :**

"तिला आज्ञा करण्याचा अधिकार आहे आणि त्या आज्ञेचे पालन करणे माझे कर्तव्य आहे." अशी भावना बहुसंख्य लोकांच्या ठिकाणी असणे म्हणजेच राज्याची अधिसत्ता लोकांनी मान्य करणे होय. जेव्हा सत्ताधारकांच्या आज्ञेचे पालन त्या आज्ञेच्या पाठीशी असलेल्या पाशवी सामर्थ्यामुळे नाही तर त्या आज्ञा आहेत अशा विश्वासातून बहुसंख्य लोक करतात तेव्हा राज्यात कायद्यांची अंमलबजावणी ही समस्या नसते. बहुसंख्य लोकांकडून आपोआपच आज्ञापालन केले जात असेल तरच आज्ञाभंग करणाऱ्या थोड्या लोकांवर बलप्रयोगाद्वारे आज्ञापालनाची सक्ती करता येते. राज्यकर्ते आणि प्रजा यांच्या संबंधात रास्तपणाची व औचित्याची भावना असेल तरच राज्यात स्थैर्य नांदते. या उलट बहुसंख्य लोक जर राज्याच्या कायद्यांचे पालन करत नसतील, राजाज्ञा अनुचित आहे असे त्यांना वाटत असेल तर पाशवी बलाचा वापर करुनही राज्यकर्ते दीर्घ काळ सत्तेवर राहू शकत नाहीत. थोडक्यात राजाज्ञेला अधिमान्यता असेल तर सत्ताधारकाच्या सत्तेला भक्कम अधिष्ठान मिळते. लोकांची संमती किंवा अधिमान्यता असेल तर प्रजाजनांकडून राजाज्ञेचे पालन केले जाते आणि संमती नसेल तर राजाज्ञेला प्रतिकार केला जातो.

२ राजकीय आंबधन (Political Obligation) :

ऑब्लिगेशन ही इंग्लिश भाषेतील संकल्पना रोमन कायद्यातून आलेली आहे. मराठी-भाषिक विचारवंत त्याचा अनुवाद आज्ञापालनाने कर्तव्य किंवा उत्तरदायित्व अशा मर्यादित अर्थाने करतात. राज्यशास्त्राचे अनेक अभ्यासक, विशेषत: मराठी-भाषिक, (Obligation) 'ऑब्लिगेशन' व (Obedience) 'ओबिडियन्स' या दोन संज्ञा समानार्थी वापरतात. राज्याच्या विधिनियमांच्या कायद्यांच्या पालनाव्यतिरिक्त राज्याशी एकनिष्ठता, सार्वजनिक सेवा, आपत्कालात लष्करी सेवा, राज्याच्या करांचा प्रामाणिकपणे भरणा, मतदानाची जबाबदारी इत्यादी स्वरुपाची नागरिकांची इतर कर्तव्येदेखील असतात. या सर्व कर्तव्याचे पालन नागरिकांकडून अपेक्षित असते आणि काही देशात त्याबाबत सक्तीदेखील केली जाते.

राजकीय विचारवंतांच्या मते, 'ऑब्लिगेशन' म्हणजेच उत्तरदायित्व होय. राज्यसंस्थेचा सदस्य असलेल्या नागरिकांना राज्याकडून काही अधिकारांची प्राप्ती होत असते. हे अधिकार म्हणजे नागरिकांवर असलेले राज्याचे कर्ज होय आणि त्या कर्जाची परतफेड करण्याचे नागरिकांचे उत्तरदायित्व म्हणजे राज्यासाठी काही कर्तव्य करणे होय. नागरिकांच्या राज्याविषयीच्या कर्तव्याची चर्चा राजकीय विचारवंतांनी फार पुरातन काळापासून केली आहे. आपण असे गृहीत धरले की अधिकारांच्या मोबदल्यात नागरिक कर्तव्याची पूर्तता करतात, तर प्राचीन व मध्ययुगात अमर्यादित राजसत्ता असताना नागरिकांनी राज्याशी एकनिष्ठ राहावे आणि राजाज्ञेचे पालन करावे असे निर्देश का दिले जात होते, या प्रश्नाचा उलगडा अधिकारांचा मोबदल्यात कर्तव्ये' या विचारातून होत नाही. म्हणून 'ऑब्लिगेशन'ची संकल्पनादेखील अस्वीकार्य आहे.

3. 'ऑब्लिगेशन 'करिता कर्तव्ये किंवा स्वधर्म :

प्राचीन भारतातील ख्यातनाम विचारवंत कौटिल्य कर्तव्याला 'स्वधर्म' असे म्हणतो. 'स्वधर्माची व्याप्ती विशद करताना कौटिल्याने असे म्हटले की "नीतिमत्ता आणि कायदा यांच्याद्वारे व्यक्तीवर एखादी कृती करणे किंवा न करणे त्यासंबंधी टाकलेले बंधन म्हणजे स्वधर्म होय." स्वधर्माचे अधिक स्पष्टीकरण हिंदू धर्मशास्त्रात पुढीलप्रमाणे प्राप्त होते. "जे हितावह, इष्ट व न्याय्य म्हणून करावयाचे आणि जे अहितकारक, अनिष्ट व अन्यायकारक म्हणून टाकायचे."

'ऑब्लिगेशन'करिता 'बंधन' या शब्दप्रयोगाचाही वापर केला जातो. बंधन म्हणजे कर्तव्य. विधिनुसार पार पाडण्यात येणारे कर्तव्य म्हणजे वैधानिक कर्तव्य होय. व्यक्ती-व्यक्तीच्या संबंधात सामाजिक नीतिमत्ता व न्यायाच्या संकल्पनेवर आधारित असणाऱ्या कर्तव्यांना सामाजिक बंधन (Social Obligations) असे म्हणतात, तर नागरिक व राजकीय सत्ता यांच्या संबंधातून राजकीय बंधन (Political Obligation) निर्माण होतात. अशा या संबंधांच्या आधारे नागरिकाला विशिष्ट कृती करण्यास भाग पाडले जाते. राज्याने तयार केलेल्या विधीनियमानुसार किंवा आदेशानुसार नागरिकाने आपले व्यवहार करणे म्हणजेच राजाज्ञेचे पालन करणे यास नागरिकांचे राजकीय बंधन असे म्हणतात.

'ऑब्लिगेशन'करिता 'आबंधन' या शब्दप्रयोगाचा वापर प्रा. भास्कर भोळे यांनी केला आहे. 'आबंधना'चा अर्थ 'आज्ञापालन 'पेक्षा अधिक व्यापक आहे. राजकीय आबंधनात नागरिकांकडून राजाज्ञेचे पालन केले जाते याची कारणे सापडतात आणि त्याचबरोबर नागरिकांकडून आज्ञापालन प्राप्त करण्याच्या राज्यकर्त्यांच्या अधिसत्तेचे समर्थनही आपणास प्राप्त होते.

'राजकीय आज्ञपालन' किंवा 'राजकीय उत्तरदायित्व' किंवा 'राजकीय कर्तव्य' या शब्दप्रयोगांपेक्षा 'राजकीय आबंधन' हा शब्दप्रयोग अधिक संयुक्तीक आहे. म्हणून आपल्या या चर्चेत 'आज्ञापालन' किंवा 'आज्ञापालनाचे कर्तव्य' या शब्दप्रयोगांऐवजी प्रा. भोळे यांचा 'राजकीय आबंधन' हा शब्दप्रयोग (Political Obligations) च्या संदर्भात आपण वापरणार आहोत.

**४. राजकीय आबंधनाचे आधार (Grounds of Political Obligation) :**

व्यक्ती कायद्याचे पालन का करते? राज्यसंस्था कोणत्या बाबींच्या आधारे नागरिकांकडून आज्ञापालन मिळवते? राज्यसंस्था आज्ञापालनाची व्यक्तीला सक्ती करु शकते का? या व इतर संबंधित प्रश्नांच्या उत्तरांचा शोध म्हणजे राजकीय आबंधनाचे आधार निर्धारित करणे होय. व्यक्तीने राजाज्ञेचे पालन करावे हा विचार पुरातन काळापासून मांडला जातो. व्यक्तीकडून राज्याच्या आज्ञापालनाची विविध स्पष्टीकरणे म्हणजे राजकीय आबंधनाचे आधार होय. या आधारापैकी काही आधार कालबाह्य ठरले आहेत तर काही तर्कशुद्ध नसल्याने अस्वीकार्य ठरले आहेत आणि काही तर्कशुद्ध असल्याने, स्वीकार्य ठरले आहेत. या आधारांची चर्चा पुढील पुढीलप्रमाणे आहे.

**१) पारलौकिक**: राज्यकर्त्यांना राज्य करण्याचा अधिकार प्रत्यक्ष ईश्वराने दिले आहेत अशी सर्वच धर्माच्या धर्मग्रंथांनी मांडणी केली आहे. सेंट  क्विनास यांच्या मते, मानव राज्यसंस्थेच्या आज्ञेचे पालन करतो कारण तिचा कायदा दैवी विवेकशक्तीहून उद्धवलेला असून ईश्वरी इच्छेचा तो अविष्कार असतो. मध्ययुगाच्या अखेरपर्यंत राजकीय आबंधनाचा हा आधार सार्वत्रिक स्वरुपाचा होता कारण राजेशाही ही शासनप्रणाली सार्वत्रिक स्वरुपाची होती. राजेशाहीच्या अस्ताबरोबर हा पारलौकिक आधार मागे पडला आहे.

२०व्या शतकात या पारलौकिक आधाराचा नवा अविष्कार हुकूमशाही राजवटीच्या राज्यकर्त्यांच्या समर्थकांच्या लिखाणात आढळून येतो. फॅसिझम, नाझीझम व साम्यवाद या आधुनिक विचारसरणीत “आध्यात्मिकते"चा अंश दिसतो. नेत्याच्या ठिकाणी दिव्यदृष्टी असते अशी फॅसिझमची धारणा आहे. सामान्य माणसाने दिव्यदृष्टी असलेल्या "अलौकिक" नेत्यावर श्रद्धा ठेवावी. त्याच्या आदेशानुसार वागावे. तर साम्यवादात “शास्त्रीय अंतर्दृष्टी"चा आधार घेतलेला आहे. साम्यवादी नेत्यात अशी अंतर्दृष्टी असते म्हणून त्यांचे प्रत्येक पाऊल अंतीम ध्येयाच्या दिशेनेच जाणारे असणार असा विश्वास बाळगून जनतेने त्यांच्या आज्ञेचे पालन करावे, अशी मांडणी केली जाते. म्हणजेच प्राचीन व मध्ययुगीन ईश्वरी सिद्धांत आणि आधुनिक आध्यात्मिक सिद्धांत पारलौकीक स्वरुपाचे असल्याने ते शास्त्रीयदृष्ट्या अस्वीकार्य आहेत.

**२) सत्ता किंवा सामर्थ्य.**

राज्याच्या सार्वभौम सत्तेच्या आधारावर राज्यकर्ते प्रजाजनांना आज्ञापालन करण्यास भाग पाडू शकतात. ऑस्टीन, हॉब्ज या विचारवंतांनी राज्याची सार्वभौम सत्ता निरंकुश व अमर्याद असते असे प्रतिपादन केले. सार्वभौम सत्तेचे अधिष्ठान राज्यसंस्थेच्या आज्ञांच्या पाठीशी असल्यामुळे लोक राज्याच्या आज्ञांचे पालन करतात. आधुनिक काळात विशिष्ट कायद्यातच तो राजाज्ञेचा कायदा अंमलात यावा अशी तरतूद असते. त्याचे पालन न करणे हा अपराध असतो. त्यामुळे योग्य त्या मार्गाने मंजूर झालेला कायदा त्या कायद्याच्या वैधतेमुळेच नागरिक पाळतात. तरीही हे स्पष्टीकरण अपुरे वाटते कारण कायदा निर्माण करण्याच्या सर्व प्रक्रियेलाच नागरिकांची मान्यता का द्यावी? शासन अप्रतिनिधीक स्वरुपाचे असेल तर त्याच्या कायद्याचे नागरिकाने पालन का करावे ? जनतेने

निवडलेले लोकप्रतिनिधी जनतेच्या अधिकारांची पायमल्ली करणारे किंवा अविचारी कायदे करणारे असतील तर जनतेने त्यांचा प्रतिकार करावा किंवा नाही? हे व असे असंख्य प्रश्न अनुत्तरीत राहतात, म्हणून राजकीय आबंधनाचा पाशवी शक्ती किंवा केवळ वैधानिकता हा समर्थनीय आधार सिद्ध होत नाही.

**३) व्यावहारिकता** : नागरिक राजकीय आज्ञापालन करतात; कारण तसे करणे त्यांच्या हिताचे आहे. नागरिक आज्ञाभंगाच्या परिणामांना घाबरतात किंवा आज्ञापालनातून आज्ञाभंगापेक्षा अधिक प्राप्ती करता येते असे त्यांना वाटते. तात्पर्य, सर्व संभाव्य परिणामांचा विचार करण्याचा हिशेबीपणा किंवा दूरदृष्टी किंवा व्यवहारकुशलता राजकीय आबंधनाचा आधार असतो, असे प्रतिपादन उपयुक्ततावादी विचारवंतांकडून करण्यात येते. प्रत्यक्ष व्यवहारात जरी असे घडत असले तरी व्यवहारिकता किंवा हिशेबीपणा हा राजकीय आबंधनाचा नैतिक आधार म्हणता येणार नाही. व्यवहारिकतेतून नागरिक राज्याच्या आज्ञेचे पालन का करतात याचा अर्थबोध होतो. परंतू राज्यसत्तेने नागरिकांकडून आज्ञापालनाची अपेक्षा का करावी हा प्रश्न अनुत्तरीतच राहतो.

**४) रुढी-परंपरा** : सर हेन्री मेनच्या मते, सवयीचा गुलाम झालेला माणूस राज्याच्या आज्ञेचे विनातक्रार पालन करतो. म्हणजेच दीर्घकाळ रुढी-परंपरांचे पाठबळ लाभलेली सत्ता आपोआपच अधिमान्यता पावते. माणसांनी ती आहे तशीच स्वीकारलेली असते. राज्यसत्तेचा स्वीकार करणे, तिच्या आज्ञांचे पालन करणे आणि जमेल तसा शांततापूर्ण मार्गाने त्यात बदल करण्याचा प्रयत्न करणे हेच माणसाचे कर्तव्य ठरते. परंपरेचा पाया राज्यसंस्थेला बळकटी आणतो आणि सवयीमुळे राजाज्ञेचे पालन केले जाते असे म्हणणे चुकीचे नसले तरी तेवढ्यावरून रूढी - परंपरा राजकीय आबंधनाचा नैतिक आधार होऊ शकत नाही. नव्या समाजात परंपराविषयी असमाधान असल्याने तो आबंधनाचा नैतिक आधार होऊ शकत नाही. ज्या समाजात परंपरांविषयी तीव्र असमाधान असते व बहुसंख्य लोकांना प्रस्थापित रुढी अन्यायकारक वाटत असतात, त्या समाजात पारंपारिक चौकट टिकवण्यापेक्षा आमूलाग्र परिवर्तन करण्याचा प्रयत्न होणेच अधिक स्वाभाविक ठरते. १७८९ च्या रक्तरंजित क्रांतीनंतर फ्रान्समधील जनतेचे सरंजामी व्यवस्थेची सामाजिक, आर्थिक व राजकीय चौकट नेस्तनाबूत करण्याचा किंवा 'महान ऑक्टोबर क्रांती'नंतर समाजवादी व्यवस्था स्थापन करण्याचा रशियातील नागरिकांनी केलेल्या प्रयत्नामूळेच समर्थनीय ठरतो. भारतात वर्णाश्रम परंपरा कितीही जुनी असली तरी आज ती 'नैतिकदृष्ट्या असमर्थनीय ठरली आहे. भारताच्या संविधनाने समतेचा पुरस्कार करताना अस्पृश्यता पालन कायदेशीररीत्या दंडनीय ठरविले आहे.

**५) वहिवाट किंवा चिरभोगी स्वामित्व (Prescrptive Possession)** : कूळ कायद्यानुसार कुळाला वहिवाट हक्काची शाश्वती दिली जाते, त्याचप्रमाणे पूर्वापार चालत आलेल्या हक्कानुसार राजा हा राज्य करतो. राज्य करण्याचा त्याचा अधिकार दीर्घकाळ त्याने कमविल्यामुळे हा अधिकार अधिमान्यता पावतो. जनतेने राजाच्या आज्ञेचे पालन केले पाहिजे; कारण त्यांनी स्वामीत्व आणि स्वामित्वाबरोबर येणाऱ्या सर्व अधिकारांचा स्वीकार केलाच पाहिजे. अशा प्रकारचा युक्तिवाद बोदॉ या फ्रेंच विचारवंतांकडून केला जातो. राज्यसंस्थेचा उगम कुटुंबसंस्थेतून झाला व कुटुंबात जशी मालमत्तेची मालकी कुटुंबप्रमुखाकडे असते त्याचप्रमाणे राज्याची मालकी व अधिसत्तेची सूत्रे राजाकडे असतात, असे प्रतिपादन बोदॉने केले आहे. अर्थातच राज्याचा उगम जरी कुटुंबसंस्थेतून झाला असला तरी आधुनिक राज्याचे स्वरुप कुटुंबासारखे नाही. आजच्या राज्याप्रमुखांची सत्ता

कोणत्याही अर्थाने कुटुंबप्रमुखाच्या सत्तेसारखी नाही इतकेच नव्हे तर राज्यप्रमुखाची सत्ता कोणत्याही अर्थाने कुटुंबप्रमुखाच्या सत्तेसारखी नाही. इतकेच नव्हे तर कुटुंबप्रमुखाची अनिर्बंध सत्तादेखील आज नाहीशी झाली आहे.

**नैतिक आधार :**

वरील आधारापैकी एकातूनही राजकीय आबंधनाचे नैतिक समर्थन आपणास मिळत नाही. राजसत्तेचे सार्वत्रिक स्वरुप व सत्तीचे अधिकारक्षेत्र यामुळे राज्यसंस्थेच्या नियमांचे पालन नागरिकांनी करावे अशी अपेक्षा बाळगली जात असे. परंतु विवेक हे माणसाचे व्यवच्छेदक लक्षण आहे आणि त्याच्या आधारेच राजकीय आबंधनाचे आधार ठरवायला हवेत, असे प्रतिपादन उदारमतवादी आणि व्यक्तीस्वातंत्र्यवादी विचारवंतांकडून १७व्या शतकापासून करण्यात येऊ लागले. राज्यसंस्थेची कृती सर्वस्वी हितप्रद आहे अशी जनसामान्यांची खात्री पटली तरच माणूस राज्यसंस्थेच्या आज्ञेचे स्वेच्छेने पालन करतो.

**१) करार आणि संमती** : हॉब्ज, लॉक आणि रुसो यांनी सामाजिक करार सिद्धांत मांडले. राज्याची निर्मिती लोकांनी आपसात केलेल्या करारानुसार झाली. आपल्या जीवनाचे संरक्षण व्हावे व आपणास किमान स्वास्थ्य लाभावे म्हणून माणसे समाजात राहतात. समाजात राहता यावे म्हणून काही नियमांचे पालन करण्याचा ते आपसांत करार करतात. कराराचे पालन करण्याच्या नैतिक जबाबदारीतून ते कायद्यांचे पालन करतात. मात्र तपशिलांबाबत हॉब्ज, लॉक आणि रुसो यांच्यात एकवाक्यता नाही. अनियंत्रित राजसत्तेचा पुरस्कर्ता होता. आपण आज्ञापालन करण्याचे कबूल केले आहे म्हणून आपण राज्यसंस्थेच्या आज्ञेचे पालन करतो अशी हॉब्जची भूमिका होती. लॉकच्या मते शासनसंस्थेची निर्मिती सर्वांच्या हितासाठी व सर्वांच्या संमतीने झालेली असल्यामुळे शासनाच्या आज्ञांचे पालन सर्व नागरिकांनी करावे. प्रजाजनाच्या जीवित, स्वातंत्र्य व वित्ताचे संरक्षण करण्याची शासनाची जबाबदारी आहे.

रुसोच्या मते, सामाजिक कराराद्वारे सार्वजनिक हित साधणाऱ्या नि:पक्षपाती अशा सार्वभौम शक्तीच्या आज्ञांचे पालन करण्याचे प्रत्येकाने मान्य केले. ही सार्वभौम शक्ती सामाजिक ईहेच्या स्वरुपात असते. शासनसंस्था या सामाजिक ईहेचे प्रतिनिधीत्व करते. सामाजीक ईहा सर्वांच्या कल्याणाचे संकल्पन करते व कोणाचेही अकल्याण चिंतीत नाही. सामाजिक ईहेच्या आज्ञापालनामुळे मानवसमाज नैतिक जीवन जगू शकतो. तात्पर्य, रुसोच्या मते राज्यसंस्था सामूहिक ईहेचे प्रतिनिधीत्व करते. ही ईहा विवेकी असते. तिच्याकडून अन्याय घडू शकत नाही. म्हणून नागरिकांनी तिची आज्ञा शिरसावंद्य मानावी.

**२) न्यायतत्व** : सामाजिक कराराची संकल्पना आधुनिक काळात अस्वीकार्य असली तरी आधुनिक राज्याचा आधार संविधान आहे असे मान्य करण्यात येते. संविधान म्हणजे लोकांनी केलेला एक राजकीय करारच आहे. अशा संविधानानुसार प्रस्थापित झालेल्या राज्याची आज्ञा लोकांवर बंधनकारक असणे साहजिकच आहे, राज्याच्या विधीनियमातून न्यायाची प्राप्ती व प्रतिष्ठापना आहे, असा प्रतिवाद केला जातो. राज्याच्या विधीनियमातून न्यायाची प्राप्ती व प्रतिष्ठापना होते, म्हणून त्यांचे पालन करण्याचे आबंधन नागरिकांवर पडते अशी भूमिका बार्करने मांडली आहे. म्हणजेच संविधान निर्मितीस विशिष्ट मूल्य आहे, म्हणून आपण त्याच्याशी एकनिष्ठ आहोत, मूल्याधिष्ठित न्यायतत्वाच्या कल्पनेनुसार राज्याची व संविधानाची निर्मिती झाली म्हणून आपण राज्याची सत्ता

मानतो. तात्पर्य, न्यायाच्या अधिष्ठानावर संविधान व राज्यांची उभारणी हा राजकीय आबंधनाचा वास्तविक आणि नैतिक आधार आहे. राजकीय आबंधनाच्या मुळाशी अशा प्रकारे कायदा, संविधान आणि न्यायतत्व हे तिन्ही आधार असतात.

• **राजकीय आबंधनाच्या मर्यादा** (Limiations of Political Obligation) :

राजकीय आबंधनाच्या आधारांच्या विश्लेषणाच्या आधारे आपण या निष्कर्षापर्यंत पोहचतो की, राजकीय आबंधन, अंधश्रद्धा, रुढी, परंपरा, निष्क्रियतेवर आधारित नसावे. अचिकित्सक आज्ञापालन धोक्याचे असते. जर लोक सुस्त, गाफील राहीले तर राज्यकर्ते मस्तवाल बनतात. अंधानुकरणामुळे निष्क्रियता येते. समाज आपली सचेतना हरवून बसतो. दुर्दैवाने बहुसंख्य लोक आत्मकेंद्रित असतात आणि जोपर्यंत स्वत:वर अन्याय होत नाही तोपर्यंत ते अन्यायाविरुद्ध आवाज उठवीत नाहीत. ते रुढींचे गुलाम बनतात. बहुसंख्य लोक निष्क्रिय बनल्यास राज्यकर्त्यांवर लोकमताचे नियंत्रण राहणार नाही आणि त्यातून राजकीय आबंधनाचा आत्मा सार्वत्रिक न्याय्य जाईल. राजकीय आबंधनाचे नैतिक स्वरुप अबाधित राखण्याकरिता ते क्रियाशील व सतत भाष्य करणे हा व्यक्तीच्या नैतिक आबंधनाचा भाग आहे. राजकीयदृष्ट्या सक्षम आणि जागरुक जनता, प्रभावी लोकमत आणि लोकमत संघटित करणारी प्रसारमाध्यमे व संघटनाच राजकीय आबंधनाच्या नैतिक बाजूची जोपासना करतात. राज्यकर्त्यांना न्यायतत्त्वावर आधारित शासन करण्यास भाग पाडतात. न्यायतत्वावर आधारित राजकीय आबंधनात अन्यायाविरुद्ध आवाज उठविणे आणि राज्यकर्त्यांच्या अन्याय्य कृतींचा प्रतिकार करणे हे नागरिकांचे नैतिक कर्तव्य ठरते. याबाबत नागरिकांकडून होणारी कर्तव्यच्युती हीच लोकशाही व्यवस्थेची सर्वात मोठी समस्या आहे.

Dr. Dattatray Saudagar, Sawant,
Head, Dept. of Political Science,
Arts, Commerce and Science College, Lanja